म. ग्रं. सं. ठाणें.
विषय निबंध
सं. क्र. २७८२
REFBK-0022796

२७८२
२२७९६
७५।७२।७९

# छेद

अनिल अवचट

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

…चना:—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे,
… न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा
…गी भरावी लागेल.

20 JAN 1980

27 APR 1980

24 AUG 1980

18 AUG 1985

26 FEB 1986

30 OCT 1988

(क्र. मा. प.)

…शन

किमत
दहा रुपये

प्रकाशक
प्रकाश रानडे
नीलकंठ प्रकाशन
१६४३ सदाशिव पेठ
टिळकरोड पुणे ४११०३०.

©
अनिल अवचट

मुद्रक
सौ. भामा शेटे
अनमोल मुद्रणालय
४ सोमवार पेठ
पुणे ४११०११.

मुखपृष्ठ
अनिल अवचट

प्रथमावृत्ती
२६ जानेवारी १९७९.

२७८२
२२।७।९६
निबंध

मुस्लिम महिला एक दुर्दैव-एक झगडा १
महिला अधिवेशनातील कडक इस्त्री १२
सारस्वत संमेलनातील सांस्कृतिक उत्खनन २३
चांभारांची चौकशी ३३
दुष्काळ यात्रा ४३
मासा गिळतो माशाला ५०
दंगल १६ मे, पुणे ६७
डॉक्टर्स : जगवतात की नागवतात ? ८५
परिशिष्ट ९८

# ९.

# स्त्रियांची दोन अधिवेशने

# मुस्लिम महिला

# एक दुर्दैव-

# एक झगडा

**माझं** नाव नसरुद्दीन बारगीर

राहणार कोल्हापूर. एस. टी. वर्क-शॉपमध्ये कामाला.

एकदा मी रस्त्याने चाललो असता आमच्या अकबर मोहल्ल्यातल्या एका माणसाने मला घाईघाईने थांबवले आणि सांगितले, बारगीरसाहब, इथे जरा तुमची सही द्या. मला वाटले कसली तरी लोनवरची सही असणार. म्हणून मी दिली.

दुसरे दिवशी एक मुलगी, आईसह माझ्या दारात येऊन रडत बसलेली. आणि ती आई मला विचारू लागली की, का हो माझ्या पोरीचं तुम्ही वाटोळं केलंत ?

मला काहीच कळेना. मग लक्षात आले की, काल रस्त्यात घेतलेली सही ही तलाकनाम्यावरची साक्षीदार म्हणून सही होती. मी ताड्कन् त्या माणसाच्या घरी गेलो. त्याला सांगितले की, माझी सही तुम्ही मला फसवून घेतलीत, ती मी मागे घेत आहे. त्यांनी सांगितले, असे कसे करता ? त्यामुळे तलाक बेकायदेशीर होईल. मी म्हटले, होऊ द्यात. पाहिजे तर तुम्ही पुन्हा तलाक द्या. पण या पापात मला गोवू नका. मी आणखी चौकशी केली की, तलाक दिला तरी कशावरून ? त्यांनी सांगितले की, मुलगी जास्त खाते. मी म्हटले, 'अहो, मुलीची जात आहे. जास्त खाणारच. तिच्या जिवालाच खाल्ले तिने. पण तुम्हांला ते कसे माहीत पडले ?'

त्यांनी उत्तर दिले नाही. पण मागाहून मुलीने सांगितले, 'ते माझ्याकडून गुरासारखे काम करून घेत, आणि खायलाच देत नसत. मग मी भाकरीचे तुकडे ब्लाऊजमध्ये लपवून ठेवत असे आणि संडासात जाऊन खात असे. ह्याच्यावर त्यांनी पाळत ठेवली. एक दिवशी संडासात गेल्यागेल्याच त्यांनी जबरदस्तीने दार उघडून मला खाताना पकडले आणि मारत मारत घरात आणले. लगेच लोक बोलावून तल्लाक दिला.'

मी तिच्या सासऱ्याला समजावले. त्यांचे मग कॉंप्रमाइज झाले.

मी मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे काम करतो. माझे विचार बदलण्यास एक कारण झाले. मी एका मुस्लिम विधवा स्त्रीशी लग्न ठरवले. तिच्या बापाकडे मी मागणी घातली. यावर आमच्या घरच्यांनी एकच रान उठवले. तिच्या वडलांना परस्पर जाऊन माझ्याविषयी खोटेनाटे सांगितले. त्यावर मशिदीत आणि त्यांच्यात मोठ्या बातचीतीचाच प्रसंग आला. आठच दिवसांत तिच्या घरच्यांनी तिचे दुसरी-कडे लग्न लावून दिले.

दलवाईसाब येऊ लागले. मला त्यांची तत्त्वे पटली. काम करू लागलो. मोहल्ल्यात मला विरोध होऊ लागला. आम्ही एक दलवाईंचा परिसंवाद ठेवला होता. त्यामुळे तिथल्या मुसलमानांमध्ये खळबळ माजली. त्याला उत्तर देण्यासाठी त्यांनी बेळगावहून दोन मौलवी आणले. ते चौकाचौकात सभा घेत. सांगत, 'ये कौन है ये दळवी ? अभी आ जायेगा हमारे पंजेमें । आयेगा मौका तब पकड लूंगा उस दळवीको । फिरौन बादशहाने मुसाला विरोध केला आणि त्या फिरौनची कबर पाण्यात बांधली गेली. तशी त्या दलवाईची कबर आम्ही इथल्या गावच्या संडासच्या गटाराखाली बांधू. कहाँ जायेगा वो दळवी ...'

मी सत्यशोधक काम करू लागल्यापासून मला मुहल्ल्यात विरोध सुरू झाला. लोक म्हणू लागले की 'पाहा, आपल्या पब्लिसिटीसाठी हा इस्लामचा बळी देतोय.

आम्ही ठेवलेल्या दलवाईंच्या एका कार्यक्रमात भाग घेऊ नये म्हणून इथल्या एका मुस्लिम संघटनेने ' खबरदार ! होशियार ! ' असे पत्रक काढून त्यात जो कुणी या कार्यक्रमाला जाईल त्याने इस्लामशी शत्रुत्व केलं असं समजलं जाईल, असा दमही दिला होता. त्यावर पोलिसांनी चौकशी केली. अखबारात पण हे प्रकरण छापून आले. तेव्हा त्याचा बोलबाला झाला. आता मला जमातीचा विशेष त्रास होत नाही. माझ्या मागून बोलतात, येवढेच. समोर बोलायची ताकद नाही. बहिष्कार घालण्याची तर नाहीच नाही. हा बदल दोन तीन वर्षातला.

माझं नाव वझीर पटेल. गाव अमरावती. कॉलेजात लायब्ररियन.

माझ्याबरोबर बावीस मुस्लिम महिला आलेल्या आहेत. आम्ही एक मुस्लिम नौजवान मंडळ काढले. दलवाईंच्या सेक्युलर विचारांचा प्रसार आम्ही करतो. आम्ही पन्नास महिला आणणार होतो, पण दोन दिवस आधी तिथल्या काही मुस्लिम नेत्यांनी असे घरोघर जाऊन सांगितले की तुमच्या मुलींना पुण्याला पाठवू नका. तिकडे हिंदू–मुस्लिम दंगा होण्याचा संभव आहे. एकाने कलेक्टरकडे जाऊन तक्रार केली की हे महिलांना जबरदस्तीने पुण्याला नेत आहेत. मला कलेक्टरने बोलावून खुलासा विचारला मी सांगितले, तुम्ही घरोघर जाऊन खात्री करून द्या. येवढेच काय, मी त्यांना बोलवायलासुद्धा जाणार नाही. येवढी खात्री दिली.

तरी त्या मुस्लिम नेत्यांनी पुण्याला निघताना आमच्या सायकलरिक्षा अडविण्याचा घाट घातला. येवढ्या तंग वातावरणातही तिथल्या बावीस महिला निघाल्या. त्यांच्या रिक्षांना घरापासून स्टेशनापर्यंत पोलिस संरक्षण मिळाले. गाडीत बसवून दिल्यावर पोलिस परत गेले.

आता परत गेल्यावर काय काय आपल्यापुढे वाढून ठेवले आहे, याचा पत्ता लागत नाही. या विचाराने आमच्यापैकी बऱ्याचशा महिला धास्तावल्या आहेत. पण त्यांची आल्या प्रसंगाला तोंड द्यायची हिंमत आहे.

मी कॉलेजचा लायब्ररियन. त्या निमित्ताने माझे मुस्लिम विद्यार्थी–विद्यार्थीनींशी संबंध येतात. मी त्यांना दलवाईंचे विचार सांगतो. ज्याना पटतात ते आमच्यात सामील होतात. आमच्या मुस्लिम नौजवान मंडळाला गावात खूप विरोध होता. आमच्या मंडळातल्या मुली चालल्या की ती माणसे त्यांची टवाळी करतात. बघा, या वेश्या निघाल्यात. ये लोक अपने खातिर इस्लामको बेचते हैं. आणखी किती तरी घाण घाण शिव्या.

पण मुलींच्या पालकांना वझीर पटेल कसा आहे हे माहीत आहे. म्हणून त्यांनी या मुली पुण्याला पाठवल्या.

माझं नाव मी सांगू शकत नाही.

मी आठ मुलांची आई आहे. माझं लग्न झालं तेव्हा माझ्या घरची परिस्थिती चांगली होती. नवरा एकटाच होता. ते आमच्याकडेच राहात. माझ्या आईने त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. ते शिकून एम्. ए, पी. एच्. डी. झाले. कॉलेजात शिकवू लागले. मला वाटले, चला, आता आपल्याला चांगले दिवस आले. आता आईच्या घरी राहायला नको. पुढे कॉलेजातल्या एका मुलीवर यांचे मन बसले तसे ते मला टाळू लागले. मला वरचेवर घरी पाठवू लागले. तोपावेतो ते प्रिन्सिपॉल झाले होते. त्यांनी मला एकदा सांगितले की आठ दिवसांसाठी तू घरी जा. मी गेले. आठ दिवस गेले, गेली आठ वर्षे मला त्यांनी घरी नेले नाही. मी एकदा कॉलेजात भेटायला गेले असता त्यांनी धक्के मारून बाहेर काढले. तेव्हा हा उभा असलेला मुलगा सहा महिन्यांचा पोटात होता. मला त्यांनी तलाक दिला नाही आणि घरातही घेत नाहीत. महिना पन्नास रुपये ते पाठवतात पन्नास रुपयांत आठ मुलांचा संसार मी कसा ओढणार ? माझं मागणं त्यांनी मला निदान शंभर रुपये तरी द्यावेत. पहिले पहिले आईला काही वाटत नसे. पण आता त्या घरात सगळ्यांना माझा बोजा झाला आहे आईच्या घरी राहण्यापेक्षा भीक मागणेही बरे पडते. गेले दोन दिवस मी या अधिवेशनात हजर आहे. पण माझ्या पोरांच्या पोटात अन्न नाही इथल्या लोकांनी मला माझी स्थिती ऐकून पैसे दिलेत अठ्ठावीस रुपये जमले. दलवाईसाबने त्यात बावीस घालून पन्नास केले. बहोत बहोत शुक्रिया. आप लोग बहोत अच्छा काम कर रहे है. पण मला काही तरी नोकरी लावून द्या. वाटेल ते काम करायची माझी तयारी आहे.

(वरील स्त्रीच्या घटनेसंबंधी बोलताना दलवाई म्हणाले, हे प्राचार्य गव्हर्मेंट कॉलेजचे प्राचार्य आहेत. मी शिक्षणमंत्र्यांना भेटून त्या प्राचार्यांना महिना दोनशे या स्त्रीला सक्तीने द्यायला लावा असा आग्रह धरणार आहे. आणि त्यास नकार मिळाला की त्या प्राचार्यांविरुद्ध आणि शासनाविरुद्ध आम्ही सामूहिक संघर्ष करणार आहोत. त्याला आम्ही तसे सोडणार नाही.)

मेरा नाम बिलकिस बेगम

राहणार दिल्ली. एका मुलींच्या शाळेची हेडमिस्ट्रेस

माझं आणि नवऱ्याचं भांडण लग्नानंतर लगेचच सुरू झालं. नवरा बाहेरून आला की तो माझी अमुक वस्तू कुठे आहे तमुक कुठे आहे म्हणून घरात गोंधळ घाली. नाही सापडली की म्हणे तल्लाक देतो. साध्या साध्या गोष्टींना तो आत्ता तल्लाक देतो, मग तल्लाक देतो असे म्हणे. चिडला की सामान इकडे तिकडे फेकून देई. मी अगदी कंटाळून गेले. पण त्याने तल्लाक दिला तर करायचे काय ? मला

शिक्षण नव्हते. घरचा पैसा नव्हता. मग जाणार कुठे ? नवऱ्याचा त्रास पुढे जास्त वाढला. तो मारू लागला. कमरेचा पट्टा काढून मारी किंवा पायातला बूट काढून मारी. येता-जाता लाथा मारी. शेवटी मी त्याला सांगितले, तुझ्या लाथा खायला मी काही फुटबॉल नाही. त्यावर त्याने मला तल्लाक दिला. मी वेगळी राहू लागले. मी शिक्षण घेतले. शिक्षिका झाले. आता हेडमिस्ट्रेस झाले. मुहल्ल्यातले लोक कामानिमित्त माझ्याकडे येतात. माझे बोलणे, चालणे, वागणे, पाहून ते माझ्या त्या नवऱ्याला विचारतात, 'अरे इतनी अच्छी औरत, तूने उसे छोड क्यूं दिया ?'

पण त्या सगळ्या प्रकरणात मी मात्र 'मेंटल पेशंट' झाले. आता मला साध्या साध्या गोष्टींची काळजी वाटते. माझा मुलगा जरा कुठे बाहेर गेला की तो ट्रकखाली सापडला, त्याचे डोके फुटले, त्याला कुठे लागले, तो जिवंत आहे की नाही—असे विचार डोक्याला त्रास देतात.

माझं नाव असंच काही तरी. पुण्यातली राहणारी.

माझं लग्न होण्याआधी आठ दिवस माझी सासू आणि तिची एक नातेवाईक घरी येऊन राहिली. तिने माझी चालचलणूक पाहिली. मला पसंत केले आणि माझा निका झाला.

काही महिन्यांनी माझ्या चेहेऱ्यावर जवानीचे फोड येऊ लागले. घरच्यांनी खोड काढली. ही मुलगी नको म्हणू लागले. हिला रक्तपिती आहे, म्हणून त्यांनी मला तल्लाकच देऊन टाकला.

मी घरी आले. वडलांना सांगितले. वडील त्यांना समजवायला गेले. पण यश आले नाही. येवढ्या दिवसांत त्यांनी दुसऱ्या मुलीशी लग्न करूनही टाकले.

माझ्या वडलांनी मला एका कातडीच्या मोठ्या डॉक्टरला दाखवले. त्यांनीही सर्टिफिकेट दिले की ही रक्तपिती नाही, साधे जवानीचे फोड आहेत. हे सर्टिफिकेट नवऱ्याकडच्यांना दाखवले. त्यांनाही ते पटले. त्यांनी मला परत घरी नेले. आणि नव्या बायकोला तलाक दिला.

मधल्यामध्ये त्या मुलीचे मात्र नुकसान झाले. तिच्याकडे पाहिले की मला वाईट वाटते. साध्या गोष्टीसाठी केवढा मूर्खपणा. केवढे नुकसान.

माझ्या आईची स्थिती पाहून मी या परिषदेला आले आहे. मी स्कूलमध्ये दहावीत आहे. पुण्यात रास्ता पेठेत राहते.

माझी आई कुँवर असताना त्यांच्या घरी एक मुलगा शिकायला ठेवला होता. तो पटन्याचा पठान होता. त्याचे आणि माझ्या आईचे संबंध आले. तिला

गर्भ राहिला. ही मी पोटात असतानाची गोष्ट. या गोष्टीची बोलवा झाल्यावर आळीतल्या मोठ्या मंडळींनी त्या मुलाला समजावले आणि त्या मुलाचा – म्हणजे माझ्या वडिलांचा माझ्या आईबरोबर निका लावला.

पुढे माझे वडील पटन्यास गेल्यावर त्यांच्या घरच्यांनी त्यांना सुनावले. आपल्या खानदानास हे लग्न शोभत नसल्याचे सांगितले. माझ्या वडलांनाही ते पटले. त्यांनी माझ्या आईस तलाक दिला, आणि दुसरे लग्नही करून टाकले.

पुढे माझ्या आईला खूप वाईट दिवस आले. तिला लोकांची धुणी, भांडी करून पोट भरावे लागले. पण तिने मला शिकवले. म्हणून मला इथं यायची बुद्धी तरी झाली. मी आता दहावीत आहे. ही घटना आमच्याच बाबतीत घडली असे नाही, तर मुहल्ल्यातल्या घराघरात अशा घडतात. हे थांबले पाहिजे.

माझं नाव जहाँआरा बेगम.

मी कलकत्त्यानजिकच्या जगदीशपूर या गावी राहते.

मी बारा वर्षांची असताना शाळेत जाऊ लागले. शाळेत जाते म्हणून माझ्या वडिलांनी आणि चुलत्यांनी खूप विरोध केला. पण मी तो न जुमानता शाळेत गेले व शिकून एम्. ए. झाले. इतिहास हा माझा विषय होता. नंतर पॉलिटिक्स् घेऊन दुसऱ्यांदा एम् ए. झाले. हे करताना मला खूप अडचणी आल्या. आमच्या जमातीत मुलींना इतके शिकून चालत नाही. शिवाय मी पडदा पाळीत नसे. म्हणूनही सगळ्यांचा मोठा राग असे, तो वेगळा.

आम्ही काही मित्र-मैत्रिणी मिळून मुस्लिम समाजाच्या प्रश्नांविषयी चर्चा करीत असू. त्यातून आम्ही १९७० साली 'नवजागरण समिती' काढली. त्यात प्रामुख्याने मुस्लिम स्त्रियांच्या प्रश्नांवर चर्चा होत असे.

आम्ही आमच्या मागण्या एका पत्रकाद्वारे प्रसिद्ध केल्या. त्या अशा होत्या :

१. मुस्लिम स्त्रियांना शिक्षण मिळाले पाहिजे. म्हणजे त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वतःच्या पायांवर उभे राहता येईल.
२. आपल्या स्वतंत्र शाळा नकोत. इतर शाळांमध्ये त्या विलीन करण्यात याव्यात.
३. पडदा पद्धती ताबडतोब नष्ट झाली पाहिजे.
४. स्त्रियांना सर्व बाबतीत समान हक्क मिळाले पाहिजेत.
५. हुंडा पद्धती बंद झाली पाहिजे.
६. बहुपत्निकत्व व बालविवाह पद्धतीवर कायद्याने बंदी घातली पाहिजे.
७. एकतर्फी घटस्फोट पद्धती बंद झाली पाहिजे. आणि प्रत्येक लग्न रजिस्टर करण्याची सक्ती केली पाहिजे.

हे पत्रक सर्व वर्तमानपत्रांतून छापून आल्यावर सगळीकडे खळबळ माजली. आमच्या घरासमोर मुस्लिमांची एक मोठी सभा झाली. त्यात खूप मौलवींची, पुढाऱ्यांची भाषणे झाली. त्यातली काही वाक्ये अशी :

'आम्हांला जहाँआराचे शिर पाहिजे'

'आम्हांला तिचे रक्त प्यायचे आहे.'

'आम्ही तिची कातडी सोलून काढू आणि आमचे मुल्ला-मौलवी तिचे कच्चे मांस खातील.'

या सभेनंतर आमच्यावर खूपच दडपण आले. पण 'नवजागरण समिती' चे काम चालूच राहिले. त्या वेळी माझ्या घरचेही घाबरले होते. पण माझी आत्या–खाला–तिला मी बडी मा म्हणते– तिने मला धीर दिला. तिने सांगितले, माझ्या मयतीलासुद्धा या मुल्ला मौलवींना बोलावू नकोस. माझे काका अब्दूल समर यांचाही मला खूप उपयोग झाला.

परवा बांगलादेशमध्ये तो स्वतंत्र होण्याआधी जेसोरपर्यंत मी जाऊन आले. तिथली निरपराध कत्तल मी पाहिली. पाकिस्तान निर्मितीचा तो परिणाम मी मानते. आता स्वतंत्र बांगलादेशमुळे आमच्या प. बंगालमधल्या मुसलमानांची बुद्धी ठिकाणावर येवो, अशी आशा करते. इतक्या दिवस, इथे दंगल झाली की मुसलमान पूर्व बंगालमध्ये निघून जात. आता स्वतंत्र बांगलादेशात अशा दंगलखोरांना आसरा मिळणार नाही. हे सर्वसामान्य मुसलमानालासुद्धा आता जाणवायला लागू लागले आहे, असे वाटते.

आतापर्यंत मुसलमानांचा प. बंगालच्या राजकारणात बराच उपयोग करून घेतला गेला आहे. स्वातंत्र्यानंतर १९६२ पर्यंत काँग्रेसला आणि नंतर सी. पी एम. लाही मते मिळत गेली. ६९ सालच्या मध्यावधी निवडणुकीच्या सुमारास निवडणुकीच्या ऐन भरात स्टेटस्‌मन या वृत्तपत्रात सुप्रसिद्ध विचारवंत टॉयन्बी यांचे लेख येत होते. त्यात पैगबरांची आणि गांधींची तुलना केली होती. त्यावर लागलीच संबंधित पक्षाच्या प्रेरणेने स्टेटस्‌मन कचेरीवर मोर्चा आणून जाळपोळ करण्यात आली या घटनेचा त्या निवडणुकीत मुस्लिम मतदारांवर मोठाच परिणाम झाला. एकूण सगळे चित्रच पालटले.

माझं नाव फकर बेगम.

दिल्लीला राहते. एका मोठ्या मौलवींच्या घरातली मी आहे. माझे सासरे मौलाना अहमद सहीद हे दिल्लीतील एक मोठे मौलवी समजले जात.

माझं लग्न झालं तेव्हा मी जरा शिकलेली असल्याने पडदा पाळीत नसे. माझे पतीही जुन्या मताचे नसल्याने तसे चालत असे; पण माझ्या सासूने सांगितले की, आपले घराणे मौलवीचे, मला हे चालणार नाही. मग आम्ही वेगळे राहू लागलो. थोडेफार जाणे–येणे असे.

काही वर्षांनी माझ्या सासऱ्यांच्या मृत्यूनंतर माझ्या थोरल्या दिरांना मौलवी पद मिळाले. पण दोन वर्षांतच त्यांचा हृदयविकाराने मृत्यू झाला. तेव्हा प्रश्न आला. पतींना मौलवीपदावर बसवण्यात आले. सासूने मला परत घरी बोलावले. माझे पडदा न पाळणे त्यांनी खपवून घेतले.

पुढे दोनच वर्षांनी माझे पतीही हृदयविकाराने मृत्यू पावले. माझ्या मुलाला मी कुराणचे परंपरागत शिक्षण दिले नव्हते. मग वारसाचा प्रश्न आला. तेव्हा आता थोरल्या दिराचा मुलगा गादीवर आहे.

मौलवी घराण्याची खूप मोठी इस्टेट आहे. मोठा थोरला वाडा, गावात घरे, जमीन इ. लोक धर्माला जे पैसे वाहतात, देणगी देतात, तो पैसा हे मौलवी लोक आपसांत वाटून घेतात. यांच्या पैशाला सीमाच नाही. माझे पती हयात असताना या सगळ्याची मी मालकीण होते. पण पतीच्या मृत्यूनंतर ती सर्व जायदाद माझ्या सासूच्या नावावर झाली. आमच्या कायद्याप्रमाणे नवऱ्याची इस्टेट त्याच्यानंतर बायकोला संपूर्ण मिळत नाही. आठवा हिस्सा मिळतो. उरलेली मुलांच्या नावावर. मुलाचा मृत्यू आई-बापाच्या आधी झाला तर त्या मुलाच्या बायका मुलांना मिळण्याऐवजी ती परत त्या आईबापांकडे जाते. आता माझ्या मुलांना अगदीच थोडा हिस्सा मिळणार आहे. तूर्त त्यांच्या मर्जीवर अवलंबून आहे. पण मी माझ्या पायावर उभी आहे. मी बी. ए. असल्याने शिक्षिका होऊ शकले. मुले चांगली शिकत आहेत.

आमच्या जुन्या दिल्लीतल्या मुसलमान समाजात मी काम करते. मुस्लिम स्त्रियांची परिस्थिती फारच वाईट असते. मी पाहते त्या प्रत्येक बाईला सहा ते आठ मुले आहेतच. थोरल्या मुलाच्या कडेवर एक लहान मूल, दुसऱ्याच्या कडेवर आणखी लहान मूल, पुन्हा झोपताना तिच्या प्रत्येक कुशीत दोनदोन मुले असतातच. सकाळपासून रात्रीपर्यंत ती या पोरवड्यातच राहते. तिच्या डोक्याला केवढा त्रास. केवढे कंटाळवाणे जीवन.

म्हणून स्त्रियांनी शिक्षण घेतले पाहिजे. (तालीम हासिल करना चाहिये). केवळ ती शहाणी व्हावी म्हणून नव्हे तर तिला नोकरी करता येईल आणि या घरच्या चिखलातून ती सात आठ तास बाहेर पडेल म्हणून ते आवश्यक आहे.

तसे आमच्या दिल्लीला कशिदा काढायचे काम मुसलमान स्त्रिया घरोघर करतात. पण ते तर त्याहून भीषण आहे. साडी संपूर्ण भरण्याचे रुपया–दोन रुपये मिळतात. जो विकणारा आहे तो त्याचे पन्नास ते साठ रुपये कमावतो. मधले दलालही खूप असतात. अशा कशिदा काढणाऱ्या स्त्रियांचे डोळे दोन-चार वर्षांत अधू होऊ लागतात. अशी दृष्टी गमावलेल्या किती तरी स्त्रिया मी तुम्हांला दिल्लीत दाखवून देईन.

ती रुपया दोन रुपये आणि तिचा मर्द तीन चार रुपये असा चार पाच रुपये रोज पडला, तर आठ दहा माणसांच्या कुटुंबाला तो काय पुरा पडणार आहे ? मग मुले उपाशी शाळेत जातात. उपाशीपोटी शिक्षण होत नाही. मग अल्पवयात इतर उद्योगांना लागतात. असे सगळे हे दुष्टचक्र आहे.

आमच्या दिल्लीत एक अहमद फिशोरी म्हणून गृहस्थ आहेत. त्यांची स्वतःची हॉटेल्स आहेत. त्यांना एकंदर अकरा बायका आहेत. तीन बायका एका घरी राहतात. बाकी दोन या हॉटेलात, दोन दुसऱ्या– अशा रीतीने राहतात. त्या अकरा पैकी बऱ्याच जणींना सहा ते आठ मुले आहेत. हे गृहस्थ बऱ्याच प्रजेचे मालक आहेत.

बरे, इतका संसार वाढवणारा माणूस दिसायला हसीना असेल किंवा तब्येतीने ठणठणीत असेल असेही नाही. अगदी किडकिडीत, दिसायला खप्पड आहे.

म्हणून काही झाले तरी स्त्रियांनी शिकून आपला प्रपंच उभा केला पाहिजे. म्हणजे पुढचे गाडे बरेचसे वळणावर येऊ शकेल. आम्ही काही स्त्रियांनी दिल्लीला एक नॅशनल वूमेन असोसिएशन काढली आहे आम्ही शिष्टमंडळ घेऊन पंतप्रधान इंदिराजींना निरनिराळ्या मागण्या घेऊन भेटलो आहोत. पुण्याच्या मुस्लिम महिला परिषदेला आम्ही पन्नास महिला येणार होतो. पण युद्धामुळे, ब्लॅकआउटमुळे येऊ शकलो नाही.

मी अनिसून रहमान.

पटन्याचा राहणारा. परचमे-हिंद या उर्दू साप्ताहिकाचा संपादक. लाल बहादूर शास्त्रीजींनी दिल्लीत बोलावून घेतले, तेव्हापासून परचमे-हिंद दिल्लीत आले. आधी गांधींच्या स्वातंत्र्य-चळवळीत. नंतर ह्या पत्राद्वारे मुस्लिम जातीय-वादाविरुद्ध थोडेफार काम केले.

काम करताना मुस्लिम आणि हिंदू यांचे खूप भिन्न भिन्न अनुभव आले. एकच तीन चार वर्षांपूर्वीचा प्रसंग बघा. एका मुस्लिम सभेत लीगवाले नेते जोर-जोरात सांगत होते की, आम्हाला हे लोक उगीचच देशद्रोही म्हणतात. आम्ही

याच राष्ट्राचे नागरिक आहोत. मी मध्येच उठून सांगितले की, जर तुम्ही राष्ट्रीय आहात तर ही सभा संपल्यावर राष्ट्रगीत होऊ द्यात. त्यावर सभेत खूप गोंधळ झाला. मला लोक मारायला धावले. त्या गोंधळात सभा उधळली गेली.

दुसरे दिवशी एका आर्यसमाजिस्ट पेपरमध्ये अशी बातमी छापली होती की, अनिसूर रहमानाने स्वतःच्या पब्लिसिटीसाठी हा स्टंट घडवून आणला. त्यानंतर मी परचमे-हिंदचा अग्रलेख लिहिला. त्याला शीर्षक दिले– 'हमको दोनोंने मारा.'

'मुस्लिम कम्युनॅलिझम' विषयी मला विचारले जाते, कम्युनॅलिझम ही काही वाईट गोष्ट नाही. त्यांनी मुस्लिम जमातीचे भले व्हावे असे वाटते तर ठीक होते. पण तसे नाही. त्यांना त्याबरोबर हिंदूंचे वाईट व्हावे असे वाटते. हिंदूंचे वाईट झाले की यांना बरे वाटते. आता तुमच्या हिंदूंच्या मुली परीक्षेत पहिल्या येतात आणि फोटो पेपरमध्ये छापून येतात, तेव्हा हे मुसलमान नाखूष असतात. म्हणून माझे मत झाले आहे की, इथला इस्लाम हा खरा इस्लामधर्म नाहीच आहे. हा प्रतिक्रियात्मक, संरक्षणात्मक इस्लाम आहे.

उदाहरण घ्यायचे झाले तर धार्मिक मनुष्याला नमाज पढायचा असेल तर तो आपल्या घरी, पश्चिमेला तोंड करून पढू शकतो. पण इथले तसे नसते. इतके हजार लोक या वेळेस येथे नमाज पढतात हा 'शो' त्यांना हिंदूंना दाखवायचा असतो. सगळ्यांनी दाढी वाढवायची असाही त्यांचा हट्ट यापोटीच असतो.

त्यांच्या डोक्यात 'नंबर' चा प्रभाव इतका आहे की, तो कसा काढायचा हा प्रश्न आहे. आपण इतके कोटी आहोत इत्यादी. तुम्ही सच्चे धार्मिक आहात ना मग नंबरचा प्रश्न येतो कुठे ? गांधी म्हणत, एकला चलो रे. मी एकटा असेन किंवा करोडो लोक माझ्याबरोबर असतील, मी सत्याग्रह करणार. तुमचे तसे का नाही ? आठ कोटी की दहा कोटी यावर धर्म कसा अवलंबून असू शकतो हे कळत नाही.

ज्या गोष्टी खतम करायला इस्लामचा जन्म झाला, त्याच गोष्टी इथला इस्लाम आज करून राहिला आहे. मी तर त्याही पुढे जाऊन म्हणेन की, 'कुराणमें लिखा हो तो भी आज तुम्हे दुनियाके साथ चलना होगा !' कुराणमध्ये अमुक आहे आणि तमुक नाही ही भाषा आपण बंद केली पाहिजे. कुराणमध्ये सांगितलंय मूर्तिपूजा करू नका, तस्वीर काढू नका. मग हाजला जाताना पासपोर्टवर फोटो का लावता ? सिनेमा का पाहता ?

आमच्या मुल्ला-मौलवींचा नखराच जास्त. लांब दाढी, लांब कोट. ड्रेसवर जास्त भर. पहाटे पाचला नमाज पढायला जायचे. मक्केमध्ये तिकडले सगळे या दाढीवाल्यांचा तिरस्कारच करतात. मी हाजला गेलो होतो, तेव्हा आमच्या उत्तर

हिंदुस्थानातले अगदी प्रसिद्ध संत फुलवारीसाब तिथे भेटले. तिकडे त्यांना अक्षरशः कोणी विचारत नव्हतं. मला त्यांनी विचारले, ‘ आप इधर कैसे ?’

मी म्हणालो, ‘ आपका इस्लाम किधरसे निकला, वो देखने आया । ’

हिंदूमध्ये पण जातीयवादी आहेत. पण सर्वसाधारण हिंदू त्यांच्यामागे गेला नाही. तो गांधींच्या मागे गेला. हे आपण लक्षात ठेवलं पाहिजे. मुस्लिम नेते हाक देत असतात, एक हो जाओ, आपको हक माँगना है ।– हे चूक आहे.

मुसलमानांचे भले दोनच माणसांनी केले एक म्हणजे, सर सैय्यद अहमदखान. त्यांनी मुसलमानांना सांगितले, पढते रहो. आणि त्यानंतर हमीद दलवाई– त्यांनी सांगितले, मौलवीझम को खतम करो ।

मुस्लिम महिला परिषद. आलेल्या बहुतेक महिला नवख्या होत्या. त्यांतील बऱ्याचशा स्त्रियांनी ज्याला विचार म्हणतात ते प्रथमच ऐकले. साध्या राजकीय सभांनासुद्धा त्या कधी गेलेल्या नव्हत्या. आपण आलो खरे, पण याचा परिणाम काय होईल याची मनात धाकधूक होती. प्रत्येकजण कुठे ना कुठे या समाजव्यवस्थेत पोळली गेलेली दिसत होती त्यामुळे या परिषदेला कमालीचे गांभीर्य आलेले होते. मौज–मजेचा मागमूस कुठे नव्हता. त्यांच्या हकीगती त्या एकमेकींना सांगत होत्या. सारख्या प्रकारच्या वेदनांनी जणू त्यांच्या चळवळीचा पायाच घातला जात होता.

एका स्त्रीला तिचे डोके मोठे आहे म्हणून तलाक दिला, एका नवऱ्याने लग्नात बायकोकडच्यांनी फर्निचर जुने दिले म्हणून तलाक दिला, एकीच्या चालण्यात खोड आहे म्हणून नवऱ्याने टाकले, अशा अनेक हकीगती ऐकायला मिळत होत्या. दिल्ली स्कूल ऑफ ड्रामाच्या एका सबा झैदी या मुलीला या परिषदेला इतक्या महिला स्वेच्छेने कशा आल्या याचे आश्चर्य वाटत होते. म्हणून ती प्रत्येकीला गाठून विचारत होती की, तुम्ही प्रेशरखाली आलात की स्वतःहून. स्त्रिया तिलाच हसत होत्या. परिषदेत रंगीबेरंगी भडक, फिकट, रंगाचे संमेलनच भरले होते.

अमरावतीच्या एका महिलेला तिच्या पोटात तीन महिन्यांचा गर्भ असताना नवऱ्याने तल्लाक दिला. त्यानंतर शिकून ती शिक्षिका झाली. तिला विचारले, तुम्ही दुसरे लग्न का नाही केलं ? त्यावर ती म्हणाली, पुन्हा मला कुणाकडून ‘ तलाक ’ हा शब्द ऐकायची इच्छा नाही. मी आता तशीच राहणार आणि उरलेले आयुष्य याच कार्याला कारणी लावणार आहे.

---

(‘ साधना ’ साप्ताहिकातून)

# महिला

# अधिवेशनातील

# कडक इस्त्री

**रस्त्यावर** गाड्यांच्या रांगा. मैदानात मोठा पेंडॉल. दारातून आत शिरताना गुलाबपाण्याच्या छोट्या कारंजाचा सौम्य शिडकावा. त्यामुळे झालेली खालची ओलसर जमीन. येणाऱ्याला हा सुरुवातीलाच गोड धक्का.

भव्य मंडपात हजारो स्त्री–पुरुष. समोर मोठा रंगमंच. चढण्यासाठी पायऱ्या. त्यांवर अंथरलेली लांबच लांब गालिचाची पट्टी. बाजूला फुलांच्या असंख्य कुंड्या. उंची देखण्या खुर्च्या. मागे निळ्या मखमलीचा संपूर्ण पडदा. त्यावर मोगऱ्यांच्या झिरझिरत्या माळा. मध्ये मोगऱ्यानेच खोसदार ठसठशीत अक्षरात लिहिलेले– अखिल भारतीय महिला परिषद, अधिवेशन ४० वे, पुणे.

अजून गव्हर्नर यायचे होते.

प्रेक्षकांत उत्तमोत्तम साड्या, त्याना शोभतील, अशा उत्तमोत्तम पर्सा, अंगावर चढवलेले उत्तमोत्तम अलंकार. मॅचिंगचे कुंकू– अशा थाटात असलेल्या महिलांचा मोठाच साठा होता. लाजेकाजेस्तव आलेले, अंग चोरून बसलेले काही पुरुषही अधून मधून दिसत होते. एस्. पी. कॉलेजातल्या आर्टस्च्या वर्गातल्या मुलांसारखे. पुरुषांना फुलांची बटने तर स्त्रियांना मोगऱ्याचे गजरे वाटले जात होते. इतक्या महिला एकत्र असूनही गोंगाट फारसा नव्हता.

तेवढ्यात दूरवरून सायरनचा आवाज ऐकू आला. स्टेजवर इतस्ततः वावरणाऱ्या महिला हातांतले काम टाकून गेटच्या दिशेने धावू लागल्या. तिथे आधी एक रांग होतीच. गव्हर्नरांची काळी लांबलचक गाडी थांबली. मिल्ट्रीच्या वेशातल्या त्यांच्या रक्षकाने दार उघडले. जंगसाहेब बाहेर पडले. यमूताई पुढे झाल्या. न लाजता सहजपणे हस्तांदोलन झाले. ओळखी करून दिल्या गेल्या. ती स्वागत समिती असावी. या पाच मिनिटांच्या मानासाठी दोन तीन हजार रुपये मोजावे लागतात. पद्मिनी राजे पटवर्धन, जयश्रीबाई वैद्य, सौ. गरवारे आदी उदार हृदय स्त्रिया या समितीच्या सदस्या आहेत.

जंगसाहेब घोळक्याबरोबर आत आले. मंडळी स्टेजवर स्थानापन्न झाली. तोपर्यंत स्टेजवर तबारे घेऊन उभ्या उभ्या गीत सुरू झाले होते. ‘अग्रेसर प्रात महाराष्ट्र भारती...’ म्हणणारीचा चेहेरा इतका पडेल आणि आंबट होता की, परप्रांतीय स्त्रियांना हा प्रांत अग्रेसर कसा, असा प्रश्न पडत होता. नंतर ज्योत्स्ना भोळे आल्या. त्यांनी ‘बहु असोत’ हे महाराष्ट्र गीत म्हटले. सुरूवातीलाच महाराष्ट्राचा बडेजाव मारून अखिल भारतीय स्त्रियांचे स्वागत करण्याची ही महाराष्ट्रीय पद्धत खरोखरच अग्रेसर (आणि ॲग्रेसिव्ह) आहे यात शंका नाही.

नंतर संदेश वाचन.

‘आम्हाला अत्यंत आनंद वाटला.’ किंवा ‘मी अधिवेशनास सुयश चिंततो/चिंतिते.’ असे– राष्ट्रपती, पंतप्रधान ते स्थानिक पुढाऱ्यांपर्यंत. लोकांना एकाच वेळी आनंद वाटतो हे एक बरे लफडे आहे. कुणालाही कटाळा नाही येत.

नंतर यमूताई. त्यांनी बेगम अलियावर जंग यांचा परिचय करून दिला. इंग्रजीत बोलताना भलत्या जागी वाक्ये तोडण्याची त्यांची लकब विनोद निर्माण करून जात होती.

नंतर बेगमसाहिबांचे भाषण.

गोऱ्यापान, तरतरीत, उंच, दिसायला देखण्या, वय सांगून पटायचे नाही.

त्या उभ्या राहिल्यावर बायकांमध्ये कुजबूज. बुगड्या आहेत वाटतं. नाही ग, ते तमुक असेल. नाही, नाही. बुगड्याच आहेत. पाहिले तर बेगमच्या कानांच्या पाळीच्या वरच्या बाजूला मागे काही तरी चमकत होते खरे. बायकांना इतक्या लांबून दिसले कसे ? कदाचित त्या शास्त्रातल्या एकाग्रतेपोटी ही नजर आलेली असणार.

बेगमबाईंनी पुण्याची माहितीच सांगायला सुरुवात केली : पुण्यात पर्वती आहे. शनिवारवाडा आहे. इथे गोखले होऊन गेले. टिळक होऊन गेले. पुण्यातून एक मुठा नावाची नदी वाहते. लोकसंख्या अमुक आहे. जवळ सिंहगड आहे .. असे आणि अशा थाटाचे भाषण दीडशे प्रतिनिधी सोडले तर बाकीची तीन चार हजार मंडळी खास पुणेरी होती. त्यांच्या माहितीत बेगमबाईंनी अमोल अशी भर घातली. परप्रांतीय स्त्रियांना माहिती पुरवण्याचे काम मान्यवर उद्घाटकांनी अंगावर का घ्यावे कळले नाही एखादी पुणे परिचयाची पुस्तिका वाटली असती किंवा पाहुणे निवासात एखाद्या स्वयंसेविकेस हे काम दिले असते तरी बेगमसाहिबांचे श्रम वाचले असते. पण मग बोलायला काम उरले असते हा प्रश्न राहिलाच असता. गव्हर्नरांनी खुसखुशीत भाषण केले. नबाबी थाटात नर्मविनोद,– उदाहरण असे– मी माझ्या बायकोला स्वातंत्र्य दिले आहे. आणि त्यापायी स्वतःच्या स्वातंत्र्याचाही त्याग केला आहे. भाषणात त्यांनी बौद्ध स्त्रियांवरील अत्याचारावर जरा ठराव बिराव करा असा सल्लाही दिला.

सभामंडप रंगीबेरंगी साड्यांनी फुलला होता. हातात भारी भारी पर्सेस. सशासारख्या केसाळ. काही शॅमॉय लेदरच्या. बहुतेक सगळ्या इंपोर्टेड. किंमत तीनशे चारशेच्या पुढेच असेल.

पुण्यातले संध्याकाळचे वातावरण. आसपास झाडी होती उकाडा वगैरे अजिबात नव्हता. पण बायकांनी पर्सा उघडून छोटे मोठे उंची पंखे काढून हालवायला सुरुवात केली होती. यमूताईंचा सर्वात मोठा... निळा जर्मनीहून आणलेला. कुणाचा पातळ हस्तीदंती. कुणाचा जपानी.

पर्स, पंखे, साडचा, दागिने, चेहेऱ्यांवरचे रंगांचे थर.

बाहेर पडलो.

बाहेर हमाल पंचायतीच्या बलदेवसिंग काश्मिरींची टरबन दिसली. मागाहून दशरथ पिसाळ दिसले. हळूहळू बरीच ओळखीची माणसे दिसायला लागली. थांबलो.

बाबा आढाव आणि सहकाऱ्यांनी प्रयत्न करून गव्हर्नरांच्या भेटीला स्त्रियांचा मोर्चा आणलेला होता. चारसहा फाटक्या मळकट पातळांतल्या हमाली काम करणाऱ्या स्त्रिया अधिवेशनाकडे भेटायला आल्या होत्या. मोर्चा आधीच्या चौकात अडवला होता. मोर्चातल्या स्त्रियांनी रस्त्यात बैठक मारली होती. हातात फलक होते. 'सौना येथे हरिजन स्त्रीला नग्न करणारांना शासन करा. आम्हांलाही अब्रू आहे. हरिजनांवरील अत्याचारांचा निषेध असो. पंडिता रमाबाईंचा जय असो. म. फुल्यांचा विजय असो.' इत्यादी.

आत दिपलेल्या डोळ्यांना बाहेरचे मळकट दृश्य काही वेळ दिसेच ना. मग सवयीने हळूहळू दिसू लागले.

मालधक्क्यावरच्या आणि गोडाऊनमधल्या ओझी वाहणाऱ्या या बाया. आढावांनी पेपरची बातमी वाचून दाखवल्यावर भराभरा आपले काम सोडून, पैसे बुडवून मोर्चात आल्या. कलेक्टरला बांगडचा नेऊन दिल्या, आणि आता गव्हर्नरना निवेदन द्यायला आल्या होत्या.

आतल्या सोहळ्याची शान कमी होऊ नये किंवा गुलाबपाण्याचा शिडकावा सिमेंट कोळशाच्या फक्कीने माखलेल्या चेहऱ्यांवर पडू नये म्हणून मोर्चा अलीकडेच अडवण्यात आला असावा. आत वूमन्स इमॅन्सिपेशनवर भाषणे करणारी कुणी एकही महिला या स्त्रियांना बाहेर भेटायला आली नाही.

महिला परिषदेच्या उद्घाटनानंतर प्रतिनिधींना एक दोन दिवस आराम होता. आदले दिवशी जयश्रीबाईंकडे सर्वांना गुलाबजांबचे जेवण. दुसरे दिवशी यमुताईंकडे पुरणपोळीचे जेवण. एकदा संयुक्त स्त्री संस्थेतर्फे चहा, तर दुसरे दिवशी पुणे महानगरपालिकेतर्फे. असे दिवस मोठे सुखात चालले होते.

अखेर एके दिवशी विद्यार्थी आणि शिक्षण या विषयावर परिसंवाद सुरू झाला. एस्. एन्. डी. टी. कॉलेजचा लायब्ररी हॉल गच्च भरला होता. समोर

मोठे आडवे टेबल होते. मागे खुर्च्यांमध्ये वक्ते मंडळी बसली होती. मध्यभागी पांढऱ्या साडीतल्या, डोईवर लाल काठाचा पदर घेऊन तो मिनिटामिनिटाला बोटाने सारखा करत समाज कल्याण मंत्री सौ. प्रतिभा पाटील बसल्या होत्या. गोऱ्यापान रंगाच्या, दिसायला ठीकठाक, हजार कॅमेरे आपल्याभोवती लावले आहेत अशा पोझमध्ये, चेहेऱ्यावर शालीनभाव प्रथमपासून अखेरपर्यंत कायम ठेवून त्या बसल्या होत्या.

बाहेर वर लाल दिव्याची गाडी. बाजूला पोलिसांची जीप. आत पत्रकारांची वर्दळ. यामुळे वातावरणात मंत्री असल्याचे प्रत्येकाला जाणवत होते.

परिसंवादात पाँडेचरीचे के. जोशी, म. गांधींचे नातू आणि मॉरल रिआर्मामेंटचे प्रचारक राजमोहन गांधी, मुंबईची विद्यार्थिनी भारती रावकवी इ. मंडळी बोलली सगळ्या परिसंवादात एक प्रकारचा लडिवाळपणा होता. कुणी म्हणावे, मुले फार गुंड झाली आहेत. आईवडिलांचे ऐकत नाहीत. परीक्षेत कॉप्या करतात, सिनेमे पाहतात, इत्यादी. यावर बॉबकट, बेलबॉटममधल्या कॉन्व्हेन्ट गर्लने केस वेळावत म्हणावे की, आमच्या ओल्ड जनरेशनने आमच्यापुढे काही आयडियल्सच ठेवली नाहीत. आमचे पालकच पिक्चर पाहतात, आणि आम्हाला म्हणतात, पिक्चर पाहू नका, अभ्यास करा, मग आम्हाला खूप राग येतो. इत्यादी.

सर्व परिसंवाद इंग्रजीत चालला होता.

तिथला स्टार म्हणजे राजमोहन गांधी त्यांनी सुरुवात केली. पाच दहा वाक्यांत त्यांनी विद्यार्थ्यांचे, समाजाचे इम्मॉरल चित्र उभे केल्यावर ते म्हणाले, " यावर उपाय कुणालाही सापडला नाही. मी सांगतो. अगदी एका वाक्यात."

सभेची उत्सुकता भलतीच ताणली गेली.

दोन-चार क्षण थांबून त्यांनी पोतडीतून उपाय काढून सांगितला– ' रिमेक द वर्ल्ड अंडर गॉड्स् गाइडन्स ' (देवाच्या सांगण्यानुसार जग पुन्हा बांधा.) आली का पंचाईत ! हा गाइडन्स कोण आणणार ? पुन्हा राजमोहनकडे जाणे आले. मग राजमोहनांनी मुंबईच्या एका इंजिनीअरिंग कॉलेजातल्या तरुणांची गोष्ट सांगितली त्यांनी ठरवले आहे– मी पुन्हा सांगतो– त्यांनी ठरवले आहे की, पुढच्या परीक्षेच्या वेळेस कुणी विद्यार्थी कॉपी करताना आढळले तर ते उठून म्हणणार आहेत—

' स्टॉप इट.'

हा शब्द राजमोहनांनी इतक्या जोरात ओरडून म्हटला की, तमाम बायका दचकून उठल्या. बऱ्याच जणींची झोप उडाली. कुणाला वाटले आपण पेंगत होतो,

आपल्यालाच उद्देशून म्हटले. पण नाही– असे लक्षात आल्यावर पुन्हा मूळ कार्यक्रम सुरू.

राजमोहनांचा गाइडन्स् असा : कॉपी करणाऱ्या मुलाने अंतरीच्या देवापुढे पश्चात्ताप व्यक्त करायचा आणि गाइडन्स् घ्यायचा.

एका मुलीने उठून सांगितले, पण मी कॉपी केली त्याचा मला पश्चात्तापच वाटला नाही तर ? यावर राजमोहन म्हणाले, नाही कसा ? पश्चात्ताप झालाच पाहिजे.

चार पाचजणी उठून म्हणाल्या, पण नाही झाला तर काय करायचे ?

नंतर एका प्रसंगी एका मुलीने त्यांना विचारले, समजा, एखाद्या शिक्षिकेने विद्यार्थ्यांसमोर तिच्या पूर्वायुष्यातल्या लैंगिक जीवनाविषयी कबुली दिली तर काय होईल ?

यावर राजमोहन म्हणाले, नाही– नाही. आपण काही डिस्क्रिशन केलेच पाहिजे. त्यावर पुन्हा गिल्ला. डिस्क्रिशन कसे ? गॉड्स् गायडन्सला हे चालेल कसे ?

हे तुरळक प्रसंग सोडता राजमोहननी गायडन्स गाजवले. त्यांचे भाषण चालू असता यमुताईना स्फूर्ती आली आणि त्या लज्जित मुद्रेने त्यांच्या कानात काही तरी बोलल्या. त्यावर राजमोहननी तो गौप्यस्फोट केला. त्यांच्याजवळ यमुताईंनी लहानपणी आपण चिंचा चोरून खाल्ल्या होत्या अशी कबुली दिली होती. काही बायका कुजबुजल्या. मागची कशाला, आताच्या पापांची कबुली देऊन पाहावी. पण हे सोडले तर यमूताईंच्या कबुलीजबाबाने सगळ्या महिला सद्गदित व्हायच्या बेताला आल्या होत्या.

समोर एक बाई बसायला आल्या. जयश्रीबाईंनी स्वतः खुर्ची आणून दिली त्या अर्थी बड्या घरच्या असाव्यात. अंगावर भारी, भरगच्च जरीचा शालू होता. चाळा म्हणून अंगावरचे दागिने मोजून लिहू लागलो. १. मंगळसूत्र, २. तन्मणी, ३. बोरमाळ, ४. मोत्याचे तोडे, ५. पाटल्या, ६. बांगड्या, ७. कुड्या... इत्यादी.

एक अनुसयाबाई पांढरे नावाच्या अकलूजच्या बागाईतदार बाई उठून राजमोहनना म्हणाल्या, आमच्या कॉलेजात पोरांनी कॉपी केली, तेव्हा विद्यापीठाने केंद्रच बंद केले. आणि संस्थाचालकच ग्रँट मिळवण्यासाठी, रिझल्ट चांगला लावतात. आणि कॉपीला उत्तेजन देतात. त्याला काय करायचे ?

राजमोहन ताड्कन् म्हणाले, मग सोपे आहे. तुम्ही गव्हर्मेंटकडे अर्ज करा. पेपरमध्ये पब्लिसिटी द्या; म्हणजे मंत्र्यांना समजेल. यावर मध्यप्रदेशातली एक बाई म्हणाली, पण सगळ्या संस्थांना वर राजकारणातला संबंधित माणूस आधाराला असतोच. त्यामुळे सरकारही काही करू शकत नाही.

यावर राजमोहननी थातुरमातुर उत्तर दिले. शेवटी मंत्र्यांचे भाषण.

बाईंनी इंग्रजीत भाषण दिले. कॉपी करणारांची सरकारने गय करता कामा नये. (पदर सावरला.) पालकांनीसुद्धा आपल्या पाल्यांना संरक्षण देता कामा नये (पुन्हा पदर) असा प्रकार.

येथपर्यंत ठीक चालले होते.

तुमच्या इथली चर्चा चांगली झाली. विशेषतः राजमोहन गांधींचे विचार ऐकायला मिळाले. चर्चा इतकी चांगली की, खुद्द मलाही त्याचा फायदा झाला **(पदर).**

त्यापुढे काय झाले कुणास ठाऊक.

त्या म्हणाल्या, मी आता तुम्हांला जागतिक विद्यार्थी चळवळीविषयी माहिती सांगते. जपानमध्ये अमुक झाले. फ्रान्समध्ये तमुक झाले. क्यूबामध्ये असे झाले. इटलीत तसे झाले... देश संपेनात. भाषण हटेच ना.

बरे, ही माहिती का सांगताहेत हेच कळेना. कानात कुणी कुजबुजले, पी. ए. ने लिहून दिलेले भाषण.

चर्चा चालू असता एक क्षणभर लाइट गेले. दुपारची वेळ असल्याने उजेडाचा प्रश्न नव्हता. पंख्यांचा वेग कमी होऊ लागला. तेवढ्यात पुन्हा लाइट आले, पण तेवढ्या दरम्यान बायकांनी आपापल्या पर्सा उघडून घाईने फॅन्स पसरून ते भराभर हलवायला सुरुवात केली.

परिसंवादानंतर गट पाडून चर्चा करण्यात आल्या. दुपारी त्यांचे अहवाल सांगण्यात आले. सर्वांच्या चिंतेचा विषय विद्यार्थी हा होता. ' जनरेशन गॅप ' हा शब्द हुकमी वापरला जात होता. उपायही सुचवले जात. उदा.– विद्यार्थ्यांनी दंगल करू नये. शिक्षकांनी नीट शिकवावे. पालकांनी आदर्श व्हावे, इत्यादी. इतके सोपे उपाय आपल्याला इतके दिवस कसे सापडले नाहीत, याचे आश्चर्य आणि विषाद वाटला.

रात्री ७॥ च्या पुढे ठराव सुरू झाले.

ठरावात बऱ्याच गमती–जमती होत्या. समाजाला बरेच आदेश देण्यात आले होते.खास बायकी टच म्हणजे प्रतिनिधींची गैरसोय झाल्याबद्दल आणि फर्स्ट क्लासचे कन्सेशन न दिल्याबद्दल रेल्वेमंत्रालयाविरुद्ध निषेधाचा ठराव करून त्यांना तो पाठवण्यात आला. रेल्वे मंत्रालय जर पुरेसे रसिक असेल तर ते महिलांना त्यांचा रुसवा काढणारे एखादे पत्र पाठवून धन्य होईल.

सगळ्यांत गाजत होता तो ठराव म्हणजे सीलिंगचा. अकलूजच्या पांढरेबाई या बाबतीत फार्मात होत्या. ठरावाच्या आधी त्यांना भेटलो. त्या म्हणाल्या, अहो, कारखानदाराच्या बायका त्यांच्या डायरेक्टर बोर्डावर असतात. कुणी धंदेवाला असला तरी बायकोला पार्टनर करून घेतो. मग आम्ही शेतकऱ्यांच्याच बायकांनी काय पाप केले आहे ?

विचारले, तुम्ही म्हणता, कुटुंब घटक धरून कायदा करू नका. व्यक्ती हाच घटक धरा. यामध्ये स्त्रियांचा फायदा कसा होतो ?

अहो, व्यक्ती हा घटक नाही धरला तर कृत्रिम घटस्फोट देऊन लोक वेगळी कुटुंबे दाखवतील, आणि स्त्रीचे जीवन सुरक्षित राहणार नाही. आताच आम्ही काही तरी केले तर होईल, म्हणून मी अकलूजच्या ५–६ स्त्रिया घेऊन आले आहे.

ठरावांची वेळ उशीरा ठेवल्याने पुण्यातल्या बहुतेक बायका घरोघर गायब झाल्या होत्या ज्या राहिल्या त्यांच्या उपस्थितीत ठराव भराभरा उरकण्यात आले. त्यातही सीलिंगचा ठराव बराच खाली.

पद्मिनीराजे पटवर्धन या ठरावाच्या बाजूने बोलल्या. ठराव पास झाला.

मला हे समजले नाही की, व्यक्ती काय, कुटुंब काय, काही घटक धरल्याने स्त्रीच्या सुरक्षिततेवर कसा काय परिणाम होतो ते. एकंदर स्त्री समाजाच्या गुलामगिरीचे ते काही मूळ कारण नव्हे. सध्या स्त्रीच्या अंगावरले दागिने तिच्या मालकीचे, स्त्रीधन म्हणून ओळखले जातात. ती त्याची कायदेशीर मालकीण असूनही नवऱ्याने ते मागितले असता ती त्याला देव मानते म्हणून म्हणा, घाबरते म्हणा, किंवा काही वाटो न वाटो, तो हिसडा मारून ते दागिने घेत असेल म्हणा– तिला ते द्यावेच लागतात. सध्या बागायतदारांच्या जमिनी त्यांच्या स्त्रियांच्या नावावर आहेत. म्हणून त्यांना घरात काही वेगळे वजन प्राप्त झाले आहे का ? नवऱ्याने कागदावर बोट दाखवून कुठे सही करायची ते दाखवायचे आणि त्यावर बाईने निमूट सही करायची, असाच रिवाज.

स्वतः शिकून नोकरी करीत स्वतःच्या पायावर उभी असलेली स्त्री आणि एका मोठ्या कुटुंबातली– जिच्या नावावर कायद्याच्या सोयीसाठी काही ज़मीन आहे अशा स्त्रीमध्ये आपण निश्चितच फरक करायला हवा.

पांढरेबाईंच्या नावावर दहा एकर (बहुधा सर्व बागायती) जमीन आहे. त्या म्हणतात, आम्हा शेतकऱ्यांना कुणी वालीच नाही.

बड्या बागाईतदार माळ्यांशी बोलले तरी पेट युक्तिवाद सर्वांच्या तोंडी असतात. कामगारांची संघटना असते, कारकुनांची संघटना असते, अगदी चपराशांचीसुद्धा असते. आम्ही शेतकरी मात्र संघटित नसल्याने आमच्याविरुद्ध कुणीही बोलतो, कायदा करतो. अरेरे.

उलट आहे. आज बड्या शेतकऱ्यांच्या लॉबीइतकी ताकदवान लॉबी दुसरी कुठली नाही. देशाची धोरणे यांची सोय पाहून ठरवली जातात.

पुढं ते म्हणतात, असे वाटते, हे सर्व विकून शहरात जाऊन नोकरी केली असती तरी बरे झाले असते.

हाच सूर पांढरेबाईंचा. त्या स्त्री म्हणून बोलत असण्यापेक्षा बागाईतदार घरातल्या एक म्हणून बोलत असाव्यात. एरवी त्यांनी असे म्हटले असते की, आता अशी परिस्थिती येणार, तेव्हा कृत्रिम घटस्फोटाचे प्रमाण वाढणार, त्याविरुद्ध आपण आपला आवाज उठवला पाहिजे. अशा रीतीने घटस्फोटित व्हायला घरच्यांना आपण नकार दिला पाहिजे.

म्हणजे त्यांची लढाई घरच्यांशी– त्यांना पारतंत्र्यात ठेवणाऱ्या खऱ्या शक्तींशी झाली असती. समाजजीवनात न्याय आणणाऱ्या पुरोगामी कायद्याविरुद्ध ही लढाई करणे चुकीचे आहे.

महिला परिषद पाहिली.

वाटले, महिला परिषद हे नाव अपुरे आहे. महिलांच्या मागे त्यांचे सांपत्तिक दर्जाचे विशेषण लावायला हवे. इथे कोण पुढे असते ? जिला चार वाक्ये सलग बोलता येत नाहीत, बरे न बोलून कार्य करणारी असती तर ठीक– पण त्याही नावाने शून्य असलेली, केवळ कारखानदाराची उद्योगपत्नी आहे, या पॉइंटवर सरळ सरळ अध्यक्षा होऊ शकते. यासाठी महिला जगतातला शब्द म्हणजे ' साड्या आणि गाड्या.' ह्या साड्या-गाड्यावाली बाईच इथे मिरवणार.

उद्घाटनासाठी पेरूगेट भावेस्कूलच्या पटांगणात मंडप घातला होता. तीन–चार तासांचे काम. मांडववाल्यांचे बिल आठ ते दहा हजार रुपये झाले, असे कळले. इतर खर्चाची बातच अलग.

पैसे मिळाले. किती असावेत ?

अंदाज असा– स्वागत समितीतल्या सदस्यांकडून तीन हजार, दोन हजार घेतले. ते बारा हजार. स्मरणिकेतल्या जाहिरातीचे तेत्रीस हजार झालेत. शंभर सदस्य केले, त्यातल्या पासष्टजणींनी प्रत्येकी शंभर दिले, उरलेल्यांनी जरा कमी. ते सात–आठ हजार, हे इथेच वेचाळीस हजार.

खर्च केला म्हणावे तर परप्रांतीयांकडून पाच दिवसांचे राहण्याजेवणाचे पन्नास, चौदा रु प्रवेश फी, दहा रुपये वाहतूक खर्च, असे घेतलेलेच आहेत. यात यमुताई, जयश्रीबाई यांनी घरी जेवणे दिली. त्याचेही पैसे वाचलेच आहेत.

एवढा खर्च केला तरी म्हणणे नाही. पण भारतीय स्त्रियांच्या बाबतीत एखादे पाऊल पुढे पडले आहे का, तर तसे नाही. उलट सीलिंगला विरोध करून

पावले मागेच पडत आहेत. आज वरवरचा थर जरा सुधारल्यासारखा वाटतो आहे. त्याखाली काय आहे याची अस्पष्ट जाणही इथे कुणाला दिसली नाही. मुस्लिम स्त्रियांना तलाकपासून सोडवण्याची तळमळ नाही. अलियावरजंगनी सुचवल्यावर आयत्या वेळेस बौद्ध अत्याचारांच्या निषेधाचा ठराव आला. मला त्या ठरावांचेही फार महत्त्व वाटत नाही. ठरावाच्या निमित्ताने, किंवा एकंदर अधिवेशनात या महिला कार्यकर्त्यांच्या वागण्या–बोलण्यात आपल्या पलीकडच्या विश्वाविषयी साधी माहिती किंवा आस्था आढळली नाही, हे फार दुःखदायक आहे.

स्वतः कार्य करण्याचे राहोच, पण दारात फलक घेऊन उभ्या राहिलेल्या दलित महिलांना भेटण्याचा, आत येऊन बसायला सांगायचा, साधा उपचार या उच्चभ्रू महिलांना सुचू नये ? ज्यांच्या कार्यामुळे त्या आज स्टेजवर जाऊन बोलू शकतात, त्या फुले, रमाबाई, आगरकर, कर्वे यांच्या तसबिरी स्टेजवर लावायच्या सुचू नयेत ? की त्याने सौंदर्यास बाध आला असता ? प्रतिमा न लावण्याचेही समजू शकेन. आदर व्यक्त करायचा प्रत्येकाचा आविष्कार वेगळाही असू शकतो; पण भाषणात तरी कुठे त्यांचे, त्यांच्या विचारांचे उल्लेख ? नाव नाही. यांना सर्वसाधारण स्त्री समाजाशी कर्तव्यच नाही. ज्यांचे हातावर पोट आहे, त्या अशिक्षित स्त्रिया पोटाला चिमटा घेऊन मोर्चे काढतात, आणि या सुखात, संपत्तीत लोळणाऱ्या उच्च विद्याविभूषित, फॉरेन रिटर्न्ड, शिष्टाचारनिपुण स्त्रिया गजरे वाटण्यात, आणि गुलाबपाण्याची कारंजी उडवण्यात धन्य मानतात.

म्हणजे ' स्त्री-सुधारणेच्या चळवळी सुरुवातीस पुरुषांना चालवाव्या लागतील; कारण स्त्रिया शृंखलाबद्ध आहेत. आणि कालांतराने काही स्त्रियांचा शिक्षित वर्ग तयार झाल्यावर तो वर्गच ही धुरा खांद्यावर घेईल ' असे जे म्हणत, त्याचे धिंडवडेच माजले म्हणा की.

काळावर काही नजरच नाही यांची.

स्वतः हजार–हजार रुपयांचे शालू घालून मिरवता. आक्षेप नाही. पण सोना गावच्या नागवलेल्या दलित स्त्रियांना वीस–वीस रुपयांची दोन लुगडी भेट पाठवायला काय हरकत होती ? त्या लुगड्यांनी त्यांना सांगितले असते, वस्त्र घालणाऱ्या शक्ती तुमच्या पाठीशी आहेत.

पण जाऊ द्या.

या उच्चभ्रू महिलांचे सुख आपल्याला बघवत नाही; म्हणून इतरांची दारुण स्थिती त्यांच्यासमोर आणून सुखात माती नको कालवायला.

बायांनो, तुम्ही असाल तेथे सुखी असा.

---

(' साधना ' साप्ताहिकातून)

# २.
# दोन जातींची संमेलने

# सारस्वत संमेलनातील
# सांस्कृतिक उत्खनन

**शिवाजी** पार्क.

स्काऊट हॉलला लागून एक भव्य शामियाना. त्याचे एक मोठे प्रवेशद्वार. त्यावर अखिल भारतीय सारस्वत समाजाचे सांस्कृतिक संमेलन अशी सोनेरी अक्षरे. आत स्त्रीपुरुषांची मोठी गजबज. आधुनिक वेषातल्या नाकाच्या शेंड्यावर मोठ्या फ्रेमचे चष्मे अडकवलेल्या मुलींची धावपळ. हातात स्मरणिकांचे गठ्ठे. किंवा स्वयंसेवकांचे बिल्ले. किंवा हार-तुरे.

समोर कुंडचा. त्या मागे व्ही आकाराचे छोटे स्टेज. त्यावर टेबल खुर्च्या, टेबलांवर भगवे टेबलक्लॉथ. त्यामागे मोठे स्टेज. त्यावर चार सिंहासने. त्याच्या मागे पडदा. त्यावर धडधडत्या यज्ञकुंडाचे चित्र. ओम आणि यज्ञा यज्ञेन कल्पताम् अशी अक्षरे. एक गो गो मधली मुलगी हातातली फुले कुस्करून स्टेजवर पाकळ्या विखरत आहे. स्टेजपासून, खालच्या स्टेजवरून, समोरच्या पॅसेजमधून प्रवेशद्वारापर्यंत.

शेजारी टी. व्ही. वाले आपल्या कॅमेऱ्यासह बसलेत. त्यांना डॉ. पुणेकर आग्रह करत आहेत, 'आत चारी मठांचे स्वामीजी बसले आहेत, दृश्य फार मनोहर आहे, एकदा नजरेखालून तर घाला.' स्काऊट हॉलचे सजवलेले स्टेज. दोन्हीकडून महिरपी. तिथेही चार सिंहासने. त्यावर स्थूल शरीरांचे चार मठाधीश. खाली कद आणि वर भरजरी पैठण्या पांघरलेल्या. किवळे मठ, काशी मठ, गोकर्ण मठ आणि चित्रापूर मठ. चित्रापूर मठाचे स्वामी बरेच तरुण. प्रत्येक स्वामींच्या पायाशी त्यांची आश्रित मंडळी. प्रत्येक स्वामींजवळ चांदीचे तस्तवजा नक्षीचे भांडे. त्यात नारळ आणि फळे. टी. व्ही. वाले प्रखर दिवे लावतात. मठाधीश दिपून जातात. आधीच सर्व नाटकातली पात्रे वाटत असतात. त्यात आता प्रत्यक्ष शूटिंग. कॅमेरा ज्यांच्यावर असेल ते शेजारच्याशी बोलायचे नाटक करू लागतात. पण सर्व लक्ष मात्र कॅमेऱ्यावर. शेवटी गोकर्ण मठाचे आचार्य उठतात. टी. व्ही. वाला रंगात आलेला असतो. तो स्वामींच्या पायावर कॅमेरा फोकस करून स्टेजवरून उतरतानाचे दृश्य घेतो. त्यांच्या पावलाबरोबर पुढे पुढे जात राहतो. त्यांचे प्रखर दिवेवालेही त्यांच्या बाजूबाजूने धावून प्रकाश टाकत येतात. ही सगळी यात्रा एका दारापाशी थांबते. तिथे स्वामी आत जातात. ती मुतारीवजा बाथरूम असते.

त्यांचे झाल्यावर सर्व स्वामी उठतात. त्यांचे आश्रित त्यांचे चांदीचे नक्षीचे भांडे, त्यांची मागची उशी घेऊन मागून चालू लागतात. दुसऱ्या दाराने सर्व बाहेर कॅडेल रोडवर येतात. तिथे प्रथम वर लाल दिव्याची लांबलचक गाडी आणि पाठीमागे चार अलिशान मोटारी उभ्या असतात. एकेक स्वामी आणि त्यांची मंडळी बसतात. आणि गाड्या चालू होतात. एक छोटेसे वळण घेऊन प्रवेशद्वाराकडे येतात. लोकांचे स्वागत घेत मागच्या स्टेजवर स्थानापन्न होतात.

सभा सुरू होते.

उंच काळसर रंगाचे, निळ्या सुटातले श्री. एस. व्ही. पिकले प्रास्ताविक बोलतात. चारी मठांचे आचार्य एकत्र आले. हा अभूतपूर्व प्रसंग आहे. सर्व भारतातील सारस्वतांनी एकत्र घेऊन आपली प्रगती करून घ्यायला पाहिजे, इ. अध्यक्ष बी. पी.

आडारकर यांचाही परिचय त्यांनी करून दिला. आडारकर हे मोठे इकॉनॉमिस्ट, हाँगकाँग आणि जर्मनीत अँम्बॅसडर होते. दोन वर्षापूर्वीच ते रिडायर्ड झाले. आता सारस्वत कन्सॉलिडेशनच्या कार्यास त्यांनी वाहून घेतले आहे. या समारंभाचे मुख्य पाहूणे रेल्वेमंत्री टी. ए. पै होते. पण ते अपरिहार्य कारणासाठी दिल्लीला गेले होते.

नंतर गुरुपूजन सुरु झाले. प्रत्येकाचा भटजी त्यांच्या पायाशी बसला. मंत्र सुरु झाले. भरजरी महावस्त्र असलेल्या पेटचा आणि पैसे असलेले एक पाकीट त्यांना अर्पण करण्यात आले. क्रेप नायलॉनचे नाजूक हार घालण्यात आले. त्यानंतर स्वामीच्या आशीर्वचनास प्रारंभ झाला.

सभेतून कोकणीत बोला असा आग्रह झाला. गोकर्णमठाचे स्वामी मराठीत बोलणार होते. पण मग तडजोड म्हणून संस्कृतात बोलले. इतर स्वामी कोकणीत बोलले.

सभागृह प्रेक्षकांनी फुलले होते. सर्वांच्या अंगावर भारी कपडे होते. जन्मभर चांगले खाल्ल्यापिल्ल्याचे तेज होते

नंतर सभा सुरू झाली.

टी. ए. पैंचे फुसके भाषण त्यांच्या काकांनी वाचून दाखवले. त्यांचे काका म्हणजे मणिपालच्या उडुपी मेडिकल कॉलेजचे, सिंडीकेट बँकेचे संस्थापक. सारस्वत हा बुद्धीजीवी वर्ग आहे. त्याने देशाची सेवा केली आहे. व्यक्ती आणि समाज यामध्ये जात हा पूल असतो आणि तो आवश्यक असतो. फक्त देशाच्या ऐक्याच्या आड ते येता कामा नये एवढी दक्षता घ्यायला हवी. इ. इ.

तेवढयात सभेत कोणी घाईघाईनं येऊन आडारकरांना कानात सांगू लागले. एकमेकात कुजबूज झाली. बाहेर काहीतरी गडबड उडालेली दिसत होती.

प्रवेशद्वारापाशी चाळीस पन्नासचा घोळका उभा होता. युवक क्रांती दलाचे बॅनर दिसत होते. हुसेन दलवाई आणि मित्र मोठमोठयाने घोषणा देत होते. दुष्काळात लोक मरत असताना जातीय संमेलने भरवणाऱ्यांचा धिक्कार असो, डाऊन वुईथ कम्युनॅलिझम, शाळेतल्या विद्यार्थ्यांकडून रामनामाचा जप लिहून घेणारांचा धिक्कार असो, इत्यादी हातात पोस्टर्स होती. त्यावर माणूस चंद्रावर चाललाय आणि इकडे रामनामाचा जप, या अर्थाची चित्रे होती. त्या छोटया सभेपुढे प्रा. मे पुं. रेगे यांचे छोटे भाषण झाले. रेगे स्वतः सारस्वत. पण त्यांनी सांगितले, की सारस्वतानी चांगली प्रगती केली आहे—दुसऱ्यांचे शोषण करून. सारस्वत आज इतक्या सुस्थितीत आहेत की त्यांना असं जमायचे काही कारण नाही. खालचे समाज काही मूलभूत मागण्यांसाठी एकत्र जमतात तेव्हा ते समजू शकते. नंतर

' रामनाम जप फेम ' बालमोहन हायस्कूलचे एक शिक्षक इनामदार बोलले. त्यांनी या जपाच्या सक्तीचा निषेध केला.

आतले काही कार्यकर्ते येऊन हे ऐकत होते. रेग्यांना सर्वच ओळखत होते. मनातल्या मनांत त्यांना सूर्याजी पिसाळ इ. शिव्या देत असावेत.

आत सभा चालू होती.

समाजातल्या विद्वानांचे सत्कार चालू होते. काश्मीरचे म. म. जलाली, कैलासनाथ काटजूंचे चिरंजीव, सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश श्री. शिवनाथ काटजू, मणिपालचे पै आणि इतरांचा सत्कार करण्यात आला.

शेवटी आडारकर बोलले. एक पान संस्कृतात आणि नंतर इंग्रजीत.

आता लोक सभा ऐकत होते. मागच्या सिंहासनाधिष्ठित मठाधिशांकडे कोणी बघत नव्हते. मागे तसवीरी लटकावल्याप्रमाणे सर्व स्वामी स्तब्ध बसले होते.

आडारकर सांगत होते. ' सारस्वत रिव्हायव्हलिझम हे आमचे ध्येय आहे. सारस्वत कन्सॉलिडेशनसाठी आम्ही सर्व प्रांतांत हिंडून आलो. ही परिषद एका जातीची आहे पण जातीद्वेषावर आधारलेली नाही. जातीय प्रश्न हा नेहमी दोन धर्मातला असतो. इथे तसा काही संबंधच नाही. हरिजनांचा प्रश्न वेगळा आहे. स्वच्छता करणारी उपकरणे आणली, शिक्षण दिले की हा प्रश्न सुटेल.

म्हणून या परिषदेचा जातीय म्हणून निषेध करणे चूक आहे. जगात कुठेही गेलात तरी ग्रुप असतातच. आम्हाला काही रशियासारखी कॉमिसार सोसायटी नको आहे. उलट जात हे देशाला प्रगतीकडे नेणारे चांगले साधन आहे. म. गांधी म्हणत, जाती नष्ट करू नका. नेहरू जातींवर हल्ला करीत असत. नेहरू, जाती आणि धर्म व अस्पृश्यतेच्या प्रश्नात गोंधळ करीत. म्हणून तसे होई.

वर्णाश्रम ही आपल्याकडची आदर्श व्यवस्था आहे. त्यातली स्पेशलायझेशनची कल्पना आधुनिक जगाला जवळची आहे. पण आपल्या लोकांना हे समजत नाही. ब्राह्मण असणे हा आजकाल गुन्हा झाला आहे.

तिकडे अमेरिकेत ' हरेकृष्ण—हरेराम ' ची लाट आली आहे, त्यांना त्याचे महत्त्व समजते. पण आमच्याकडे मात्र रामनामजपाचं नाव काढताच पेपरमध्ये आमच्यावर टीका होते.'

टाळ्यांच्या गजरात भाषण संपले.

शेवटी राष्ट्रगीत झाले. मठाधीशांच्या तसबिरी जागच्या हलल्या नाहीत. कुणालाही त्यात वावगे वाटले नाही.

सकाळचे दहा. पांढऱ्या फेटयातले, पोपटासारख्या नाकाचे पंडित जलाली बोलत आहेत. समोर प्रचंड जाहिरातींच्या स्मरणिका पडल्या आहेत. एक संयुक्त

सारस्वतचा अंकही आहे. तीनचार पुस्तकेही दिसत आहेत. सर्वांची छापलेली भाषणेही पडली आहेत.

सभेत तरुण मुले फारशी नाहीत. ती बाहेर चौकशीच्या पेंडॉलमध्ये ट्रँझिस्टर भोवती घोळक्याने बसून कानात प्राण आणून कॉमेंट्री ऐकत आहेत. आत स्टेजवर गोगो आणि पायघोळ बेलबॉटममधल्या मुलींचा घोळका गोल करून बसला आहे. आणि रिकाम्या पाकिटात स्मरणिका आणि इतर मटेरियल भरायचे काम त्या शिस्तीत करीत आहेत.

जलाली सांगतात, 'पंजाबात सरस्वतीच्या काठी राहणारे हे सारस्वत परचक्रामुळे काश्मीरच्या डोंगराळ भागात जाऊन राहिले. तिथे आम्हाला सारस्वत कल्चर टिकवण्यासाठी काय सोसावे लागले आहे याची आपल्याला कल्पना येणार नाही.

उत्तरीय सारस्वत आणि दक्षिणात्य सारस्वत यांच्यामध्ये नक्कीच नाते आहे आपल्यात कुठल्या गोष्टींमध्ये रीतीरिवाजांमध्ये साम्य आहे हे आपण शोधून काढले पाहिजे. कुठले भेद असतील ते विसरले पाहिजेत.'

नंतर काळा जोधपुरी कोट, फरकॅप आणि खाली शेरवानीतले काटजू बालले. हे काटजू उत्तर प्रदेशातले सारस्वत. स्वतः शाक्त संमेलनाचे अध्यक्ष त्यांनी काश्मिरी सारस्वतांचे रीतीरिवाज सांगितले. ते शैव आहेत. पण तरीही पंचायतनाची पूजा करतात. हा त्यांच्या दृष्टीने उत्तर-दक्षिण सारस्वतांमधला दुवा आहे. आर्य दुसरीकडून कुठून इथे आले ही थिअरी त्याना मान्य नाही. ते या सप्तसिंधूच्याच प्रदेशातले आहेत असे सांगितले. नंतर पं. जलालींनी ते म्हणणे खोडून काढले. वाद एकदम विश्वाच्या उगमापर्यन्त गेल्यामुळे सर्वांचीच पंचाईत झाली.

तेवढ्यात खालून जे. एस. राव यांनी काटजूंना काही प्रश्न विचारले. काहो, रवींद्रनाथ टागोर आणि विवेकानंद हे सारस्वत होते का ? काटजू म्हणाले, नक्की कल्पना नाही. पण तसे असू शकेल. नंतर रावांनी विचारले, डोग्रा ह्या जमानीचा सारस्वतांशी काही संबंध ? काटजू म्हणाले, डोग्रा भागात काही सारस्वत असतील.

तेवढ्यात काटजूंना काहीतरी आठवले. ते म्हणाले, विवेकानंदांची शताब्दी दोन-तीन वर्षांपूर्वी झाली. तशी स्वामी रामतीर्थांची शताब्दी यावर्षी आहे. आणि रामतीर्थ हे सारस्वत आहेत, म्हणून माझी अशी एक इच्छा आहे की, आपल्या लोकांनी या कार्यक्रमात भाग घ्यावा. मी कमिटीला असे सुचवले आहे की, रामतीर्थ सारस्वत म्हणून त्यांचे स्मारक काश्मिरच्या उत्तरेला करा. वर रामतीर्थ आणि खाली कन्याकुमारीला विवेकानंद, असे झाले तर सर्व देशांतून धार्मिक सारस्वत करंट वाहू लागेल.

नंतर केरळचे सारस्वत श्री. मलय्या बोलले. ते तर फारच कट्टर सारस्वत दिसले. त्यांच्या भाषणाला टाळयाही खूप पडत होत्या. केरळमधे केरळचा सांस्कृतिक

इतिहास लिहिला जात असताना सारस्वतांचा फारसा उल्लेख नव्हता. तेव्हा चिडून यांनी हिन्दूमधे पत्र लिहिले. सारस्वतांची काय काँट्रचुब्युशन असे त्यांना कमिटीतल्या लोकांनी विचारताच त्यांनी सांगितले की तुमच्या स्त्रियांच्या अंगावर आज साड्या आणि चोळ्या दिसत आहेत ती आमची काँट्रचुब्युशन. आम्ही सारस्वतांनी तुम्हाला सिव्हिलायझेशन शिकवली. यावर अर्थातच टाळ्या. एक ताम्रपट तिथे धूळ खात पडला होता. तो यांनी शोधून काढला. वाचला. आणि दाखवून दिले की, हा सारस्वतांच्या काशी मठाचा लेख आहे. मलप्पांनी थोडक्यात इतिहासही सांगितला. परशुरामाने सारस्वतांना इथे गोव्यात सेटल केले. त्यांच्या सहासष्ट वस्त्या केल्या. त्यांची देवी दामोदरीदेवी. पुढे केरळमधे सारस्वत परागंदा झाल्यावर त्यांनी तिथेही वस्तीचा तोच पॅटर्न केला.

आम्ही केरळमधे बाहेर लुंगी, भाषा त्यांची; पण घरात आपला ड्रेस, भाषा कोकणी. आपण आपले वैशिष्टच सोडले तर आपण नष्टच होऊ. कोकणी भाषेसाठी तिथल्या विद्यापीठात मी भांडून यश मिळवले. कोकणी ही स्वतंत्र भाषा आहे अशी महाजन कमिशनपुढे साक्ष दिली आणि त्यांच्या अहवालात त्यांनी हे मत ग्राह्य धरले आहे.

त्यांचे संपल्यावर अध्यक्षांच्या परवानगीने एन. एस. राव म्हणून गृहस्थ बोलले त्यांनी तर फारच धमाल उडवली. आर्मेनिया नावाचा रशियात खूप जुना प्रांत आहे. त्याची बहुधा दोन हजारावी अनव्हरसरी होती. मला तिथे फिरण्याची परवानगी रशियाने दिली होती. ती माणसं आरास्थ नावाच्या पर्वताची पूजा करतात. माझी खात्री आहे तो म्हणजे आपला आर्यावर्त. आणि आपल्या सारस्वतांचे उगमस्थान आर्यावर्त असल्याने माझी खात्री आहे की, आर्मेनियन लोक सारस्वतच आहेत. आपला व्याघ्र हा शब्द तिकडे जसाच्या तसा आहे. मी एका आर्मेनियन मुलीबरोबर लग्न केले आहे ती आता प्रेक्षकात आलेली नाही. पण ती सारस्वतांसारखीच दिसते. मी यावर रिसर्च करणार आहे. आणि एक ना एक दिवस सिद्ध करून दाखवीन की मी एका सारस्वत मुलीशी लग्न केले आहे.

यावर प्रचंड कडकडाट.

शेवटी आडारकर. कालचा भारतीय वेष बदललेला. आज क्रीम कलरच्या सूटमध्ये व्यक्तिमत्व फारच रुबाबदार.

ते आधीच्या वक्त्यांच्या भाषणांचा आढावा घेताना म्हणाले, ‘ जलालींचे आर्यांसंबंधीचे बोलणे बरोबर आहे. आर्य हे उत्तरेकडून आले. रशियाभर संस्कृत शब्द खूप विखुरलेले आहेत. जलाली म्हणतात त्याप्रमाणे काश्मिरी सारस्वत कंबरेला जानवे बांधतात. आणि पारशीही तसेच बांधतात. माझी खात्री आहे की पारशीही सारस्वतांचीच एक दूर फेकली गेलेली शाखा आहे. आपण मांसाहारी म्हणून त्यांना त्याचा वैताग येऊन ते इराणात गेले असावेत.

बाय द वे, आपण स्वतःला नुसते सारस्वत म्हणवून घेण्याऐवजी सारस्वत–ब्राह्मण असे म्हणवून घेतले पाहिजे. कारण काही ब्राह्मण आपण मांसाशन करतो म्हणून आपल्याला खालचे समजतात. पूअर पीपल. दे डोंट नो द हिस्टरी.

मनू हाही सारस्वत होता, मला त्या बाबतीत कोणतीही शंका नाही.

आपण सारस्वत म्हणजे ब्रेन आहोत. आपल्याकडे चिवटपणा आहे. आपल्या बांधवांनी धर्म बदलण्याऐवजी मरण पत्करले. कातडी सोलून काढली तरी बधले नाहीत. पण तरी आपल्यात फायटींग स्पिरीट नाही. आपल्यात आता जास्तीत जास्त परशुराम निर्माण झाले पाहिजेत.'

इतका वेळ वैदिक काळात विहरत असलेले आडारकर एकदम सध्याच्या काळात येऊन बोलू लागताच सभेत थ्रिल आले.

ते म्हणाले, ' सध्या आपल्याला हवी आहे सत्ता. पण आपल्यापाशी संख्याबळ नाही. त्यामुळे पॉलिटिक्समध्ये आपल्याला स्थान नाही. एकटे पै काय ते तिथे आहेत हां, काश्मिरी सारस्वतांनी मात्र खूपच स्थान मिळवले आहे. इंदिरा गांधी तर आहेतच. पण त्यांचे सर्व सल्लागार. (धर, हक्सर इ.) हे सारस्वतच आहेत. पण काश्मिरी सारस्वत. इकडले नाहीत. मी स्वतः इकॉनॉमिस्ट आहे. मला इंदिरा गांधींना सल्ला द्यायला बोलावले असते तर मी त्यांना सध्याच्या क्रायसिसमधून वाचवले असते, पण आमच्यामागे सत्ता नाही.

इकॉनॉमिक्समध्ये काही कळत नाही अशी माणसे आज अर्थमंत्री झाली आहेत. मि. वाय्. बी. चव्हाण लोकसभेत अर्थशास्त्रीय प्रश्नावर नॉन्सेस उत्तरे देत असतात. या विषयावर मी जास्त बोलत नाही. कारण मला सारस्वत–मराठा वाद निर्माण करायचा नाही.'

आडारकरांच्या खऱ्या व्यथा बाहेर पडत असताना सभेतले वातावरण फारच जिवंत झाले होते. बऱ्याच टाळ्या घेऊन त्यांनी शेवटी आवाहन केले की, सारस्वतांनो, आपण आपले वैशिष्टय सोडू नका. आपले लहानसहान विधी, आपली भाषा हे जतन करा. नाहीतर आपल्याला वाऱ्यावर सोडले जाईल.

सभा संपली.

दुपारच्या सेशनमध्ये वि. स. पागे अध्यक्ष होते. पागे हे अर्थातच सारस्वत. विषय होता, सारस्वत कन्सॉलिडेशन अ‍ॅन्ड नॅशनल इंटिग्रेशन.

डी. एन. नाडकर्णी म्हणून एक म्हातारे गृहस्थ बोलले. त्यांनी सांगितले, इथे यंग जनरेशन कुठाय ? त्याचे प्रश्न आपण समजावून घेतले पाहिजेत. मधली पुराणे सोडून दिली पाहिजेत. तरुणांचा आणि वेदांचा डायरेक्ट कॉन्टॅक्ट आणून दिला पाहिजे. मी गीता शिकताना एकाने मला सांगितले की, एकशेचव्वेचाळीस वेळा

इतिहास लिहिला जात असताना सारस्वतांचा फारसा उल्लेख नव्हता. तेव्हा चिडून यांनी हिन्दूमधे पत्र लिहिले. सारस्वतांची काय काँट्रिब्युशन असे त्यांना कमिटी-तल्या लोकांनी विचारताच त्यांनी सांगितले की तुमच्या स्त्रियांच्या अंगावर आज साड्या आणि चोळ्या दिसत आहेत ती आमची काँट्रिब्युशन. आम्ही सारस्वतांनी तुम्हाला सिव्हिलायझेशन शिकवली. यावर अर्थातच टाळ्या. एक ताम्रपट तिथे धूळ खात पडला होता. तो यांनी शोधून काढला. वाचला. आणि दाखवून दिले की, हा सारस्वतांच्या काशी मठाचा लेख आहे. मलप्पांनी थोडक्यात इतिहासही सांगितला. परशुरामाने सारस्वतांना इथे गोव्यात सेटल केले. त्यांच्या सहासष्ट वस्त्या केल्या. त्यांची देवी दामोदरीदेवी. पुढे केरळमधे सारस्वत परागंदा झाल्यावर त्यांनी तिथेही वस्तीचा तोच पॅटर्न केला.

आम्ही केरळमधे बाहेर लुंगी, भाषा त्यांची; पण घरात आपला ड्रेस, भाषा कोकणी. आपण आपले वैशिष्टच सोडले तर आपण नष्टच होऊ. कोकणी भाषेसाठी तिथल्या विद्यापीठात मी भांडून यश मिळवले. कोकणी ही स्वतंत्र भाषा आहे अशी महाजन कमिशनपुढे साक्ष दिली आणि त्यांच्या अहवालात त्यांनी हे मत ग्राह्य धरले आहे.

त्यांचे संपल्यावर अध्यक्षांच्या परवानगीने एन. एस. राव म्हणून गृहस्थ बोलले त्यांनी तर फारच धमाल उडवली. आर्मेनिया नावाचा रशियात खूप जुना प्रांत आहे. त्याची बहुधा दोन हजारावी अनव्हरसरी होती. मला तिथे फिरण्याची परवानगी रशियाने दिली होती. ती माणसं आरास्थ नावाच्या पर्वताची पूजा करतात. माझी खात्री आहे तो म्हणजे आपला आर्यावर्त. आणि आपल्या सारस्व-तांचे उगमस्थान आर्यावर्त असल्याने माझी खात्री आहे की, आर्मेनियन लोक सारस्वतच आहेत. आपला व्याघ्र हा शब्द तिकडे जसाच्या तसा आहे. मी एका आर्मेनियन मुलीबरोबर लग्न केले आहे ती आता प्रेक्षकात आलेली नाही. पण ती सारस्वतांसारखीच दिसते. मी यावर रिसर्च करणार आहे. आणि एक ना एक दिवस सिद्ध करून दाखवीन की मी एका सारस्वत मुलीशी लग्न केले आहे.

यावर प्रचंड कडकडाट.

शेवटी आडारकर. कालचा भारतीय वेष बदललेला. आज क्रीम कलरच्या सूटमध्ये व्यक्तिमत्व फारच रुबाबदार.

ते आधीच्या वक्त्यांच्या भाषणांचा आढावा घेताना म्हणाले, 'जलालींचे आर्यासंबंधीचे बोलणे बरोबर आहे. आर्य हे उत्तरेकडून आले. रशियाभर संस्कृत शब्द खूप विखुरलेले आहेत. जलाली म्हणतात त्याप्रमाणे काश्मिरी सारस्वत कंबरेला जानवे बांधतात. आणि पारशीही तसेच बांधतात. माझी खात्री आहे की पारशीही सारस्वतांचीच एक दूर फेकली गेलेली शाखा आहे. आपण मांसाहारी म्हणून त्यांना त्याचा वैताग येऊन ते इराणात गेले असावेत.

वाय द वे, आपण स्वतःला नुसते सारस्वत म्हणवून घेण्याऐवजी सारस्वत–ब्राह्मण असे म्हणवून घेतले पाहिजे. कारण काही ब्राह्मण आपण मांसाशन करतो म्हणून आपल्याला खालचे समजतात. पूअर पीपल. दे डोंट नो द हिस्टरी.

मनू हाही सारस्वत होता, मला त्या बाबतीत कोणतीही शंका नाही.

आपण सारस्वत म्हणजे ब्रेन आहोत. आपल्याकडे चिवटपणा आहे. आपल्या बांधवांनी धर्म बदलण्याऐवजी मरण पत्करले. कातडी सोलून काढली तरी बधले नाहीत. पण तरी आपल्यात फायटींग स्पिरीट नाही. आपल्यात आता जास्तीत जास्त परशुराम निर्माण झाले पाहिजेत.'

इतका वेळ वैदिक काळात विहरत असलेले आडारकर एकदम सध्याच्या काळात येऊन बोलू लागताच सभेत थ्रिल आले.

ते म्हणाले, ' सध्या आपल्याला हवी आहे सत्ता. पण आपल्यापाशी संख्याबळ नाही. त्यामुळे पॉलिटिक्समध्ये आपल्याला स्थान नाही. एकटे पै काय ते तिथे आहेत हां, काश्मिरी सारस्वतांनी मात्र खूपच स्थान मिळवले आहे. इंदिरा गांधी तर आहेतच. पण त्यांचे सर्व सल्लागार. (धर, हक्सर इ.) हे सारस्वतच आहेत. पण काश्मिरी सारस्वत. इकडले नाहीत. मी स्वतः इकॉनॉमिस्ट आहे. मला इंदिरा गांधींना सल्ला द्यायला बोलावले असते तर मी त्यांना सध्याच्या क्रायसिसमधून वाचवले असते, पण आमच्यामागे सत्ता नाही.

इकॉनॉमिक्समध्ये काही कळत नाही अशी माणसे आज अर्थमंत्री झाली आहेत. मि. वाय्. बी. चव्हाण लोकसभेत अर्थशास्त्रीय प्रश्नावर नॉन्सेस उत्तरे देत असतात. या विषयावर मी जास्त बोलत नाही. कारण मला सारस्वत–मराठा वाद निर्माण करायचा नाही.'

आडारकरांच्या खऱ्या व्यथा बाहेर पडत असताना सभेतले वातावरण फारच जिवंत झाले होते. बऱ्याच टाळ्या घेऊन त्यांनी शेवटी आवाहन केले की, सारस्वतांनो, आपण आपले वैशिष्टय सोडू नका. आपले लहानसहान विधी, आपली भाषा हे जतन करा. नाहीतर आपल्याला वाऱ्यावर सोडले जाईल.

सभा संपली.

दुपारच्या सेशनमध्ये वि. स. पागे अध्यक्ष होते. पागे हे अर्थातच सारस्वत. विषय होता, सारस्वत कन्सॉलिडेशन अॅन्ड नॅशनल इंटिग्रेशन.

डी. एन. नाडकर्णी म्हणून एक म्हातारे गृहस्थ बोलले. त्यांनी सांगितले, इथे यंग जनरेशन कुठाय ? त्यांचे प्रश्न आपण समजावून घेतले पाहिजेत. मधली पुराणे सोडून दिली पाहिजेत. तरुणांचा आणि वेदांचा डायरेक्ट कॉन्टॅक्ट आणून दिला पाहिजे. मी गीता शिकताना एकाने मला सांगितले की, एकशेचव्वेचाळीस वेळा

गीता लिहून काढ. मी चौदाव्या वेळी लिहीत असतानाच मला गीतेतून प्रकाश येताना दिसला. तसे आपण आपल्या यंगर जनरेशनकडून वेद लिहून घेतले पाहिजेत.

एक सुटातले सायकॉलॉजिस्ट बोलले, माणूस त्याच्या फॅमिलीचा असतो. फॅमिली नातेवाईक कम्युनिटीची असते आणि कम्युनिटीचा समाज बनतो. म्हणून समाजाच्या विकासाला कम्युनिटी हेच युनिट मानले पाहिजे.

सकाळचे एनेस राव म्हणाले, ' मी एक उदाहरण देतो. एका बापाने मुलाचा अर्धा तास त्रास नको म्हणून एका मासिकातल्या जगाच्या नकाशाचे तुकडे करून दिले आणि जोडून आण असे, सांगितले. मुलगा दहा मिनिटातच परत आला. त्यांनी देश बराबर जुळवले होते. बापाला आश्चर्य वाटले. त्याने विचारले इतक्या पटकन् तू हे कसे केलेस ? मुलगा म्हणाला, त्या नकाशाच्या मागच्या पानावर माणसाचे चित्र आहे ते मी जोडले तेव्हा इकडचा नकाशा आपोआपच जमून आला. तेव्हा आपण माणूस एकसंध केला तर जग एकसंध होईल. तशी आपण आपली जात एकसंध केली तर सर्व समाजच एकसंध होईल.

आपल्या सारस्वतातल्याच चित्रापूर मठाचे म्हणजे कारवार साईडच्या लोकांचे उदाहरण घ्या. त्यांच्यात किती एकी आहे ते एकमेकांना किती धरून असतात. मठाला आपला इन्कमटॅक्स न चुकता देतात. कोणालाही इतरांसारखा इन्कमटॅक्स मागावा लागत नाही.'

शेवटी गगे बोलले.

जेव्हा कुटुंब आणि जात यांच्यात विरोध निर्माण होईल तेव्हा जातीला आपण अग्रक्रम दिला पाहिजे. जात आणि देश यांच्यात देशाला मान दिला पाहिजे देश आणि मानवता यांच्या हितसंबंधांच्या विरोधात मानवतेला मान दिला पाहिजे.

सारस्वत हे निदान कधी फितूर झालेले दिसत नाहीत. सेक्युलॅरिझम ही परकीय कल्पना. तिथली परिस्थिती वेगळी. हिन्दु धर्मासारखा सहिष्णु धर्म तिथे नव्हता.

सरकारने काही करावे अशी अपेक्षा धरू नका. पेन्शन, शिक्षण या व्यवस्था आपल्या जाती–समाजानेच कराव्यात.

इत्यादी.

असे हे सारस्वत प्रकरण.

या निमित्ताने यांची बरीच माहिती झाली हे शंकराचार्यांना मानीत नाहीत. यांचे आद्यगुरू म्हणजे गौडपादाचार्य. हे आद्य शंकराचार्यांचे परात्पर गुरू. गौडपादाचार्यांच्या चार परंपरा सुरू झाल्या. कवळे मठ, गोकर्ण मठ, काशी मठ आणि चित्रापूर मठ. कवळे म्हणजे साधारण गोव्यातले मंगेशी, शांतादुर्गाला मानणारे सारस्वत. चित्रापूर म्हणजे दक्षिण कर्नाटक. केरळातले काशी मठाकडे. या प्रत्येक

मठाकडे गावेच्या गावे, जमिनी इनाम आहेत. इमारती आहेत. प्रत्येकाचे निर-निराळ्या ठिकाणी मठ आहेत.

साधारण प्रत्येक सारस्वत कुठल्या ना कुठल्या मठाचा असतो. कारवारी सारस्वत हे स्वत:ला जास्त मोठे समजतात. त्यात पै, शेणवी इ. मंडळी येतात. हा जास्त सधन वर्ग आहे. संघटित आहे. एक नोकरीला असला की, त्याच्या दहांना तो लावणारच. या उलट गौड लोक या कारवारी लोकांना उडदाळे म्हणजे उडीद खाणारे म्हणून हिणवतात. हे भात खाणारे.

मालवण, दक्षिण रत्नागिरी भागातले सारस्वत सर्वात खालचे. त्यांना कुडाळ-देशकर म्हणतात. स. का. पाटील या जातीचे. खरे सारस्वत यांना जातीतले म्हणायला तयार नसतात. बेटी व्यवहार तरच दूरच. आणि कुडाळदेशकरही यांच्यात फिरकत नाहीत. त्यांनी आपले वेगळे अधिवेशन आधीच उरकून घेतले आहे.

आता चारी मठ एकत्र आहेत. ऑल इंडिया सारस्वत कल्चरल ऑर्ग्नायझेशन (आयस्को) तयार झालेली आहे. हे सर्व कशाला ?

उघडच आहे. प्रत्येक विखुरलेल्या अल्पसंख्य जमातीला आपले विखुरलेले बळ अशा निमित्ताने एकत्र आणून दाब निर्माण करावासा वाटतो. त्यात सारस्वत ही सुशिक्षित आणि पैसेवाली जमात. आडारकर एकदा चक्क म्हणालेच की, आम्हाला सारस्वत ही डॉमिनंट मायनॉरिटी करायची आहे, पण चांगल्या अर्थाने. चांगल्या अर्थाचे शेपूट लावावेच लागते. त्याला काही अर्थ नसतो. आता इंदिरा गांधींचे राज्य आल्यावर यांच्या आशा अधिकच पालवल्या आहेत. आडारकरांना इंदिराजींच्या किचन कॅबिनेटमध्ये जायची स्वप्नं पडत आहेत.

पाग्यांचे आश्चर्य वाटते. कुटुंब–जात–समाज या उतरंडीत जात ही अपरि-हार्यच धरून चालले आहेत. त्या सायकॉलॉजिस्टांचे तेच. 'कम्युनिटी' हा जातीला योग्य शब्दच नाही. फसवा आहे. कास्ट हाच खरा शब्द.

जात हे भारतातले वास्तव जीवन आहे, म्हणून त्याचाच आधार घेऊन रहायला पाहिजे, असा यांचा युक्तिवाद. जात हे वास्तव कोणाला ? खालच्या जातींना. महाराने कितीही शिक्षण घेतले, तरी समाज त्याला जातीनेच ओळखणार आणि खाली ठेवणार. म्हणून त्याच्या जीवनात त्याची जात ही प्रत्येक क्षणी प्रत्यय देणारे वास्तव. ब्राह्मण, मराठे, सारस्वत यांना ही जरूरी नाही. यांनी जातीचे नावसुद्धा काढायला नको, इतके यांना मुबलक मिळते आहे. पण न्हावी, सुतार आपल्या परिषदा भरवतात, तर आपण का भरवू नये, असा प्रश्न हे उच्चवर्णीय एकमेकांना सभावितपणे विचारताना आजही दिसतात.

परंपरेचे उत्खनन तर या अधिवेशनात इतके जोरदार झाले की, विचारायची सोय नाही. हा आमचा, तो आमचा, एखादा माणूस मोठा असला की, तो बहुधा

सारस्वतच असला पाहिजे, अशी यांची खात्री, नाही तर त्याशिवाय तो मोठा कसा असू शकेल ?

वैदिक परंपरा म्हणजे सर्वांचीच आहे. फक्त सारस्वतांची नाही. सारस्वत-धर्म अशी ज्याची टिमकी वाजवतात, तो वैदिक धर्माहून काय वेगळा आहे ? सारस्वतीझम, सारस्वतधर्म असे शब्द अधिवेशनात मुबलक होते. आम्हीच शुद्ध आर्य, बाकी बाटगे अशी त्यांची एकंदर धारणा होती.

मठाधिपती आणून तर त्यांनी मजाच आणली. वैदिक धर्म पाहिजे कुणाला ? यांच्या अधिवेशनातला कोण लंगोटी लावून संन्यास घेणार आहे ? पण जातीचा गठ्ठा करायला जे जे उपयोगी पडेल, ते ते वापरायचे. त्या मठाधीशांच्या वाळके-श्वराच्या दोन्ही मठात मी जाऊन आलो. पाच-सातसुद्धा माणसे तिथं नव्हती.

या सगळ्यात गंमत अशी की, आपण एरवी जे शब्द शिव्या म्हणून देतो, ते यांची भूषणेच आहेत. उदाहरणार्थ सारस्वत रिव्हायव्हॅलिझम. 'क्लॅन' हा शब्दही असाच. 'क्लॅनिश' असणे हे उद्दिष्टच आहे, असे जाहीरपणे सांगत असतात.

आम्ही जाऊ तिथे त्या भाषेशी, संस्कृतीशी समरस होतो, अशी एकीकडे बढाई आणि दुसरीकडे 'वुई मस्ट प्रिझर्व्ह अवर आयडेन्टिटी' अशीही भाषा.

मठाधीशांचा आणि शंकराचार्यांचा नक्षा अजून कुणी उतरवीत नाही, याचे आश्चर्य वाटते. राष्ट्रगीताला आम्ही उभे राहणार नाही, आम्ही मानवी आणि राष्ट्रीय शिष्टाचारांच्या पलिकडचे आहोत, असे म्हणणाऱ्या या मंडळींना सरकार तुरुंगाची हवा का दाखवीत नाही ?

कॉन्फरन्स दुष्काळी वातावरणात होती. तरी शान कुठे कमी झाली नव्हती. ताजमहाल हॉटेलमधल्या बॉलरूममध्ये हेवी टी देऊन प्रेस कॉन्फरन्स. तेथे स्कंध पुराणांचे ठोकळे वाटले. छापील कागद तर अधिवेशनात किती वाटले असतील, याचा हिशोबच नाही. भव्य पेंडॉल, आर्ट पेपरवरील सोव्हिनिअर्स, मठाधिपतींना त्यांच्या मूळ मठापासून आणायला चार-चार गाड्या. सर्व मानकऱ्यांना भरजरी वस्त्रे. असे एक ना दोन.

पण एवढे कमीच आहे. आडारकरांना कॅबिनेटमध्ये जाऊन बसायचे आहे. तेव्हा हे सगळे केलेच पाहिजे.

शामियाना सोडताना दुपारी कॉमेन्ट्री ऐकणारा तरुण सारस्वत पोरांचा कंपू दिसला. ही पोरं त्या नाडकर्णींच्या जर तावडीत सापडली आणि जर त्यांना खरोखरीच वेदाच्या नकला करायला बसवले, तर बिचारी मरूनच जातील.

---

('महाराष्ट्र टाईम्स' मधून)

# चांभारांची चौकशी

**चर्मकार** परिषद मुंबईला होणार असे वाचले. चांभार समाज प्लॅस्टिक-रबर युगामुळे अडचणीत सापडला आहे. त्या समस्यांचा विचार होण्यासाठी ही परिषद भरणार होती. गावी मला शाळेत एक चांभार शिक्षक होते. त्यांच्या घरी मी नेहमी असे. प्लॅस्टिक युगाची चाहूलसुद्धा तेव्हा नव्हती. पण जीवन मात्र अडचणीचे होते. कदाचित ती अंगवळणीची अडचण असेल. म्हणून या परिषदेला जावे असे वाटले.

मुंबईला गेल्यावर एका ओळखीच्यांना फोन केला. मी आलोय हे सांगितले. ते म्हणाले, कशाला आलास. मी म्हटले, चांभार लोकांची परिषद आहे त्याला. ते म्हणाले, चांभार म्हणू नका हां, चर्मकार म्हणा. नाही तर ते रागवायचे. असे म्हणून फोनवर ह्यः ह्यः करून हसले.

संध्याकाळी पाचची वेळ. डिलाईल रोडवरील कामगारी गजबज. बकाल दुकानांच्या रांगेत एका बोळाच्या तोंडाशी चर्मकार परिषदेचे पावसात धुवून गेलेले बॅनर दिसले. आत शिरलो. म्युनिसिपल शाळेची इमारत तशी नवीन होती. प्रचंड मोठ्या हॉलमध्ये चांभार समाज खच्चून भरला होता.

भव्य स्टेजवर गाद्या पडलेल्या होत्या. मागे आंबेडकर आणि गांधींचे फोटो होते स्टेजच्या बाजूला एका टेबलावर चपलांचे नमुने, लेदरच्या चारसहा प्रकारची पाकिटे मांडलेली होती. लग्नातल्या रुखवतासारखी.

बाजूला कोपऱ्यात एक मरतुकडा चांभार त्याच्या हत्यारांसह बसवला होता. तुटक्या चपला पुढे टाकल्या होत्या. कोणी त्याला प्लॅस्टिकच्या डबड्यात पाणी आणून दिले. मी विचारले, हे सर्व कशाला ? स्वयसेवकाने सांगितले, या गठई कामगाराची काय परिस्थिती आहे हे मंत्र्यांना दिसावे म्हणून. (गठई कामगार म्हणजे रस्त्याच्या कडेला बसून चप्पल दुरुस्ती करणारा चांभार. या परिषदेमुळे ज्ञानात ही मौलिक भर पडली.) तेवढ्यात कुणी एक तुटकी प्लॅस्टिक चप्पल त्या ढिगात वर काढून ठेवली. आणि म्हटले, ही बया जरा दिसू द्या लोकांना.

चांभार समाजाचे रा. अ. खैरे म्हणून कोणी आमदार आहेत. त्यांच्या पुढाकाराने ही परिषद भरली. त्यांना गाठले. खैरे गोरेपान, पन्नाशीचे आणि हसतमुख. खादीच्या सुटात होते. जगजीवनराम उद्घाटनाला येणार होते म्हणून स्वागतासाठी खाली थांबले होते. खैरे फारच साधे असावेत. कारण घाईघाईत एक फियाट आली. (गाडी त्यांचीच आहे.) त्यातून स्टार्चचा खादीचा सूट त्यांच्या माणसाने त्यांच्या हाती दिला. त्यांना अंगावरचा बदलायचा होता. चौकातच त्यांनी तो उतरवायला सुरुवात केली. अंडरपँट बनियनवर खैरेंनी नवा सूट चढवला. कोट अर्धवट घालत असतानाच मंत्री आल्याची ओरड ऐकली. बाह्यात हात घालतच खैरे पुढे धावले. ते मधुकरराव चौधरी निघाले.

खाली वावरणाऱ्या बहुतेक चर्मकार मंडळींच्या पायात प्लॅस्टिक वहाणाच दिसत होत्या. अखेर चांभारही समाजातला माणूसच. त्यालाही लेदरची वहाण परवडेनाशी झाली होती. तासभर कंटाळून वर गेलो. हॉलमधला उत्साह शिगेला पोहोचला होता. चारपाच स्त्रिया पितळेच्या ताटात निरांजने घेऊन बसल्या होत्या. आधी खाली दिसल्या होत्या. मंत्री येणार त्यावेळेत गडबड होऊ नये म्हणून पेटवून ठेवल्या होत्या. तेल संपले म्हणून वर येऊन बसल्या असाव्यात. एवढे मोठे स्टेज. पण तेही तुडुंब भरले होते.

एकदम ओरडा ऐकू आला. एक लोंढा दारातून आत घुसला. बाबूजी आले असा ओरडा झाला. माणसांच्या लाटेवर जगजीवनरामांचा प्रचंड देह हेलकावत येत होता. गडबडीत टोपी पडली. कोणी तरी ती परत त्यांच्या डोक्यावर ठेवली. त्या गडबडीतही बाबूजींनी टोपी नीट केली. तरंगतच बाबूजींना स्टेजवर ठेवले गेले. हॉलमध्ये बाबूजींचा जयजयकार चालला होता. त्या प्रचंड गर्दीत तो दाखवायला ठेवलेला गठई कामगार अक्षरशः बुडून गेला होता. बाबूजींच्या मागोमाग उत्साही चर्मकारांचा लोंढा स्टेजवर घुसला होता. तो स्टेजबाहेर निघता निघत नव्हता. शेवटी स्टेज प्रेक्षकात लोंबायला लागले होते.

बाबूजींचे भाषण झाले,

चांभार हा जातीत खालचा माणूस. चांभार हा चांभाराचेच काम करतो. करू शकतो. ब्राह्मण हा ब्राह्मणाचे काम करू शकतो. तसे तो चांभारही काम करू शकतो. ब्राह्मण बुटाचे दुकान चालवू शकतो, पण चांभार हॉटेल घालू शकत नाही. वरचा खालच्याचे काम करू शकतो. खालचा वरच्याचे नाही,

एकंदरीत भाषण चांगले होत होते. प्रेक्षकांतून टाळ्यांचा वर्षाव होत होता. पण प्रेक्षक सभांना सरावलेले दिसत नव्हते कुठे टाळ्या पडतील याचा नेम नव्हता. उदा.–चांभारांची स्थिती आज फार वाईट झालेली आहे अशा वाक्यालाही टाळ्या मिळत होत्या.

बाबूजींनी पुढे सांगितले,

चांभारातला मुलगा शिकला की तो धंदा सोडतो म्हणून कल्पकपणे धंदा वाढवायला समाजात माणसे नाहीत. शिकल्यावर तरुणांनी आपल्याच धंद्यात पडले पाहिजे.

एकंदरीत जगजीवनबाबूंनी सरकारी पातळीवर काही घोषणा दिली नसली (ते देऊही शकत नव्हते) तरी जातिबांधवांना दिलासा मात्र दिला.

बाबूजी आले तसे गेले. सभेच्यामधून त्यांना पोहोचवायचा एक लोंढा गर्जत गेला. इकडे मधुकररावांचे सस्मित भाषण चालू झाले होते. भाषणात बाळासाहेब (मधुकररावांचे प्रतिष्ठित नाव) म्हणाले, मी स्वत:ला चर्मकार म्हणवतो. (त्यांना अपेक्षित असलेला टाळ्यांचा गजर झाला) कारण मी चर्मोद्योग बेसिक शाळेत शिकलो आहे.

बाळासाहेबांचा हा एक गुण. जातील तेथे ते इतके समरस होतात.

भाषण सो सो. जाता जाता एक वाक्य असे म्हणाले. केवळ आम्ही बहुसंख्य आहोत म्हणून आम्हाला काही फायदे, आणि हे अल्पसंख्य म्हणून दुर्लक्ष्य, ही स्थिती बदलली पाहिजे. इत्यादी. शेवटी चर्मोद्योग मंडळ नेमावे अशी नेहमीप्रमाणे सूचना करून भाषण संपले. त्या दिवसाचा कार्यक्रम संपला होता.

स्टेजजवळच्या गठई कामगाराचे काय झाले हे पहायला जवळ गेलो. माणसांच्या ढिगात तो दिसतच नव्हता. माणसे हलली तेव्हा तो अंगाची जुडी करून बिनतक्रार बसलेला दिसला.

दुसऱ्या दिवशी ठराव झाले. खैरे यांची मी मुलाखतीसाठी सतत वेळ मागत होतो. त्यांनी मला स्टेजवरच शेजारी लोडाशी टेकून बसवले. तिकडे ठराव चालू, इकडे मुलाखत,

चांभार समाज मागे बऱ्यापैकी सधन होता. आता गेल्या काही वर्षांत त्याला फार दुर्दशा आली आहे. या मुंबईत चांभार समाजाची किती तरी दुकाने होती. पण आज बाजारपेठ हिंडा, जवळ जवळ एखाददुसरेच दुकान सापडेल. दाउद, बाटा, साहू, सीएस्सी, पी. व्ही. सी. या कंपन्यांनी, या दलालांनी धंदा मारला. आमच्याशेजारी शोकेस, फर्निचर, लाइटिंग केलेलं दुकान घातले. साहजिकच गिऱ्हाईक तिकडे जाणार. आमच्यापाशी तो शो करायला पैसा नाही.

आज प्लॅस्टिकच्या चपलांमुळे लेदरला कुणी विचारत नाही. ती चप्पल १॥–२ रुपयांला पडते. १०–१५ रुपयांची लेदरची चप्पल कोण घेणार? पण याची आम्हांला फार चिंता वाटत नाही. कारण हेही फॅड जाणार आहे. कारण प्लॅस्टिक चप्पलचे तोटे आताच लोकांच्या ध्यानात येऊ लागले आहेत. त्याच्यामुळे त्वचारोग होतात. पुन्हा त्या चप्पलला दुरुस्ती नाही. तुटली की फेकून द्यावी लागते. म्हणून लोक पुन्हा लेदरकडे वळतील. पण तोपर्यंत उपासमारीत असलेला चांभार समाज जगवायचा कसा, हा प्रश्न आहे.

आजही परदेशांत लेदरला खूप मागणी आहे. कोल्हापुरी चप्पल तिकडे खूप पॉप्युलर आहे. आम्ही माल बनवतो पण त्याचा फायदा आम्हास मिळत नाही. हे दाऊद, बाटा ही मंडळी यातले दलाल आहेत. त्यांच्या हातात सर्व परदेशी विक्री–व्यवस्था असते. जवळजवळ सर्व फायदा ते लाटतात. आमची अशी मागणी आहे की, सरकारने ही निर्यात व्यवस्था हातात घ्यावी आणि चर्मकारांच्या पदरात जास्तीत जास्त मोल टाकावे. ५० कोटीची 'गरीबी हटाव योजना' महाराष्ट्र सरकारकडे आहे, त्यातले दहा कोटी या उद्योगात गुंतवावेत. कारण कापडाच्या खालोखाल लेदर इंडस्ट्रीचा नंबर लागतो, हे सर्वमान्य आहे.

आज महाराष्ट्राचे नाव परदेशात इतके आहे की कानपूरचे लोक महाराष्ट्राचा शिक्का मारून माल परदेशात खपवतात. आज बडे उद्योगधंदेवालेही चर्मकाराचा हवा तेथे उपयोग करून घेतात. तुम्हाला प्रत्यक्षच त्या माणसाला दाखवतो.

असे म्हणून खैरेंनी एकाला बोलावले. त्यांचं नाव बाबूराव माने. ते चर्मोद्योग सोसायटीचे काम बघतात. त्यांनी सांगितले. स्वस्तिक कंपनीला आम्ही चप्पल पुरवतो. डिझाइन, कच्चा माल, सर्व आमचे. स्वस्तिकचा शिक्का, त्यांच्या किंमतीचा आकडा हासुद्धा आम्हीच मारून देतो. आमच्याकडे त्याचे शिक्के आहेत. बिले आहेत आम्हाला ते दहा रुपये देतात, आम्ही शिक्का मात्र १९.९५ चा मारतो. (या धंद्यातला हा काय पीळ तो कळत नाही. सरळ २० रु. लिहायचे नाहीत. १९.९५ लिहायचे.)

पुन्हा खैरे.

आपल्या चांभार समाजात अंतर्गत असे कोणते प्रकार आहेत ?

हराळे, दाभोळी, चेवली, ढोर, मोची असे प्रमुख प्रकार आहेत. त्यांच्यात आपसांत विवाह होत नाहीत. मी प्रयत्न करतो की सर्वांनी एकत्र यावे. पण म्हणावा तसा रिस्पॉन्स नाही.

चांभार समाज हा आंबेडकर चळवळीपासून दूर का राहिला ?

एक तर आम्ही प्रथमपासून राष्ट्रीय प्रवाहातले आहोत. स्वातंत्र्य लढ्यात काँग्रेसबरोबर राहिलो. ते (आंबेडकरवादी) तसे नव्हते. दुसरे असे की, आम्ही या धर्मात राहिलो, धर्म बदलला नाही. आमचे नेते जगजीवनबाबू हे राजेंद्रप्रसादांचे शिष्य. बाबूजींनी आम्हांला सांगितले होते की, काही झाले तरी धर्म बदलायचा नाही. आमची निष्ठा बाबूजींवर असल्याने आमच्या इथल्या राजकारणात आम्हाला त्रास होतो, पण तो आम्ही सहन करू.

नवबौद्धांप्रमाणे चांभार समाजावर कितपत अत्याचार होतात ?

बौद्ध समाजाकडे संख्याबळ असल्याने त्यांची ओरड ऐकू येते, तशी आमची नाही. आज बौद्ध समाजाला शैक्षणिक सवलतींचा जेवढा फायदा मिळतो त्याच्या किती तरी कमी इतर अस्पृश्यांना मिळतो. सोशल वेल्फेअर डिपार्टमेंटचे लोक मदत वाटायला नेमलेले असतात ते आम्हाला साध्या कामासाठी इतक्या वेळा हेलपाटे मारायला लावतात, की जसे काही यांच्या पदरचेच काही वाटायला बसवले आहे.

मागे पुण्याला एस्. जी. भोसले नावाचे चांभार समाजाचे जज्ज होते. त्यांना मांडके नावाच्या वकीलाने 'युवर ऑनर' म्हणायला नकार दिला. भोसलेंनी जाणीव करून देऊनही त्यांनी युवर ऑनर म्हटले नाही, तेव्हा त्यांच्याविरुद्ध कारवाई केली. विधान सभेत शासनाने या कृतीला पाठिंबा दिला. (म्हाळगी यांनी दुसऱ्या संदर्भात नाव न घेता त्या वकिलाचे समर्थन केले.) नोकरशाही ब्राह्मणी असल्याने शेवटी भोसले यांची दुसरीकडे बदली झाली. हे असे प्रकार नित्य असतात.

बरे. आता चर्मकारांच्या ढासळलेल्या स्थितीत सरकारने काय करावे असे वाटते ?

इंडस्ट्रिअल एरियाचे प्लॅनिंग करताना आजही चर्मोद्योगासारख्या महत्त्वाच्या उद्योगासाठी राखीव जागा सोडली जात नाही. या उद्योगाला तिथे स्थानच नाही, ते दिले पाहिजे.

दुसरे म्हणजे परदेशी बाजारपेठ इथल्या चर्मकारांना मिळवून दिली पाहिजे. एक उदाहरण सांगतो : पुणेरी जोड्यांवर नाजूक रेशीम काम करणाऱ्या स्त्रिया

असत. आजही एका जमानीत ते वैशिष्ट्य टिकून आहे. लेदरच्या मनीपर्सवर असले रेशीम काम केले तर त्याला जपानमध्ये फार मागणी आहे. ही सांगड सरकारने घातली पाहिजे.

चर्मकारांना दुकाने घालता यावीत म्हणून भरवस्तीत दुकानांच्या जागा राखून ठेवल्या पाहिजेत. भांडवल पुरवले पाहिजे स्वस्तिक चप्पल कारखान्याला महाराष्ट्र बँक कोट्यावधी रुपये भांडवल देते. आमच्या पारखा सोसायट्यांना, लहान चाभारांना मात्र तेवढ्या प्रमाणात देत नाही. हा दृष्टिकोण बदलला पाहिजे.

परिषदेच्या मधल्या वेळात मंडळी सतरंजीवर आराम करत बसली होती. एका ग्रुपमध्ये जाऊन बसलो. तिथे चौघे होते. राहणार आंबेगावचे. खेड्यातल्या चांभारांविषयी विचारु लागलो. ते म्हणाले,

खेड्यात स्थिती फार वाईट आहे. आता बौद्ध शिकले. शहाणे झाले. ते मेलेले जनावर ओढीत नेत नाहीत. त्यामुळे चामडे महाग झाले आहे. एरवी महाराने जनावर ओढून न्यायचे. त्याचे कातडे काढायचे. आतले मांस त्याने खायचे. कातडे ढोराला द्यायचे. ढोराने ते कमवायचे आणि पुढे चांभाराने चप्पल, मोट, काय बनवायचे असेल ते त्याने बनवायचे, अशी एकंदर सिस्टिम असते. त्यातला खालचा कातडं आणणाराच गेला. त्यामुळे बैल मेला की शेतकरी गाडीत घालून जनावर रानात नेतो आणि पुरून टाकतो.

मग दुसरे कोणी ते काम करत नाही का ?

ते काम खालचं असतं. इतर कोण हात लावणार ? आणि हात लावला तर त्याला जातीत ठेवतील का ?

दुसरा म्हणाला, आताशा काही कंत्राटी लोक मांगाकरवी हे धंदे करतात. पण फार तुरळक.

ढोर हे काम का करत नाहीत ?

अहो पुन्हा तेच. ते घाण काम आहे. तो कसे करील ? त्यात मोठ्याचं (मोठ्या, मेलेल्या जनावराचे मांस) खाण्यावरनं जाती ठरल्यात. महार, ढोर मोठ्याचं खातात. ढोरातल्या काही जाती आणि चांभार, मोठ्याचं खात नाहीत. बौद्ध, आम्ही आता मृत मांस खात नाही म्हणतात. पण अशाने जात बदलते काय ?

ढोराचं काम काय असतं ?

थांबा, एका ढोरालाच बोलावू. असे म्हणून एका गृहस्थांना बोलावले, ते सांगू लागले : प्रथम कातडे येते. त्याला आतून मांस चिकटलेले आणि बाहेरून केस असतात. ते पाण्यात भिजवायचे, मीठ चोळायचे. काही दिवसांनी ते काढायचे. मऊ पडलेले केस खरडून काढायचे. मग त्या कातड्याची झोळी करून त्यात हिरडा,

बाभळीची साल असा मसाला भरून टांगून ठेवायचा. काही दिवसांनी चामड्यातील रंध्रातून आतले पाणी खाली टिपकू लागले की चामडे झाले असे समजायचे. पुढे आणखीन काही क्रियाकर्म केले की महिन्याभरात चामडे तयार होते.

पुढे चांभार सांगू लागले, अलीकडे इंजिनं आली. त्यामुळे मोटा बनत नाहीत. चपलांचाही धंदा बसला.

का बरे ? मी लहानपणी खेड्यात जडजड नालवाल्या चपला पाहिल्यात. त्या नाही का खपत ?

अहो, त्या चपला करायच्या तर १–१ किलो चामडे एकेका चप्पलला लागेल. दोन किलोचे बारा रुपये, अप्परचा (चप्पलचे वरचे पट्टे) खर्च दोन रुपये. मजुरी दोन रुपये तर धराल. सोळा रुपये देऊन चप्पल कोण घेणार ?

ढोर समाजातले एक कॉन्ट्रॅक्टर भेटले. तरुण माणूस. राजाराम शिवराम तपासे. त्याने ढोर समाजाच्या मागण्यांचे निवेदन हाती दिले. त्यावर ' वीरशैव कैक्य ढोर समाज ' असे लिहिले होते. ही काय भानगड म्हणून विचारले असता तपासे म्हणाले, आम्ही लिंगायत. हे जमातीचे नाव. त्यातले काही हराळी जातीचे लोक (जे बहुसंख्य आहेत) लिंगायत आहेत. मोची हे बिहारहून आलेले.

तपासे सातार्‍याला असतात. मुंबईच्या वांद्र्याच्या खाटीकखान्यातून कच्ची चामडी ४ रु. किलो भावाने नेतात. सातारला त्यांचे ११-१२ ढोर कामगार आहेत. ते कातडे कमावतात आणि तपासे मुंबईच्या बाजारात ७ रु. किलोप्रमाणे कॉन्ट्रॅक्टर्सना विकतात. यात मार्जिन अर्थातच फार थोडे सुटते. त्यांचा ' कारखाना ' नगरपालिका धड उठवीत नाही, बाहेरही जागा देत नाही. आणि कारखान्याला आवश्यक त्या सोयीही करून देत नाही. त्यांच्या धंद्याला पाणी फार मुबलक लागते. ते मिळत नाही सरकारी कर जबर आहेत. खरेदी कर ३ टक्के, विक्री कर ३ टक्के, आणि मालमसाला करही ३ टक्के आहे. हा कर माफ व्हावा असे त्यांना वाटते.

कातडी कमवायला हिरडा लागतो. बडेबडे व्यापारी याचे स्टॉक करतात आणि फायदा काढतात. वन-अधिकार्‍यांनी हिरडा गोळा करून डायरेक्ट ढोरांना मिळेल अशी व्यवस्था करावी अशी त्यांची मागणी आहे. जंगल तोडीमुळे सालीचीही टंचाई त्यांना फार भासू लागली आहे.

गठई हा शब्द मला फार आवडला. गठई कामगाराच्या शोधात होतो तो मिळाला. कालच्यासारखा मरतुकडा नव्हता. तब्येतीने चांगला होता. सोनावणे त्याचे नाव. हा मिलमध्ये बदली कामावर आहे. रोज इंडिया कामगार ग्रूपच्या मिलमध्ये जायचे. कोणी गैरहजर असला की त्याच्या जागी याला काम मिळते

कोणी सुटीवर गावी गेले तर कधी सलग महिनाभरसुद्धा मिळते. पण वर्षासाठी पाहिले तर चार महिने काम मिळते

उरलेला वेळ रस्त्याच्या कडेला चप्पल–दुरुस्ती. तो म्हणतो, सध्याचे काम म्हणजे दहा पैशांचे काम. अंगठा तुटला लावून दे, एवढेच. रबर प्लॅस्टिकमुळे पूर्वीसारखे सोल लावायला कोणी येत नाही. जादा शिलाई कोणाची नसतेच. गिन्नी अंगावर फेकून गिऱ्हाइक पुढे चालू लागते. मला एक जोड-काम आहे. पण असे लोक फार थोडे. कुठे तरी गटारावर फळी टाकून बसायचे. बाजूला घाण. संडास किंवा कचरापेटी. पण अशाच ठिकाणी आमची जागा आहे. चांगली ठिकाणे इतर फेरीवाल्यांसाठी असतात. जागेवरून केवढ्या मारामाऱ्या असतात. दिवसाकाठी २–२॥ रुपये मिळाले तर शिकस्त झाली. त्यात पोलिस, म्युनिसिपालिटीचे अधिकारी यांना घास तोडून द्यावा लागतो.

एकीकडे ठराव चाललेच होते, खैरे सर्व ठरावांना साक्षी होते. बाहेर एकजण लंगोटी–पेपर विकत होता, त्या पेपरचे नाव होते ‘ जगजीवन ’–(भीमरायाची ही चर्मकार आवृत्ती.) त्याच्या संपादकीयात गमती जमती होत्या. ही सध्या चालू असलेली ‘ महाराष्ट्र चर्मकार परिषद ’ होती, दुसरी एक संस्था होती तिचे नाव ‘ महाराष्ट्र राज्य चर्मकार परिषद.’ दोन संस्थांची दोन वेगळी अधिवेशने भरणार होती, दुसऱ्या संस्थेचे प्रवर्तक माजी खासदार नारायणराव काजरोळकर होते. पण खैऱ्यांनी सांगितले, मी सरकारकडून पाच कोटी रुपये आणणार आहे, तेव्हा त्यांना लोकांनी अध्यक्ष केले. संपादक विचारतात, पैशाचे आश्वासन निश्चित आहे ना ? खैरे पुढे म्हणतात, विधानसभेत मी चर्चा घडवून आणणार आहे, तेव्हा या अधिवेशनाने वातावरण निर्मिती होईल. यावर संपादक खुलासा विचारतात की मग कोणता ठराव आहे, तो कधी येणार आहे याचा तपशील द्या.

ही घरची नेहमीची भांडणे. जसजसे खालच्या जातीत जावे तसतशी त्याची तीव्रता अधिक. जितकी जात छोटी, तितकी त्या जातीत अखिल भारतीय संस्थांची संख्या अधिक. कुणाचे दुर्दैव, त्या माणसाचे, जातीचे, की संस्थेचे,– कोण जाणे.

संध्याकाळी समारोपाला मुख्यमंत्री वसंतराव नाईक, रूपवते, पागे, इ. मंडळी येणार होती. स्टेजवरच्या गाद्यांवरच्या आपापली मूळ स्थाने कधीच सोडून गेलेल्या चादरी हट्टाने आपल्या जाग्यावर झटकून आणल्या जात होत्या. खैरेंच्या अंगावर कालचाच सूट होता. शेवटचे ठराव उरकणे चालले होते. शेवटच्या काही भाषणांमध्ये आम्ही काँग्रेसशी एकनिष्ठ राहून आम्हाला त्याचे काही फळ मिळाले नाही, असा सूर होता. बापुजींसारख्या (बापूजी हे आमदार खैरे यांचे प्रतिष्ठित नाव.) लायक माणसाला वास्तविक कधीच मंत्रीपद मिळायला हवे होते, पण अजून ते झालेले नाही, इत्यादी.

अशी भाषणे खैरे स्टेजवरून न एम्बरॅस होता ऐकत होते.

जयजयकाराच्या धुरळ्यात नाईक स्टेजवर आले. त्यांना असंख्य हार घालण्यात आले. हारांची रांग लागली होती. नाइकांनी एक-दोन भाषणे ऐकली. मग उभे राहिले. आता तुमची बडबड खूप झाली, मी कसा कामाचा माणूस— अशा आविर्भावात ते म्हणाले, ठीक आहे. तुमचा प्रश्न सोडवायचाय ना, मग झटपट कामाला लागा. एक कमिटी नेमा. तिने माझ्याबरोबर चर्चा करावी (तितक्यात स्टेजवरचे कोणी म्हणाले, तशी कमिटी आधीच नेमली आहे. त्यावर नाईक म्हणाले,) ठीक आहे, हरकत नाही. मग त्या कमिटीने माझ्याशी बोलणी करावीत. जरूर पडेल तर तिने माझ्याशी भांडले पाहिजे, आणि आपले हक्क मिळवले पाहिजेत.

या प्रत्येक वाक्यावर टाळ्यांचा गजर होत होता. खैरे तर लहान मुलासारखे टाळ्या पिटत होते. खाऊ मिळाल्यासारखे.

मला नुकतीच पुण्याला झालेली वडार समाजाची परिषद आठवली. तिथे नाईकांनी हेच भाषण केले होते. एक कमिटी नेमा. तिथे माझ्याशी भांडले पाहिजे. इत्यादी. त्यानंतर एका ज्येष्ठ वडार कार्यकर्त्याने मला किती तरी अशा केसेस सांगितल्या की त्या बाबतीत तलाठ्यापासून तो मुख्यमंत्र्यांपर्यंत सहा-सहा वर्षे खेटे घालून शेवटी नाद सोडून द्यावा लागला.

नाईकांचे चालू असता रूपवते आले, ते कधी आले तेच कळले नाही. जयजयकाराविना आलेले हे एकमेव मंत्री. पागेंसमवेत ते येऊन बसले. रूपवत्यांनी डबलचेस्टचा आंबेडकरी पद्धतीचा खादीचा सूट घातला होता. (हा आंबेडकर गांधी समन्वय.) नाईक गेल्यावर रूपवते बोलायला उभे राहिले.

तेव्हा बरेचसे प्रेक्षक उठून चालायला लागले. त्यामुळे इतकी गडबड माजली की भाषण ऐकूही येईना. एक वयोवृद्ध हरिजनसेवक उठणाऱ्या लोकांना खाली बसवू लागले. पण कोणी तोंडात पिक धरून थुंकण्याची खूण करून, कुणी लघवीची करंगळी दाखवून बाहेर जाऊ लागला. पाच एक मिनिटांनी जरा स्थिर-स्थावर झाले. हे आतापर्यंतच्या कुणाही मंत्र्याबाबत झाले नव्हते. ते म्हणाले, महार, ढोर आणि चांभार म्हणजे ब्रह्मा–विष्णु–महेश. (याला मात्र टाळ्या पडल्या.) मीही लहानपणी महाराचे आणि ढोराबरोबर ढोराचे काम केले आहे. आपण एक येऊ या. अत्याचाराविरुद्ध एकत्र येऊन दलित व्यासपीठ स्थापन करूयात इत्यादी.

भाषण संपले. परिषदही संपली. स्टेजखालचा अंग मोडून बसलेला गठई-कामगारही वेडेवाकडे आळस देत उठला, आणि आपल्या तुटक्या चपलांचे गाठोडे बांधून आपल्या मूळ ठिकाणाकडे चालू लागला.

---

(‘ साधना ’ साप्ताहिकातून)

# ३.
# धरण ग्रस्त
# दुष्काळ ग्रस्त
# दंगल ग्रस्त

# दुष्काळ यात्रा

**धरणग्रस्तांच्या** चळवळी जोरात आहेत. त्याच पाटाखाली भिजणाऱ्या पर्यायी जमिनी, वाजवी किंमत, अशा अत्यंत रास्त मागण्या गेली पाच–सहा वर्षे ते प्रभावीपणे करत आहेत. धरणाखाली ज्यांची गावेच्या गावे बुडणार आहेत त्यांच्या दुःखाची तर कल्पनाही करणे कठीण आहे. घरे, दारे, शेते, गाव सोडून उठून दुसरीकडे जाण्याचे दुःख घरातले माणूस जाण्याइतकेच मोठे आहे. समाजात धरणे होण्यासाठी काही लोकांना सक्तीने का होईना पण त्याग करावा लागतो. तेव्हा सर्वांना यांच्या दुःखाचे, त्यागाचे भान राहाणे आवश्यक आहे. पण हे होताना दिसत नाही.

पण काय परिस्थिती होते पाहा. आठ–दहा वर्षांपूर्वी सरकारने कोयना धरणाखालील धरणग्रस्तांना जमिनीची सरकारी नियमाप्रमाणे म्हणजे वास्तवतः खूप कमी अशी किंमत दिली. आणि कोकणातल्या काही गावांमध्ये त्यांना वस्तीला जागा दिली. त्यांच्या बायका गाव सोडताना घरात मयत व्हावी असे रडल्या.

या कोयनावाल्यांचा एक गट पेणजवळच्या करंबेळ गावी वसायला आला. या करंबेळ नावाच्या गावाला त्यांनी त्यांच्या बुडलेल्या गावाचे नाव 'आराव' ठेवले. वर्गणी काढून गावाच्या आसपासची जमीन खरेदी केली. एक देऊळ बांधले. तिथे गावाहून आणलेल्या देवीच्या मूर्ती बसविल्या. छोटी शाळा बांधली आणि गाव सुरू झाले.

याच्या पुढे मात्र निराळे घडत गेले. कसे घडले याचे उत्तर कोणी देऊ शकत नाही. मानवी स्वभावाचा हा चमत्कार आहे. गेल्या ऑक्टोबर महिन्यापासून तिथल्या स्थानिक आदिवासींची काही ओरड आहे असे ऐकू येऊ लागले. तिथले सर्वोदयी आणि समाजवादी कार्यकर्ते मुकुंद कोल्हटकर, समाजवादी पक्षाचे बा. न. राजहंस आणि युवक क्रांती दलाचे कार्यकर्ते अरुण शेंडगे यांनी तिथल्या आदिवासी समाजावर अन्याय होत आहे, हे कोयना धरणग्रस्त आदिवासींच्या जमिनी लाटत आहेत असे सांगितले, आणि त्यांच्या वतीने लढा संघटित करण्यास सुरुवात केली. परवा २३ मे ला त्या आदिवासींच्या त्यांच्या जमिनीवर पेरणी करण्याचा सत्याग्रह होता, तो झाला. त्यात ६ पुरुष आणि ६० स्त्रियांना अटक झाली.

मला कोल्हटकर पुण्याला भेटले. त्यांनी बरोबर दोन कातकरी आणले होते. कोल्हटकरांच्या पायाला रिक्षा अपघातात फ्रॅक्चर झाले होते. म्हणून कुबड्या लावून लंगडतच ते आले होते. गोरे पान, घारे डोळे, खादीचा शर्ट, पायजमा, बोलणे अघळ–पघळ, असा एकंदरीत खात्या दिसला.

पेणचा परिसर मोठा रम्य बऱ्यापैकी जंगल. बऱ्याचशा टेकड्या. त्यावर वसलेली दहा–वीस घरांची छोटी–छोटी आदिवासी गावं. अधून–मधून नदीचा प्रवाह. कुठेही अखंड नाही. त्या डबक्या–डबक्यांत उघड्या आदिवासी स्त्री–पुरुषांची गर्दी. अंगचे वस्त्र फेडून त्यात पाण्यातले मासे पकडत बसलेले दिसत. जिथे दहा–वीस माणसे मावतील, तिथे शे–सव्वाशे माणसांची गर्दी. एखादा–अर्धा मासा तरी मिळत असेल की नाही कोण जाणे.

पेणमध्ये सत्याग्रहाचे काहीही वातावरण नव्हते. स्वत: कोल्हटकर, फौजदार आणि मामलेदार यांच्याशिवाय दोन–चार लोकांना तरी या प्रश्नाची किंवा उद्या सत्याग्रह आहे याची कल्पना असेल, असे म्हणवत नाही. पोलिस फौजदारांना भेटलो. उद्या शांतपणे सर्व पार पडणार याची कोल्हटकरांनी त्यांना खात्री दिली. फौजदार नुकतेच बदलून आले होते. बंगल्यात सामान लावणेच चालले होते. कोल्हटकरांच्या आयुष्यातले हे पहिलेच आंदोलन असावे. त्यामुळे पहिलटकरणीचा उत्साह त्यांच्यात ओसंडत होता. फौजदारांनी त्यांना सांगितले, उद्या अमुक कलम लावले आहे. तेव्हा इजा होईल असे शस्त्र म्हणजे काठी, लाठी, कोयता आदिवासींना जवळ बाळगता येणार नाही. यावर कोल्हटकर म्हणाले, अहो, आदिवासी उद्या काठी घेणार. कारण तो त्यांच्या पोशाखाचाच भाग आहे. तो कोयता आणणार. कारण तोही त्याच्या पोशाखाचाच भाग आहे. एवढेच काय मीही उद्या लंगोटी लावून पेरणीला उतरणार आहे.

असे म्हटल्यावर फौजदार मिष्किलपणे म्हणाले, नको, नको. त्यापेक्षा आदिवासींना काठी बरोबर घेऊ द्यात. आम्ही सर्वजण मोठ्याने हसलो. बरोबरच्या आदिवासी कातकऱ्यांना मात्र हा साहेबलोकांमधला विनोद समजला नाही.

तिथे एका प्रेसमध्ये बसलो. बा. न. राजहंसाकडून या प्रश्नाची तपशीलवार माहिती घेतली. त्यांनी बॅगेतून एक फाइल काढली. त्यात सातबाराचे उतारे, मुख्यमंत्र्यांना लिहिलेली पत्रे, वर्तमानपत्रातली कात्रणे खच्चून भरली होती. प्रत्येक अर्जाखाली आठ–दहा आंगठे दिसत होते. त्या प्रत्येक आंगठ्यामध्ये त्या माणसांचे दीनवाणे जनावरपणच चित्रित झाले होते. पाहताना शहारे आले. फायलीतली माहिती अशी होती की, ६० साली कूळ कायदा झाला. त्याप्रमाणे आदिवासी कातकरी ज्या जमिनी कसत होते. त्या गावात त्या टिळक नावाच्या खोताच्या होत्या. त्यांचे ते मालक बनले. पण पूर्ण मालक नव्हे. कारण बारा वर्षात त्या जमिनीची सरकारी नियमाप्रमाणे जी किंमत ठरेल ती मूळ मालकाला हप्त्याने परत करायची. आणि मग पूर्ण मालकी.

६० साली जमिनी मिळाल्या, ६४ साली सरकारने हप्ते ठरवले. ते काहीच हप्ते कातकऱ्यांनी भरले नाहीत. म्हणून सहासष्ट साली नोटिसा आल्या. तरीही हप्ते भरले नाहीत. तेव्हा सदुसष्ट सालात हप्ते भरा, नाहीतर जमिनी जप्त करू.

अशा नोटिसा आल्या. त्याने घाबरून जाऊन हे हप्ते भरण्यासाठी ते सावकार धुंडू लागले.

त्याचा फायदा या कोयना धरणग्रस्तांनी घेतला. त्यांनी हप्त्यासाठी कर्जाऊ पैसे दिले. त्या बदल्यात कातकऱ्यांनी तिथल्या रिवाजाप्रमाणे तीन-चार वर्षांसाठी त्यांना स्वतःची जमीन कसायला दिली. याला ताबेगहाण असे नाव आहे.

पण प्रत्यक्षात मात्र या कोयनावाल्यांनी त्यांचे खरेदीखतावर अंगठे घेतले होते. हे लक्षात यायला उशीर लागला. ७१ सालच्या ऑक्टोबरमध्ये ७।१२ च्या उताऱ्यात फेरफारी आढळून आल्या. कोयनावाल्यांच्या नावाच्या पेन्सिलीच्या नोंदी आढळू लागल्या. तसा झाला प्रकार ध्यानात यायला सुरूवात झाली.

या नोंदी बेकायदेशीर आहेत असे कायदा सांगतो. कारण कूळकायद्याप्रमाणे सर्व हप्ते भरल्याशिवाय कुळाला जमीन विकायचा अधिकारच नाही. हे कलम ३२-ग असे असावे. कारण गेल्यापासून येईपर्यंत हा शब्द हजार वेळा तरी ऐकला असेल. बत्तीस या आकड्याबरोबर ग हे अक्षर इतक्यांदा ऐकावे लागेल असे कधी वाटले नव्हते.

तेव्हा त्या सात-बाराच्या उताऱ्यात प्रथम आदिवासीचे नाव, नंतर पेन्सिल-मधली कोयनावाल्या भोसल्याची पेन्सिलची कच्ची नोंद, आणि खाली सदर नोंद ३२-ग प्रमाणे बेकायदेशीर असल्याने त्या नोंदीस मंजुरी आली नाही, असा मामले-दाराचा शेरा- असे होते.

तेव्हा प्रकरण उघड होते.

हे खरेदीखतच बेकायशीर असल्याने आदिवासींना त्यांच्या जमिनी कोयना-वाल्यांकडून मिळणे आवश्यक आणि न्याय्य होते. आणि याचसाठी उद्या पेरणीचा सत्याग्रह होता.

सकाळीच ज्या गावी सत्याग्रह व्हायचा तिथे गेलो. पोलिसांच्याच तीन ट्रक्स फिरत होत्या. हेल्मेट घातलेली एस्. आर्. पी. फौजही वावरत होती. गावाची पाटी लागली, आराव. कोयनावाले पोलिसांना चहापाणी पुरवताना दिसत होते.

गाव ओलांडून हेमडीला गेलो.

आदिवासींच्या समोरासमोर दहा-वीस झोपड्या. काळी नागडी पोरं. गुरं. चार-सहा खाटली. आणि दारादारांतून उभ्या असलेल्या. स्त्रिया. आदिवासींची जमवाजमव चालू होती. गमतीदार नावे ऐकू येत होती. विष्ण्या, इकल्या, महाद्या तांबड्या अशी. नावात कधी कुठे शुद्ध नाव दिसेना. वाटले, आमच्या स्पृश्य प्रतिष्ठित समाजाने केलेला त्यांचा हा हेतुतः सन्मान आहे. एकाने तर सांगितले की, कुत्र्या हे सुद्धा त्यांच्यात नाव आहे.

विष्ण्या इकल्या हा तरुण पोरगा. इथला प्रश्न हाती घेतल्यावर राजहंसांनी इथे भूमिसेना काढली. त्याचे शिबिर झाले. तिथे विष्णू चमकला. आदिवासींच्या प्रश्नात त्याने पुढाकार घेतला, त्याला कारणही तसेच होते. याच्या मालकीच्या शेतात हा कापणीसाठी गेला असता कोयनावाल्यांनी मिळून याला धोपटले. मानेला बर्ची लावली. त्याला सोडवायला गेलेल्या लोकांनाही त्यांनी रक्तबंबाळ केले. सोळा कातकरी हॉस्पिटलमध्ये अॅडमिट झाले होते. तरी कायनावाल्यांनीच तक्रार केली की, आदिवासींनी आम्हाला मारले. त्यावरून पोलिसांनी आदिवासींनाच त्रास दिला. अशी ही दुनिया.

डोंगरावर गेलो. विष्णू पलिकडच्या डोंगरावरल्या लोकांना हाका मारत होता. झाडाझुडपातून लंगोटीबहाद्दर आदिवासी उतरत होते. सगळे हेमडीला जमले. तिथे हातातल्या काठ्या, कंबरेचे कोयते काढून ठेवण्यात आले. रस्त्याच्या कडेला ज्याची जमीन आहे त्या सावळ्या इकल्याला पुढे उभे केले. हातात एक कुदळ दिली. कुदळ आपल्या इकडच्यापेक्षा जरा निराळ्या टाइपची होती. भूमी सेनेतल्या दहा–वीस तरुण पोरांनी तांबड्या टोप्या घातल्या होत्या. सर्वोदयाची गोविंदराव शिंदे इ. मंडळी येऊन आदिवासींपुढे चार शब्द सांगून गेली.

शभर–एक आदिवासी मोर्चाने आराव ऊर्फ करबेळकडे निघाले. पोलिसांनी पोझिशन्स घेतल्या. तीन–चार सब–इन्स्पेक्टर्सची धावपळ झाली. रस्ता ओलांडताच त्यांनी अडवले. कुठल्या शेतात सत्याग्रह करणार ? विचारले. रस्त्याच्या कडेला म्हणून निवडलेले शेत बरेच आत अगदी टेकडीच्या पायथ्याशी निघाले. पोलिस आणि आदिवासी बरोबरच तिकडे निघाले. अगदी अंडरस्टँडिंग असल्यासारखे. मधल्यामधे घमेली घातलेल्या एस्. आर्. पी. च्या पोझिशन्स मात्र फुकट गेल्या.

अखेरीस ते शेत सापडले. आदिवासींना खाली बसवण्यात आले.

राजहंस पुढे झाले. मामलेदारांनी त्यांना हरकत घेतली. पोरगेलसे प्रांतसाहेब बाजूला हाताची घडी घालून शांतपणे उभे होते. राजहंस आणि मामलेदारांची शाब्दिक झुंज सुरू झाली.

पहिला भाग सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे पार पडला. ३२–ग कलम वगैरे- मामलेदार म्हणाले, तुम्हांला पाहिजे तर सरकारकडे जा. इथे तुम्ही पेरणी करणे बेकायदेशीर आहे.

राजहंस म्हणाले, अहो हे कातकरी जमिनीचे कायदेशीर मालक आहेत. मामलेदार म्हणाले, पण सध्या वहिवाट आणि ताबा भोसल्यांकडे आहे.

पण तो बेकायदेशीर आहे म्हणून मंजूरी आलेली नाही, असा आपलाच शेरा आहे ना ?

हो. मजूर झालेला नाही, असे मी म्हटले आहे. याचा अर्थ नामंजूर झाला असा होत नाही. पाहिजे असल्यास गव्हर्मेंटकडे जा.

अहो, हा आदिवासी गव्हर्मेंटकडे किंवा कोर्टात कसा जाणार ? याच्याकडे पेणला जायलासुद्धा पैसा नाही. इंदिरा गांधींना गरिबी हटवायचीय ना, मग तुम्ही गरीबांची बाजू घ्यायला नको का ?

ते मला माहीत नाही.

मग हरकत घेताना, वहिवाटीची नावे बेकायदेशीर असूनही मूळ कुळाला आम्ही इथे येऊ देणार नाही आणि बेकायदेशीर माणसाला मात्र हरकत घेणार नाही, असे लेखी देऊ शकाल का ?

तुम्ही लेखी अर्ज करा, आम्ही उत्तर देऊ.

आम्हाला आत्ताच पेरणी करायची आहे.

लगेच दत्ता कुलकर्णी आपल्या वकिली सरावाने अर्ज लिहायला बसले. अर्ज दिला. मामलेदारांनी त्याला मूळ मुद्द्याला बगल देणारे उत्तर दिले. त्यावरून पुन्हा खडाजंगी.

शेवटी राजहंसांनी गव्हर्मेंटने काढलेला हुकूम वाचून दाखवला. त्याप्रमाणे सातबारातल्या या पेन्सिलीच्या कच्च्या नोंदींना मंजुरी देण्याचे कलेक्टरला जे अधिकार असतात ते काढून स्वतःकडे घेतल्याचे म्हटले होते.

मामलेदार म्हणाले, म्हणून तर प्रकरण वर गेले आहे.

पण त्या नोंदी तुम्ही करून घेतल्याच कशा ?

भोसल्यांचा अर्ज आला म्हणून.

उद्या मी अर्ज करीन; चालेल का ?

नाही. कारण भोसल्यांनी अर्जासोबत खरेदीखताची नक्कल जोडली होती.

पण ते खरेदीखत बेकायदेशीर आहे, असे तुम्हीच म्हणता ना ?

असेल. बेकायदेशीर असले तरी नामंजूर झाले असे नाही.

मग मंजुरी येईपर्यंत मूळ कुळाकडे जमीन का ठेवत नाही ?

कायद्यात ते बसत नाही ताबा वहिवाटदाराकडेच राहतो.

पण गव्हर्मेंटच्या अलीकडच्या अमुक हुकुमाप्रमाणे आदिवासीला जमिनींचा व्यवहार करताच येत नाही.

पण तो कायदा इथे लागू होत नाही.

का ? हे काय आदिवासी नाहीत की काय ?

असतील. पण करंबेळ गाव हे आदिवासी एरियात समाविष्ट नाही.

अहो, इथे शंभर टक्के आदिवासी राहतात की नाही ?

असतील. पण गाव डिक्लेअर्ड नाही. एवढेच काय, हे गाव 'डेझर्टेड' (वस्ती नसलेले) म्हणून नोंदवलेले आहे.

हे ऐकल्यावर कोल्हटकरांना काय झाले कोणास ठाऊक. ते आदिवासींपुढे जाऊन हातवारे करून बोलू लागले,

मित्र हो, हे माझे मित्र (मामलेदार) म्हणतात की, हे गावच डेझर्टेड आहे. अरे इथे आम्ही माणसे राहतो. पण या मित्राला ते मान्य नाही. त्याच्या लेखी आम्ही जनावरे आहोत.

जरा थांबून, मामलेदाराकडे वळून ते तारस्वरात म्हणाले, मित्रा, तुझ्या झोपेत ही धरतीमाता आक्रोश करून सांगेल की ही जनावरे नसून माणसे आहेत...

असे ते थांबेचनात. सर्वोदय, सेवा दल, समाजवादी, ४२ च्या आंदोलनातील पिढीतला भावुकपणा हे सगळे तिथे एकवटले होते. कातकऱ्यांना कसला बोधच होत नव्हता. आणि सर्वात गंमत म्हणजे हे भाषण झाल्यावर कोल्हटकर मामलेदारापाशी जाऊन सुपारी कातरून देऊ लागले, आणि तंबाखू पाहिजे का विचारू लागले.

शेवटी तुमचे तुमच्यापाशी आमचे आमच्यापाशी असे ठरून ही जमीन आमची आहे, इथे पेरणी करायला आलो आहोत म्हणून सत्याग्रह करायचे ठरले. तेवढ्यात थांबा- थांबा- म्हणत पोलिस इन्स्पेक्टर पुढे झाले, आणि नियमाप्रमाणे मंत्र म्हणायला सुरुवात केली. इथे अमूक-अमूक कलम लावलेले आहे. अमूक केले असता कायदेभंग होईल. इ. राजहंसांनी त्यांना लागलीच अडवले, अहो कुणी लाठीसुद्धा बरोबर आणली नाही आहे. पोलिस अधिकारी शोधू लागले. शेवटी कुदळीवर नजर गेली ते म्हणाले, हे काय शस्त्र त्यावर सर्व हसले. राजहंस कोल्हटकरांकडे बोट दाखवून म्हणाले, मग तुम्ही यांच्या कुबड्यांनाही शस्त्र म्हणाल !

पण कुणीच काही सीरियस्ली घेतच नव्हते.

तेवढ्यात अरुण शेंडगेला स्फूर्ती आली. तो आदिवासींना ओरडून सांगू लागला. मित्रहो, आपल्याला पकडतील तेव्हा पायांची घट्ट मांडी आणि हातांची घडी घालून बसा. पोलिसांना अजिबात सहकार्य देऊ नका. यावर सब-इन्स्पेक्टरांचे चेहरे पडले. कारण ठिकाण शेताच्या जवळ-जवळ अर्धा मैल आत होते. गाड्या रस्त्यावरून आत येऊच शकत नव्हऱ्या. ते घाबरून राजहंसांकडे आले. राजहंसांनी अरुणला समजावले, तेव्हा पेच सुटला.

सत्याग्रह झाला.

याद्या तयार होऊ लागल्या. तसे आम्ही कोयनावाल्यांची गाठ घ्यायला निघालो. ते त्यांच्या देवळात जमून दबा धरून बसल्यासारखेच बसले होते. त्यांच्यातल्या पुढाऱ्याने त्यांची बाजू सांगितली :

आम्ही आदिवासींना वेळोवेळी पैसे देत होतो. शेवटी त्यांनी जमिनी आम्हाला विकल्या. प्रत्यक्ष कोर्टासमोर जेवढी रक्कम देतो, तेवढ्याचेच खरेदीखत होते प्रत्यक्षात बरीच रक्कम यांनी घेतली आहे. आता हे उलटलेत. यांच्या लीला काय कमी आहेत ? उभं पीक कधी कापून नेतील सांगता यायचं नाही. झाडांवर फळ

टिकू देत नाहीत. या गावच्या मराठ्यांना आम्ही इथं नकोच आहोत. म्हणून त्यांच्या फुशीनंच हे आदिवासी गडबड करतात. नाही तर त्यांची काय टाप आहे, इत्यादी.

या म्हणण्यात काही खोटं, काही खरंसुद्धा. खरं असं की, आदिवासो पिकाच्या चोऱ्यामाऱ्या करतात. तो त्यांचा दोष आहे, आणि तो त्यांच्या वन्य जीवनपद्धतीतूनच आला आहे. करवंद तोडून खाणं आणि दुसऱ्याच्या शेतातली कणसं तोडून नेणं यात आपण जसा फरक करतो, तसा तो करत नाही, हे आपण मान्यच करायला पाहिजे. प्रत्यक्ष कोर्टात दिले त्याहून जास्त पैसे आम्ही आदिवासींना दिले या म्हणण्याची शक्यताही नाकारता येत नाही. कारण सर्वजण हप्त्याच्या वेळी नेमके कोयनावाल्यांकडेच कसे गेले ? त्या अर्थी त्यांच्याकडून पैसे उचलण्याची आधीची काही वहिवाट असली पाहिजे.

पण खरेदीखते मात्र लबाडीने घतली आहेत हे उघड दिसते. हप्ता किंवा कर्ज चुकवण्यासाठी जमीन वापरायला देणं ही तिकडली पद्धतच आहे. त्यासाठी तो आपले चरितार्थाचे एकमेव साधन विकून टाकील हे शक्य दिसत नाही. एखाद दुसरे उदाहरण आपण समजू शकू. पण गावच्या गाव असे करील हे संभवनीय नाही.

या लढ्यात आसपासचे राजकारणही शिरले आहे. स्थानिक मराठे मंडळींना ही कोयनावाली मंडळी उपरी वाटतात. आदिवासींना नागवण्यात कदाचित ते त्यांचे प्रतिस्पर्धी होऊ पाहात असतील. आदिवासींच्या या आंदोलनात स्थानिक मराठ्यांनी सत्याग्रहासाठी बैल, नांगर पुरवले होते. (पुढे तुरुंगात बैलांचे हाल होतील म्हणून ती कल्पना रद्द केली.)

मग कोयनावाल्यांना पाठिंबा कोणाचा ? त्याचेही असे सांगतात की, हे कोयनावाले शे. का. पक्षाच्या शेटचे यांचे पाठीराखे. शेटचे काँग्रेसमध्ये आले, तेव्हा बक्षिसी म्हणून या लोकांचे हितसंबंध बघितले जातात. कुलाब्याचे पालकमंत्री श्री. अंतुले ही चक्रे फिरवतात. कोयनावाल्यांच्या हितसंबंधात कूळकायदा आड येत असेल तर मी कूळकायदाही बदलून घेईन, असे अंतुले एका स्थानिक बैठकीत म्हणाल्याचे एकाने सांगितले.

शेवटी पुन्हा एकदा धरणग्रस्तांकडे. धरणग्रस्त परिषदेने या प्रकाराविषयी चौकशी करून तातडीने निवेदन काढणे जरूर आहे. आपण ज्यांच्या अन्यायाविरुद्ध लढतो, तीच माणसे संधी मिळताच दुसऱ्या क्षणी जर त्यांच्याहून दुबळ्यांवर अन्याय करू लागली तर आपण तेव्हा त्या दुबळ्यांची बाजू घेऊन एके काळच्या या अन्यायग्रस्तांविरूद्ध लढले पाहिजे. हे चारित्र्य दाखवायची ही संधी आहे, असे वाटते.

# मासा गिळतो

# माशाला

**पुण्याचे** मेयर निळूभाऊ लिमये भलतेच उत्साही. कॉर्पोरेशनची एरवीची कटकट कमीच की काय, त्यांनी दुष्काळाची कटकट स्वतःभोवती आणि कॉर्पोरेशन-भोवती लावून दिली. शिरूर तालुक्यातल्या दोन नद्यांच्या मध्ये सापडून मागास राहिलेल्या बेट नावाच्या भागाची त्यांनी निवड केली. तिथल्या दुष्काळी कामावर तट्टयाची शेड उभारली. गावातल्या इतर डॉक्टरांच्या मदतीने महापालिकेची वैद्यकीय मदत तिथे सुरू केली.

निळुभाऊंच्या लीडमुळे पुण्यातल्या लोकांना भलतेच उधाण आले. मुलांनी नेहमीप्रमाणे खाऊचे पैसे दिले. मुलींनी पावडर–लिपस्टिकचे दिले. तरूण मुलांनी पिक्चरचे दिले. वृद्धांनी तपकिरीचे दिले. त्या काळात मुले खाऊ खाईनात. वृद्ध शिंकेनात. पावडरी अभावी कुणाला मुलींकडे बघवेना. पिक्चर नाही म्हणून तरूणांना नारदमंदिरातल्या कीर्तनाला जायची पाळी आली.

या सगळ्या वातावरणात महिलांना तर कोण आवरणार ? त्यात निळुभाऊ तर बहुतेकींच्या मिस्टरांचे मित्रच. त्यामुळे भावजींकडे कामाची अर्जंट मागणी झाली.

निळुभाऊ फार भिडस्त माणूस. सगळ्यांचा मेळ घालण्याची वृत्ती, आणि धाडस. त्यांनी ते वहिन्यांवरच सोपवले. मग विचार सुरू झाला. 'गडे, आपण काय करूयात दुष्काळी लोकांसाठी ?' असा प्रश्न प्रत्येकीच्या हेअर–स्टाइलच्या आतल्या डोक्यात गुणगुणू लागला. शेवटी विचार पक्का झाला. 'त्या बिचाऱ्यांना रोज चटणीसंगे भाकरी खावी लागते. आपण त्यांना एक दिवस पिठले देऊयात.' पण तिथे पिठले कसे न्यायचे ? त्याला युक्ती– 'त्यांना डाळीचे पीठ, तिखट आणि मीठ देऊयात, मग ते करून घेतील' मग ऑर्डर देऊन छानपैकी प्लॅस्टिकच्या पिशव्यात डाळीचे पीठ (अंदाजे अर्धा किलो, तिखट अंदाजे चार-पाच छटाक, आणि मीठ एक-दोन छटाक) भरून दोनशे लोकांना ते द्यायचे ठरले;– किंमत प्रत्येकी एक रुपया, अंदाजे.

दुसरे असे ठरले : दुष्काळी लोक कामावर असतात तेव्हा त्यांच्या मुलांचे हाल होतील. मग आपण तिथे जाऊन त्यांच्या मुलांना सांभाळायचे. ही कल्पना अभिनव असल्याने सर्वांनीच उचलून धरली.

२०८२
२२७९६
निबंध



आता हे पडले महिला मंडळाचे कार्य. तेव्हा विठल्याचा माल प्रत्यक्ष तिथे जाऊनच दिला पाहिजे स्वतःच्या हाताने. बरे, एकीने जाणे लोकशाहीला घातक— म्हणून सगळ्यांनीच जायचे ठरले.

मग निळूभाऊंनी समारंभच आयोजित केला. समारंभासाठी अगोदर माणसे रवाना करण्यात आली. त्या गावाचे नाव जांबूत. पुण्यापासून अंदाजे पन्नास मैल. शेवटचे पंधरा—वीस मैल खराब रस्ता. निळूभाऊ सकाळीच निघाले. कार्यक्रम दुपारी. महिला मंडळ आणि इतर हे त्या वेळेसच पोहोचणार होते. मी निळूभाऊंच्या गाडीतून निघालो. गाडीत त्यांचे दोन मित्र.

मेयरच्या गाडीचा रुबाब वेगळाच. ड्रायव्हरला वाटे, सगळ्यांनी आपल्या गाडीला वाट करून दिली पाहिजे. एका पी. एम टी. बसने साइड द्यायला दोन— चार सेकंद उशीर लावला. ड्रायव्हरने गाडी पुढे घालून ओव्हरटेक केली. करताना खिडकीतून तोंड काढून पी. एम टी ड्रायव्हरला— साल्या दिसत नाही का मेयरची गाडी ? — म्हणून शिव्या हासडल्या.

रस्ते माणसांनी वाहात होते. दुकाने उघडली होती. खरेदीच्या झुंबडीला सुरुवात होत होती

शहर मागे पडले.

रस्ता छान होता. दुतर्फा पिंपळाची, वडाची झाडे रस्ता राखीत होती. निळूभाऊंनी झाडांकडे बोट दाखवून सांगितले, बघ, इथून पुढे झाडावर पाला दिसणार नाही आणि तसेच होते. डेरेदार झाडांचा डौल जाऊन एखाद्या प्रेताचे मांस कुजून हाडे वर यावीत तशा फांद्या दिसत होत्या.

शिरूरच्या अलीकडे रस्ता वळतो तिथे जरासे थांबलो. कोपऱ्यावर एक जनावरांचा कँप होता उतरून आत चक्कर टाकली. दिवसा-ढवळ्या बरीचशी जनावरे झोपलेलीच होती. सौष्ठव इतिहासजमा झाले होते. दोन हाडांच्या मधला भाग खोल खोल गेला होता.

तिथल्या माणसाला विचारले. त्यांनी सांगितले, आता ही जनावरे उद्या मरतील. पलीकडली परवा. ही नुकतीच झालेली जगतील आठ-एक दिवस.

का ?

मदतच नाही. केंद्र चालवायचे कसे ?

पलीकडे एक गोजिरवाणे पांढरे वासरू पडले होते. टपोऱ्या डोळ्यांनी उन्हात कुठे बघत होते त्या माणसाने सांगितले. कालच एक गाभण गाय आली. सकाळी व्याली, आणि विता-विता मेली.

वासराकडे पाहताना वाटले, जन्मायला पण ठिकाण बेस्ट काढले बेट्याने.

एव्हाना गाडीतल्यांच्या लघुशंका उरकल्या होत्या. गाडी सुटली.

जांबूतपाशी एका तट्टयाच्या मोठ्या मंडपापाशी गाडी थांबली. सिनेमातल्या रेकॉर्ड वाजत होत्या. कार्यकर्ते पुढे झाले. निळूभाऊंनी काम कुठवर आल्याची चौकशी केली. पलीकडे दोनचार आडोशाचे संडास केले होते. पहिल्यांदा त्यांचा उद्देश समजेना. नंतर कळले, आज समारंभासाठी महिला येणार, त्यांच्या सोयी-साठी. पलीकडे पांढऱ्या फक्कीने कार-पार्किंगसाठीसुद्धा रेषा आखल्या होत्या.

पलीकडेच दुष्काळी काम चालले होते. मागच्या दुष्काळातला तलाव आता खोल करणे चालले होते. हजार-एक लोकांची गर्दी रांगेने काम करत होती. दोन छोटे वासे खोवून बांधलेल्या झोळीत तान्ही मुले शांत झोपली होती. कुणी एकाने मोठ्या वाशावर धोतराची, गोधडीची छोटी राहुटीच केली होती. कुणाचे नुसते आडोसे.

जेवणाची सुट्टी झाली; आणि सगळे बसून फडक्यातले आपले दळिद्र सोडून खायला बसले.

समारंभ चारला होता. पुण्यातून पाहुणे दोनला निघणार होते. समारंभा-साठी टेबले मांडली गेली. खुर्च्या ठवल्या जात होत्या. टेबलावर टेबल-क्लॉथ अंथरले जात होते. गाव इतक्या लांबवर आणि आड-बाजूला असूनही सभेच्या तयारीसाठी कुठल्या गोष्टींची उणीव म्हणून भासत नव्हती.

बाजूला दोन आडवी मोठी टेबले मांडली होती, निळूभाऊंच्या पूनममधले वेटर्स, गावातले खादी कपड्यांतले होतकरू तरुण पेटारे फोडून त्यावर डाळीच्या पिठाच्या पिशव्या मांडीत होते. कुणी तिखटाच्या, कुणी मिठाच्या. कॉर्पोरेशन शाळांमधून शेंगदाण्याच्या छोट्या पुड्या मधल्या सुटीत मुलांना वाटीत असतात, त्यातल्या पुड्याही इकडे आणलेल्या दिसत होत्या. पलीकडच्या झोपडीत निळू-भाऊंनी कुणाला तरी गाठून मिळवलेली बरीचशी दुधाची पावडर होती. पूनमचे एक्सपर्ट वेटर्स त्याचे मोठ्या पातेल्यात दूध करत होते. हे आश्चर्य पाहायला खेडूत कार्यकर्ते तिथे घोटाळत होते.

दुष्काळी कामावरच्या माणसा–बायांचा मोठा लोंढाच एकदम मंडपाकडे आला. पुढे आलेल्या बाया पुढच्या जागा अडवून बसल्या. मी त्या लाटेत सापडलो. एक बाई वैतागाने म्हणत होती, आम्ही कामावर ऐकलं की इकडं लुगडी वाटत्याती. मोठ्या आशेने आले, आन हे म्हणत्यात– लुगडीबिगडी काय नाय. आशा लई वाईट.

सगळ्यांनी बसून घेतले. मुले एका बाजूला होती. त्यांचा चिवचिवाट, बायकांचा कलकलाट आणि पुरुषांचा गलबलाट वातावरण भरून टाकत होता. तेवढ्या गडबडीतूनही गाड्यांचा आवाज आला. कार्यकर्ते धावू लागले,

एक अँबेसडर आली. त्यातून जयश्रीबाई वैद्य, महाराष्ट्र बँकेच्या चि. वि. जोगांच्या पत्नी सौ. जोग आणि चार-पाच स्त्रिया उतरल्या. मागोमाग दुसरी गाडी.

त्यातून चारपाच महिला. एक मोठी स्टेशनवॅगन,– त्यातून चारसहा. आणखी एक फियाट, त्यातून उंचेला तरुण एकदोघांसह उतरला. त्याचं नाव बोरावके. एका गाडीत पत्रकार, आणखी एक जीप, त्यातून मामलेदार. आणखी एक गाडी, त्यातून शिरूरचे तरुण नगराध्यक्ष श्री रसिकशेठ. काही मोटार सायकली, त्यावर काँग्रेसचे कोणी स्थानिक कार्यकर्ते– पुढे मोजदाद केली नाही.

उंच बोरावक्यांनी आपल्या फियाटची डिकी उघडली, आणि एक रंगवलेले प्लायवुडचे मोठे चाक काढले. ते रोटरी क्लबचे प्रसिद्ध चिन्ह होते. चाक हातात घेऊन त्यांनी सभेच्या टेबलापुढे लावून ठेवले. महिलामध्ये जरा कुजबूज झाली. पण बोरावक्यांनी श्रेय लाटण्याचा आयत्या वेळी डाव साधला होता. त्यामुळे कुणाला बोलता येईना.

सभा एव्हाना सुरू झाली होती. सौ. जोगांच्या हस्ते माल-वितरण होणार होते. आधी टेबलावर दुधाचे ग्लास आणले गेले. कुणी एका मुलाला उठवले, टेबलापाशी नेले. सौ. जोग वात्सल्यपूर्ण नजरेने त्याकडे पाहून त्याला ग्लास देऊ लागल्या. मुलगा बुजला. तो दूध पिईना. इतर कार्यकर्ते,– अरे पी, पिऊन टाक,– असे ओरडू लागताच त्याने घाबरून ग्लास घुटकन पिऊन टाकला.

मग बायांची रांग. सभेला बसलेल्या बाया उठल्यामुळे सभा विस्कटल्या-सारखी झाली. पहिली काही पाकिटे जोगांनी वाटली; नंतरची कार्यकर्त्यांनी.

मग भाषणे सुरू झाली.

त्या भागातले सगळेच पक्षवाले तिथं होते. कुणी सरपंच, कुणी उपसभापती, कुणी जिल्हा परिषद- सदस्य, कुणी काही. प्रत्येकजण बोलायला उठला की निळु-भाऊ– सौ. जोग, जयश्रीबाई वैद्य... मग पुढे आलेल्या पुढाऱ्यांची अधिकारक्रमाने नावे घेऊन भाषणाला सुरुवात करी. ही नामावळ फारच वाढू लागली, तेव्हा निळू-भाऊंनी उठून सांगितले की, प्रत्येकाने सर्व नावे घ्यायची जरुरी नाही; पाहुण्यांना लवकर जायची घाई आहे. अशा सूचनेनंतरही कार्यकर्ते आग्रहाने आपापल्या माणसांची नावे घेऊनच भाषण सुरू करीत.

शिरूरचे नगराध्यक्ष बोलले. त्यांनी सौ. जोगांकडे वळून सांगितले, की तुम्ही आमच्या शिरूर तालुक्याच्या अमूक अमूक योजनेसाठी बँकेचे कर्ज मिळवून देण्यासाठी जोगांकडे वशिला लावावा.

त्यानंतरच्या प्रत्येक वक्त्यानेही ह्याच वशिल्यांची भाषा काढली.

तेवढ्यात दुसरी एक गाडी वाजली. ती महापालिकेची मेडिकल-व्हॅन होती, त्यातून दहा-बारा डॉक्टर्स उतरले. तिघा-चौघांनी कानाशी छोटा ट्रॅन्झिस्टर धरला होता. उतरताना तो त्यांनी कानावेगळा होऊ दिला नव्हता. उरलेले त्यांच्या काना-कानाशी होते.

एकदम आठवले. आज इंग्लंडबरोबरच्या क्रिकेट मॅचचा शेवटचा दिवस. सामना फारच अटोतटीचा होता. शेवटच्या क्षणापर्यंत कोण जिंकणार हे सांगता येणार नव्हते. डॉक्टर मंडळी इतरांना त्रास होऊ नये म्हणून बाजूच्या बाकड्यावर बसून कॉमेंट्री ऐकू लागली.

महिलांची भाषणे चालली होती. त्या आपली मुले सांभाळायला येणार हे ऐकल्यावर कामावरच्या बायका हादरल्या असाव्यात. भाषणे थोडक्यात झाली.

इकडे कॉमेंट्री जोरात होती. सगळ्यांनी हा: केले की समजे आपण फोर मारलीय. अगदी हात झटकून हळूहळू ऐकू आली की आउट.

चहा तयार होता. तो झाल्यावर सगळे शिरूरच्या दिशेने सुटले. डॉक्टरांच्या पडलेल्या चेहेऱ्यांवरून बहुतेक आपण हरलो असे समजत होते.

नगराध्यक्ष रसिकशेटनी आपल्या घरी सर्व पाहुण्यांना बोलावले होते. रसिकशेट जर्दाचे मोठे व्यापारी. त्यांचे घर आतल्या बाजूला होते. आत शिरताच ते साधे नसून प्रचंड महाल असल्याचे जाणवले. इंटीरिअर डेकोरेशनचा सगळीकडे बुजबुजाट होता. सगळीकडे ऑइलपेन्ट, फोरमायका, फॉल्स सीलिंग्ज, डिझाइनच्या भिंती, नक्षीची लाकडी पार्टिशन्स, इत्यादी मधूनच उभा केलेला मारवाडी पद्धतीचा देवीचा पुतळा. डनलॉप स्पंजचे सोफाज, खाली गालिचा.

सगळ्या महिलांच्या केसांच्या टोपल्या झाल्या होत्या. सगळे अंग धुळीने माखलेले. रसिकशेट त्यांना बेसिन्स दाखवत होते.

त्यांचा जेवून जाण्याचाच आग्रह होता. पण कुणाला वेळ नव्हता म्हणून चहापाण्यावर निभावले होते. सर्व महिला, पत्रकार, राजकीय कार्यकर्ते, पुण्यातले चारसहा नगरपिते– असे सर्व त्या हॉलमध्ये जमले होते. चिवडा आला. दाणे, खोबरे भरपूर. खारे काजू आले. वेफर्स आले. बारीक शेव आली. बिस्किटे आली. संपले की परत परत घालायला नोकर-माणसे तत्पर होती. चहापाणी म्हणता म्हणता जेवणच झाले. मग चहा-कॉफी.

रात्र झाली होती.

परतताना सगळे दमले होते. गाडीत कुणी फारसं बोलत नव्हतं. मग बाहेरचा अंधार पाहात बसलो. वाटलं, पंधरा वीस गाड्यांना शंभर मैल रनिंग. त्यातही पुढचा रस्ता खराब. किती पेट्रोल लागले असेल. किमान हजार रुपये तरी.

सभेचा खर्च किती? टेबल-खुर्च्यांची वाहतूक. कार्यकर्त्यांचे चहापाणी. पूनमच्या वेटर्सचा पगार, सगळे मिळून शंभर रुपये तरी. माइक आणि रेकॉर्डचा खर्च शंभरच अंदाजे.

रसिकशेटच्या घरी चहापाणी झाले. तीस–चाळीस माणसे होती. प्रत्येकी दोन-तीन रुपये तो शंभर रुपये धरा. उद्या पेपरमध्ये आणि फोटो येणार,– त्याचा खर्च किती येईल तो माहीत नाही.

शेवटचे आणि मोठे म्हणजे हजार-एक मजुरांची अर्ध्या दिवसाच्या कामाला चाट. अडीच रुपये रोजाप्रमाणे निदान हजार रुपये तरी धरा.

ठीक आहे. सगळ्याचाच हिशोब करू नये म्हणतात. वातावरण निर्माण होते. मदतीसाठी उत्साह मिळतो. दुष्काळी कामावरच्या लोकांना एक दिवस रेकॉर्डस् ऐकायला मिळतात. त्यांची करमणूक होते. किंवा हे खर्च झाले, ते कोणी वाचवून पैसे फंडाला देत नाही. रसिकशेटने चहा-चिवडा दिला ते पाहुणे आले म्हणून. एरवी तो खर्चच झाला असता का ?

हे माहीत आहे आम्हाला.

पण सगळे एका रात्रीच्या पिठल्यासाठी !

गाड्या पुण्यात शिरत होत्या. पुणे झोपायसाठी पेंगत होते. दुकानांची शटर्स बंद होत होती. मंडळी घरी जाऊन गरम पाण्याचा शॉवरबाथ घेणार होती. इतरांना सांगायला दुष्काळातल्या हालांची वर्णने मनाशी जुळवीत होती.

साळुंके नावाचे एक तरुण इंजिनीयर माझे स्नेही आहेत. त्यांचा पुण्याजवळच स्वतः उभारलेला टूल्सचा कारखाना आहे या दुष्काळाने त्यांना झपाटून टाकले होते. कारखान्याचा व्याप सहकाऱ्यांवर सोपवून तीन-चार महिने त्यांनी सासवड भागात काम केले. त्यांची 'फिट' (फोरम ऑफ इंडस्ट्रियल टेक्नॉलॉजिस्ट्स) नावाची संस्था आहे,– तिच्यातर्फे.

एके दिवशी सकाळीच फोन आला,– 'मी साळुंके बोलतोय, आम्ही सासवड तालुक्यात काम करतोय; तिकडे आताच एक भानगड उपस्थित झाली आहे. येता का ?'

होकार भरून मी निघालो,

दाढी, पांढरा स्वच्छ खादीचा बुशशर्ट, आणि खाली तसलीच पँट घालून आणि हातात कसली ड्रॉइंग शीटस् घेऊन वाट पाहात उभेच होते. गाडीत त्यांनी त्यांच्या कामाची माहिती सांगितली.

त्यांनी काही दुष्काळी कामे पाहिली. खडी-केन्द्रावर विशेषतः त्यांना त्यातील निरर्थकता फारच जाणवली. दुष्काळी कामाचा बरोबर उपयोग करून घेतला तर कधी झाली नव्हती येवढी शेती-सुधारणा होईल म्हणून नाला बंडिंग आणि पाझर तलाव असलीच कामे सर्वत्र सुरू केली पाहिजेत, असे त्यांना वाटले.

सरकारकडे तुटवडा आहे, सर्व्हे करणाऱ्या तंत्रज्ञांचा. 'फिट'ने ठरवले की हे काम आपण करायचे.

मग ते इंजिनीयरिंग कॉलेजात गेले. प्राचार्यांना भेटले, मुलांना भेटले. आणि या कामासाठी विद्यार्थ्यांच्या तुकड्या आठ आठ दिवस बाहेर काढून त्यांना सर्व्हेच्या कामाला लावले.

जिऑलॉजिकल् सर्व्हे ऑफ इंडियातून साळुंक्यांनी टोपो-शीट्स् आणले. टोपो शीटवर त्या त्या भागाच्या जमिनीचा उंचसखलपणा, नद्या इ. गोष्टी दाखवणारा नकाशा असतो. त्यावरून तलाव, नाला बंडिंगच्या जागा निवडून त्यांचे सर्व्हेज करायचे काम त्यांनी सुरू केले.

अशाच एका सर्व्हेच्या ठिकाणी आज जायचे होते.

त्या गावाचे नाव होते गुळुंच. हे तालुक्याच्या उपसभापतींचं गाव. या गावाजवळ खोल पाझर तलाव होईल असं साळुंक्यांना वाटलं, योगायोगाने त्याच गावचा पुण्यात काम करणारा माणूसही भेटला. त्याने उत्साहाने त्यांना गावात नेले.

नंतर साळुंक्यांनी ठरवलेल्या साइटवर विद्यार्थ्यांची बॅच पाठवली. तिचे काम सुरूही झाले. आणि एका रात्री बॅच-प्रमुखांचा साळुंक्यांना पुण्याला फोन आला की, 'सर्व्हेच्या कामाला काही लोक विरोध करत आहेत. आम्ही लावलेले खुणेचे झेंडे उपटून टाकले आहेत. पुढं काय करायचे ते सांगा. आणि तुम्ही ताबडतोब इथे या.'

म्हणून काय भानगड आहे पाहायला साळुंके निघाले. आधी सासवडला गेलो. तिथल्या तहसीलदारांना भेटलो. ते म्हणाले, मीही येतो तुमच्याबरोबर.'

त्यांना गाडीत घेऊन दुपारी बाराच्या सुमारास आम्ही गुळुंच्याला पोहोचलो.

गाव छोटं होतं. पांढऱ्या मातीची बरीच पडकी घरे. एकही रस्ता लायनीत नाही. प्रशस्त झाडाखाली गाडी उभी केली, आणि गावात शिरलो.

एका जुन्याच पण बऱ्यापैकी घरात शिरलो. हे उपसभापतींचे घर. एवढी माणसे घरात गेल्याने तिथे जरा गडबड झाली. काळे, तरुण आणि स्थूल अंगाचे, बनियन-पायजम्यातले उपसभापती खाली आले. आमच्याबरोबर रावसाहेब असल्याने भेटीला वजन आले होते.

साळुंक्यांनी इतका वेळ आवरून धरले होते. उपसभापती भेटताच बोलायला सुरुवात केली. साळुंके म्हणाले,

'काय, तुम्ही लोकांनी आमच्या मुलांना काम करू दिले नाही ?'

उपसभापती म्हणाले, 'आम्ही कुठं काय केलं ? आमचा तर पाठिंबाच आहे. विचारा तुमच्या लोकांना.'

साळुंके बोलतच होते, 'गावाला गावाचे हित कळू नये हे दुर्दैव आहे ! आज पाच सात लाख रुपये या गावात या तलावाच्या निमित्ताने येतील. त्याचे

नुसते व्याज बघितले तरी वर्षाला पन्नास हजार तुमच्या गावावर इन्व्हेस्ट होतील. तुम्हाला हे कळत नसेल तर कसं होणार देशाचं ?'

देशांचे वगैरे बोलू लागताच उपसभापती परत मध्ये पडले.

'अहो साहेब, पण तुम्ही म्हणताय त्याला आमचा कुठे विरोध आहे ? आम्हाला काय सांगताय, त्यांना सांगा हे.'

'कोण लोक ?'

'तेच ते–तुम्हांला ज्यांनी आणलं ते.'

साळुंके उठले. म्हणाले, 'त्यांना बोलावून घ्या.'

एका पोराला पिटाळले. एव्हाना संवाद ऐकायला सोप्यात पंचवीस-तीस माणसे जमली होती.

उपसभापती सांगू लागले, 'त्या दिवशी तुम्ही आलात. तुम्हांला त्यांनी आणले. आम्ही गावाचं काम म्हणून आलो. तुम्ही नकाशाप्रमाणं जागा शोधू लागला तेव्हा आमच्या बरोबर ध्यानात आलं की तुम्हाला कुठली जागा पाहिजेल ते. तिथं काय होणार माहीत असल्यानं म्हणालो, आम्ही इथंच झाडाखाली थांबतो, तुम्हीच पाहून या–त्याच कारण तेच.'

'पण कारण काय ?'

'कारण हेच की, त्या साइटवरच्या तलावाखाली त्यांची थोडी जमीन जाईल.'

'पण किती जाते ?'

'उगाच दोन-अडीच एकर. त्यांना आहे मस दोन–अडीचशे एकर.'

'पण मग एवढ्या उत्साहाने त्यांनी आम्हाला आणलं कसं इथं ?'

'अहो, त्यांच्या मनात ती वरची साइट दाखवायची होती. तिकडं तलाव केला की त्यांची जमीन जात नव्हती. आणि पुन्हा क्रेडिटही मिळत होतं. तुम्ही भलतीच साइट काढलीत. त्यांना वाटायला नको–आम्हीच भरवले, म्हणून आम्ही पुढे आलोच नाही.'

'काय होणार देशाचं ? कशी सुधारणा होणार ? कसे आपण पुढे जाणार ?

'अहो पण आमची काय ना आहे का त्याला ? ती पार्टी आडवी आली त्याला आम्ही काय करणार ?

'बरं, आता काय करायचं ?आम्हांला सर्व्हे करू देणार आहात की नाही ?'

'ती गॅरंटी देतो. सर्व्हे होईल. आमची माणसे बरोबर उभी राहतील, पण पुढचं तुमचं तुम्ही बघून घ्या.'

तहसीलदार प्रथमच बोलले, 'तुम्ही सर्व्हे तर करा. पुढं कलेक्टरसाहेबांकडून मंजुरी लगेच आणू.'

पण साळुंके कबूल होईनात. ते म्हणाले, ‘आम्ही वेगळ्या आशेनं, वेगळ्या उत्साहानं इथं आलो. गावात एक वेगळं वातावरण तयार करायला आलो. सगळ्या गावाची संमती असेल तरच आम्ही सर्वे करू, नाही तर सगळ्या मुलांना आता परत नेतो.’

उपसभापती म्हणाले, ‘ते तुमचं तुम्ही ठरवा. आम्ही काही विरोध केला नाही. तुमचा सर्वे होईल त्याचा शब्द आम्ही देतो.’

शेवटी साळुंके उठले. म्हणाले. चला संपले. आम्ही त्या साइटवर जाऊन एकदा ती शेवटची तरी पाहतो, त्याचा फोटो काढून घेऊन कारखान्यात लावतो !’

पायीच साइटकडे निघालो.

दोन्हीकडे टेकड्या आणि मध्ये शेते पसरली होती. साळुंके उत्साहाने दाखवू लागले, ‘बघा किती सुंदर साइट आहे. दोन्हींकडे उंचवटे, या ठिकाणी फक्त बांध घालायचा. पाण्यासाठी ते बघा तिकडून दोन ओढेही अनायासे येताहेत. मला तर वाटते, हा मायनर इरिगेशनचा सुद्धा प्रोजेक्ट होऊ शकेल.’

त्यांचा उत्साह पाहता मायनर इरिगेशनच काय, तिथे भाक्रा–नानगल सुद्धा होईलसे वाटत होते.

तिथे एक शेतकरी भेटला. चार एकर जमीन आहे. त्याची त्यातली दोन एकर या तलावाखाली जाणार होती. त्याला विचारले, ‘तुमची काय हरकत आहे ?’ तो म्हणाला, ‘नाही बुवा.’ आश्चर्य वाटून कारण विचारताच तो म्हणाला ‘वरचे गेले तरी खालच्या दोन एकरांना तर पाणी मिळंल’ साळुंके म्हणाले, ‘बघा–हा छोटा शेतकरी तयार आहे आणि मोठे मात्र विरोध करताहेत.’

फोटो काढण्याचा प्रोग्रॅम झाल्यावर परतलो.

परतताना स्थानिक माणसाला विचारले, ‘तुम्ही पार्टीचं म्हणत होता, त्यांची कुठली पार्टी– कॉंग्रेस की सोशॅलिस्ट ?’ तो म्हणाला, ‘तसल्या पार्टी इथं नाहीत. ही म्हणजे विरुद्ध पार्टी. यांनी एक केलं की त्याच्या उरफाटं त्यांनी करायचं.’

मी आणि तहशीलदारांनी साळुंक्यांना समजावले : ‘तुम्ही बॅंच लगेच नेऊ नका परत. हे म्हणताहेत ना तुमच्या सर्वेला प्रोटेक्शन देऊ, तर करून टाका. पुढचे पुढे पाहू.’ साळुंके द्विधा होत गेले.

गावापाशी पोहोचलो होतो.

झाडाखाली त्या पार्टीचा माणूस होता. तो पुढं येऊन म्हणाला, ‘का हो साहेब, कधी आले ? काही समजलंच नाही आल्याचं !’

‘काय, तुमचा विरोध आहे म्हणे तलावाला. आम्ही जाणार परत.’

‘असं कसं ? आमचा कुठंय विरोध ? फक्त गोरगरिबाची जमीन जाणार म्हणून वाईट वाटतंय, येवढंच. पण सर्वे करायला काहीच हरकत नाही.’

समेट झाला. प्रतीक म्हणून फोटो काढले. आनंदात परतलो.

दुसरे दिवशी परत फोन, सर्वेचे झेंडे उपटले गेले. मुलांना दमदाटीही झाली.

त्या दिवशी साळुंके फार नर्व्हस वाटले. ते म्हणाले, 'या लोकांना सायंटिफिक ओरिएंटेशनच नाही. कशी होणार सुधारणा ?'

मी साळुंक्यांना म्हटले, 'याला उपाय एकच. तो म्हणजे : ते म्हणताहेत ती दुसरी साइट निवडणे' पण साळुंके सायंटिफिक जागा सोडायला तयार नव्हते; आणि पुन्हा गावाने एकमताने ती निवडली पाहिजे असेही म्हणत होते.

ते म्हणाले, 'आमच्या कामात आम्हाला राजकारण आणायचे नाहीय. आम्ही ते आत्तापर्यंत टाळले आहे.'

मी म्हणालो, 'पण ते येणार,– प्रत्येक बाबतीत येणार ! ती चौकट समजावून घेऊनच पुढे काम केले पाहिजे. ते नसेल करायचे तर मग तुम्हांला तुमच्या कामाचा पॅटर्नच बदलायला पाहिजे.'

साळुंके परत गुळूंच्याला गेले नाहीत. नंतर एकदा कुठे तरी भेटले तेव्हा म्हणाले, 'आता आम्ही कामाचा सगळा पॅटर्नच बदलून काम करत आहोत !'

तो दिवस विलक्षण ताण घेऊन आला आणि थकवा आणणारा ताण देऊनच संपला.

त्या दिवशी सकाळीच बार्शीहून जीप घेऊन निघालो; आणि रात्री परतलो. आदल्या रात्री भरपूर जेवलो होतो. त्या दिवशी कुर्डुवाडीलाही एका डॉक्टरांच्या घरी सुग्रास जेवलो, आणि रात्री परत भरगच्च जेवण. अधेमधे बरीच अर्धपोटी, उपासपोटी माणसे भेटली.

सकाळीच कुर्डुवाडीला पोहोचलो. ओळखीच्या डॉक्टरांकडे गेलो. तिथून स्थानिक माहितगार माणसांना घेऊन पुढे जायचे होते. पण जेवून जायला आग्रह पडला. तयारी होईपर्यंत जवळच्या एका कामावर जाऊन आलो.

जीप धडकताच माणसे जमली.

दुष्काळी कामावर आपल्या इकडल्या पँट–शर्टवाल्यांना फार भाव असतो. त्या हजारो लोकांचे आपण एकदम साहेब बनतो. जीप घेऊन गेल्यावर तर विचारूच नका. सरकारी माणसेच आपण.

तिथं गेलं की रुबाबात ठरलेले प्रश्न विचारायचे असतात : 'काय रे, (अरे तुरेने बोललेले उत्तम) किती माणसे इथे कामावर आहेत ? कोण मुकादम आहे इथे ? मस्टर-रोल बघू ? किती रोज पडतो ? गेल्या आठवड्यात किती मिळाले ? धान्य किती मिळते, इत्यादी. आपण गेल्यावर धो धो जमणारी माणसं

पण ठरलेलीच असतात. मग साहेब, हे काम संपल्यावर पुढचं कुठलं सुरू करणार ? पलीकडचं अमकं अमकं काम घ्या, लोकांना बरं पडेल, इत्यादी. (ते काम याला, याच्या शेताला नक्की फायद्याचं असणार, हे आपण समजायचं.)

त्या कामावरही अशीच माणसे जमली. सुरुवातीची ठरलेली प्रश्नोत्तरे झाल्यावर प्रत्यक्ष कामावर गेलो. त्यातला एक माणूस जरा तेज होता. तो म्हणाला, 'साहेब, खरं सांगतो, आम्हांला इथं काही रोजगार पडत नाही. पन्नास पैसे, पंच्याण्णव पैसे, अगदी जास्तीत जास्त म्हणजे एक रुपया दहा पैसे पडला होता एकदा.'

प्रत्यक्ष कामावर आलो.

बाजूला पाझर तलावाचा लांबवर गेलेला बांध होता. खाली खणण्याचे काम सर्व माणसे करत होती.

आम्हाला पाहताच सगळी बाया-माणसे भोवती जमली. माझ्या बरोबरचे गृहस्थ अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते. ते लोकांना काही तांत्रिक प्रश्न विचारत होते. मी बाया जमल्या तिथे गेलो.

एक धीट बाई म्हणाली, 'मक्याची भाकर जन्मात नव्हती खाल्ली, ती आता खात आहोत.' एकीने फडकं सोडून भाकरी दाखवली. बरोबर एक पुडी होती, त्यात लाल तिखटाची पूड होती. बाकी काही नव्हते.

'या दुष्काळामुळे कोणी कोणी घरातली भांडी–कुंडी, वस्तू गहाण टाकल्या आहेत ?'

त्यावर बऱ्याच बाया एकदम बोलू लागल्या. एकेकीला बोलायला लावले. बहुतेकींचे दागदागिने कधीचेच गहाण होते. आता भांडी–कुंडी पडली होती. बहुतेक घरे साफ झाली होती.

'तुमच्यातले कोणी उपाशी आहे का ?'

या प्रश्नावर शांतता पसरली. एक बाई पुढे झाली आणि समजायच्या आत माझ्या पायावरच पडली. पायाला ओले लागताच समजले की, ती रडते आहे.

त्या आधीच्या धीट बाईने सांगितले, 'तिचा दादला नुकताच वारलाय. तिला एक पोर आहे. तिच्याच्यानं दगड फोडायचं काम करवत नाही, तरी पोटासाठी येते. गेले तीन दिवस तिला खायला काही नाही. आम्ही आमच्यातलं थोडं देतो. पण कोण कोणाला देणार ? दिवसच असे.'

पाय अशा रीतीने कधी भिजले नव्हते.

तोपर्यंत पायांवर पडलेली बाई तशीच. मला फार ऑकवर्ड वाटले.

मी बाजूला होतोय तोच एक म्हातारी रडत आली. तिचे गावाकडचे घर जळाले म्हणून मुलगा तिकडे गेलाय तो आलाच नाही. हिच्याच्यानं काम होत नाही, तरी पोटासाठी यावं लागतं. तीही उपाशी होती.

आणखी दोन–तीन तरण्याताठ्या मुलीही रडत सांगू लागल्या. आणि क्षणार्धातच सर्वच बाया रडू लागल्या. प्रत्येकजण वेगळे हातवारे करत होती. प्रत्येकीच्या पोटात भूक लागली असली तरी सांगणे वेगळे होते. त्या बोलत होत्या ते पलीकडच्या बाईलासुद्धा ऐकू येत नव्हते. इतका कोलाहल होता. मला ऐकू येणे तर शक्यच नव्हते. पण तरी त्या बोलत होत्या.

मी त्यांना जसा काही अन्नदाता वाटत होतो. त्यांच्या दुःख–क्षालनाचे सर्व मार्ग, अधिकार माझ्या हातात आहेत असे वाटत असावे. पण तसेही नसेल. कदाचित हे दुःख सामुदायिकरित्या बाहेर व्यक्त करणे होच या क्षणाची त्यांना गरज वाटली असेल.

काहीही असले, तरी रोज जे अन्न आपण सहजपणे खातो, जी गोष्ट रोजच्या कार्यक्रमात लक्षातही येत नाही, त्या अन्नासाठी एवढ्या तरण्याताठ्या, म्हाताऱ्या बायाबापड्यांना जमावाने रडावेसे वाटावे. ही गोष्टच भयंकर होती !

तिकडे आमच्या मित्राची आर्थिक पाहणी पूर्ण झाली होती.

जीप परत निघाली. कुर्डुवाडीला डॉक्टर स्नेह्यांकडे सुग्रास जेवण आमची वाट पाहात होते.

कुर्डुवाडीच्या पुढे जीपमध्ये एक समाजवादी कार्यकर्ते एक करमाळ्याचे पत्रकार सामील झाले. रस्ता माढा तालुक्यातून चालला होता.

रस्ता सोडून कच्च्या रस्त्याने एका खडी–केंद्रापाशी येऊन जीप थांबली. भाग सगळा उंचसखल होता. पण एक छानदार झाड उन्हात उभे होते. पलीकडे उतरणीवर खडीवर पांढऱ्या रंगात फुल्या काढलेले ढीग पसरले होते. पलीकडे एक मोठी दरी होती. त्यात डोकावले. खाली कोरडा ओढा होता. बाजूला दगडी भिंतीत खडीसाठी दगड काढण्याचे काम चालले होते.

खडी फोडण्याचा तडतड असा ताशा वाजवल्यासारखा आवाज आला की जवळ खडी केंद्र आल्याचे ओळखता येते. इथल्या लोकांच्या तक्रारीही ठरलेल्या असतात. हाताला जखमा होतात घट्टे पडतात. खडीचा दगड कठीण लागला तर रोज कमी पडतो. हातोडे झिजून फाटले आहेत. त्यामुळे दगड काटत नाही. नवे हातोडे पाहिजेत. मूळ दगड फोडायला दारूबत्ती (सुरूंग) वात लागते, त्याचा खर्च मुकादम देत नाही, इत्यादी.

याउलट मुकादम ओव्हरसिअरांच्याही तक्रारी असतात : लोक खडी इकडची तिकडे पळवून डबल मजुरी लाटतात. ब्रास मोजायच्या आधी ढीग करतात. त्यात तळात मोठे दगड टाकतात आणि वर खडी टाकतात. (हे अर्थातच अधिकाऱ्यांच्या संमतीशिवाय कसे होऊ शकेल ?) इत्यादी.

पण मजुरांमध्ये खडी केंद्रे रस्त्याच्या खालोखाल पॉप्युलर. बसून काम-हमखास रोजगार.

याही केंद्रावर असेच पाहायला मिळणार म्हणून नाखुषीनेच उतरलो. त्या केंद्रावरच्या लोकांना गेले पाच आठवडे पगारच झाला नव्हता. तेव्हा सगळ्या चीज–वस्तू गहाण ठेवून कसेबसे दिवस ओढीत होते.

एक म्हातारा पुढे झाला. त्याने लोकांची फडकी सोडून दाखवली. भाकरीचे दोन–चार तुकडे निघत होते. शेवटी म्हणाला, ' आता दोन–चार दिवसांनी हेही संपेल.'

' असे या भागात सगळीकडेच आहे का ?'

' नाही. पलीकडच्या कामावर रोज बरोबर मिळतो. कारण सरपंच त्या गावचा आहे. आमची ही ग्रुप–ग्रामपंचायत आहे. या पंचायतीत बाजूची चार–सहा गावे आहेत.'

' त्या गावांमध्ये रोजगार मिळतो का ?'

' हो. फक्त आम्हालाच त्रास होतो, कारण आमच्या गावावर सरपंचाचा राग आहे.'

' का ? '

' कारण आम्ही आमच्या गावाला सेपरेट पंचायत मिळावी म्हणून अर्ज केला होता. तो मंजूर झाला नाही. मग आम्ही पंचायत निवडणुकीत कोणी उभाही केला नाही. आणि कुणाला मतदान पण केलं नाही.'

मी हुश्श करून दरीतली उतरण उतरू लागलो. जमलेल्या लोकांबरोबर आमचे इतर मित्र बोलत होते. दरीचे काठ काळ्या दगडाने बनले होते. त्यावर झालेल्या खोदकामाने दगडांना सुरेख टेक्श्चर आले होते. ते जवळून पाहण्यासाठी मी जरासा उतरून दगडाला स्पर्श करायला गेलो.

खालून एक माणूस वर येत होता. तो मला म्हणाला, ' साहेब, फार खाली जाऊ नका.'

' का ?'

' परवा एक बाप आणि मुलगा या दगडात जरा खोदाई करून सावलीला जेवायला बसले होते.'

ऐकताना वाटले, खरंच त्या एका झाडाशिवाय तिथे सावलीच नव्हती. म्हणून लोकांनी दगडांत सावली करायचा मार्ग काढला असावा.

तो पुढे सांगू लागला, ' पुढं असं झालं, जेवता जेवता वरचं सगळंच त्यांच्या अंगावर कोसळलं, पारच गाडले गेले. कुणाला माहितीही नव्हतं. मागून एकाच्या लक्षात आल्यावर मग मुडदे बाहेर काढले.'

परत जीपपर्यंत आलो.

मनातल्या मनात त्या बाप-लेकांना सरकारी सर्टिफिकेट देऊन टाकले,

'दगड कोसळून अपघाताने मृत्यू. दुष्काळाचा त्याच्याशी काहीही संबंध नाही.'

संध्याकाळची वेळ.

करमाळा दूर होते. रस्ता संपत नव्हता.

एक छोटं गाव आले. तिथे रस्त्यात दोनचार, मोठ्या पागोट्यातल्या माणसांनी हात करून जीप थांबवली. गाडीतल्या लोकांचे ते ओळखीचे होते. उतरून स्टँडवरच्या बाकांवर आम्ही बसलो. त्यांचं गाव तिथून आत दहा मैलांवर होतं.

लाल मोठ्या पागोट्यातला माणूस होता. 'आमच्या गावाला भूकबळी पडलाय. आम्ही बोंबलतोय पण कोणी लक्ष देत नाही.'

'कधी पडला ?'

'झाले चार दिवस. एक बाई होती. आमच्याकडे सात आठ आठवडे पगार नाही.'

'गावापर्यंत जीप जाते का ?'

'जाते.'

'मग चला.'

वाटेत त्याला गावची माहिती विचारली. निम्मे गाव धनगरांचे, निम्मे मुसलमानांचे. सध्या सरपंच मुसलमान आहे. ही बाई मेली ही धनगराची.'

मी विचारले, 'मग तुम्ही सरपंचाकडे भूकबळीचा रिपोर्ट केला का ?'

'तो म्हणतो हा भूकबळीच नाही. म्हणतो, ती आधी तापाने आजारी होती.'

'मग वर तक्रार केली का ?'

'आमचा सरपंच फार चलाख आहे. जिल्ह्यातले सगळे पुढारी त्याच्याकडे जेवायला, प्यायला येतात. त्याच्याकडे एक फार चवदार स्वयंपाक करणारा माणूस आहे. त्याची स्पेशालिटी आहे. पुन्हा पलीकडे कोल्हाट्यांचं गाव आहे. तिथल्या नामांकित कोल्हाटणींचीही व्यवस्था हा करतो.'

येथपावेतो गाव आले.

जीप पाहताच तिथे निम्मे गाव जमले. आम्ही कोण हे समजताच चेहरे पडले. कारण त्यांना वाटले होते की पगाराचीच जीप आलीय.

उतरून फेटेवाल्याने समोरच्याच घरात नेले. इथं ती बाई राहत होती.

एक उंच आवाराचे दार होते. त्याला दगडी पायऱ्या होत्या. पायऱ्यांच्या बाजूला एक मातीचे, एका खोलीचे छोटे घर होते. ते तिचे घर.

पायऱ्यांवर एक म्हातारा बसला होता. लोंबणाऱ्या सुरकुत्यांनी चेहेरा भरून गेला होता. डोळ्यांत मोतीबिंदूचे राज्य होते. ती बाई म्हणजे म्हाताऱ्याची बायको. त्याला प्रश्न विचारले ते कळलेच नाहीत. 'ती गेली' या अर्थाचे फक्त हात झटकले !

आमचा पत्रकार मित्र या कामात तरबेज होता. तो म्हणाला, 'यांचे रेशनकार्ड कुठे आहे ?' त्यांनी वळचणीच्या खोबणीत ठेवलेले रेशनकार्ड काढून दाखवले. त्यात एक महिन्यापूर्वी रेशन–ते सुद्धा फक्त मका– नेल्याची नोंद होती.

त्या बाईची मुलेही तिथे बसली होती. तीही तरणी, चांगली कामे करणारी होती.

मी म्हटले, 'मी घरात जाऊ का ?'

फेटेवाला पुढे होऊन म्हणाला, 'साहेब जाऊन या आणि खात्री करून घ्या.'

घरातल्या बाहेरच्या बाजूला एक चूल होती. त्यात लाकडे पेटत होती. वर एक तवा होता. त्यावर बाईची सून गवताचा पाला परतत होती.

मी 'हे काय' विचारता मुलाने सांगितले, 'हे गवत चवीला बरं असतं. तव्यावर परतून घेतलं की पचायला सोपं.'

'तेलावर परतता का ?'

'नाही, तसंच.'

मी आत शिरलो.

खोली स्वच्छ होती. एकही भांडे नव्हते. थोडेसे साठवलेले गवत होते. एक एक छोटा कोनाडा होता. त्यात गंजलेली बिन-काचेची चिमणी होती.

बाहेर आलो. एव्हाना बरीच गर्दी जमली होती. सगळा जमाव खंगलेला दिसत होता. एक बाई काही जोराने बोलू लागली. तिला फेटेवाल्याने दटावले की, 'सरकारी माणसं नाहीत. परिस्थिती पाहायला आली आहेत.'

मी म्हटले, 'सरपंचांना भेटू. त्यांचे घर दाखवा.' कोणी यायला तयार होईना. त्यांनीं दोन-चार मुलांना बरोबर दिले.

पांढऱ्या रंगाचे मशीदवजा घर होते. तिथं गच्चीवर आम्हाला नेले. सरपंच नदीकाठी संडासला गेले होते. तोपर्यंत बरीच चट्टयापट्टयांच्या लुंग्यांतली मुसलमान मंडळी जमली. आमच्याकडे सर्वजण संशयाने पाहात होते.

लांबून पायजमा–शर्टातला हातात लोटा घेतलेला तरुण येताना दिसला. हे सरपंच.

जवळ येताच आमची वर्दी त्यांना गेली. ते जरा गडबडले. बराच वेळ वर आले नाहीत. बरोबरचे पत्रकार त्यांच्या माहितीतले. त्यांना खाली बोलावून घेतले. बऱ्याच वेळाने बोहल्यावरची वधू उशीरा यावी तसे ते आले आणि समोर बसले.

' साब, हमे पता नही आपण आनेवाले है। नाही तो हम मोटार घेऊन फाटेपर आ जाते...' असल्या भाषेत सुरू केले.

आम्हाला फार वेळ नसल्याने मुद्द्याचे प्रश्नच तेवढे विचारावेत अशा विचाराने म्हटले, ' आपल्या गावात भूकबळी पडला अशी बातमी आहे. खरी आहे का ?'

' ये तो भूकबळी नहीं है. औरत बीमार होती. साब, इधर बहुत राजकारन आहे.'

' राजकारण असतेच. तुम्ही सरपंच या नात्याने त्या बाईला बघायला गेला होतात का ?'

' नाही बुवा. पण मला माहीत आहे, बीमार होती.'

' कसे काय ?'

' आमचे लोक तिथं असतातच. ते येऊन सांगतात.'

' पण परवा मुख्यमंत्र्यांनी असे जाहीर केलेय की भूकबळी पडला तर ती सरपंचाची जबाबदारी मानू. एखाद्या माणसाचे अन्नावाचून जीवन धोक्यात येत असेल तर सरपंचाने आधी धान्य पुरवावे. मग सरकार ते देईल. त्याची तुम्हाला माहिती नाही का ?'

' नाही बुवा. सर्क्युलर नाही आलं आमच्याकडे '

' बर, लोकांचे पगार वेळेवर का होत नाहीत ?'

' तो याचीच भानगड आहे. गावाला खडीकेंद्र काढलं. तिथं यांचं आमचं जमेना. भांडणं व्हायला लागली. यांनी दुसरं सेंटर मागितलं, आणि काम बद ठेवलं. त्यात टाइम गेला. आता नव सुरू झाल आहे—महिन्यापूर्वी.'

' मग महिन्याचा तरी पगार का नाही वेळेवर मिळत ?'

' ते आता माझ्या काय हातात आहे ?'

तेवढ्यात चहा आला, आमचे कामही संपले होते. सरपंच म्हणत होते, ' आपण एवढं मोठे मेहमान आलात तर गरीबाघरचा पाहुणचार घेऊन जा. काय आवडते साहेबांना ? हे खेडं असलं तरी सगळी व्यवस्था आहे.' ' नाही.' म्हणून निघालो.

५...

परतताना त्या बाईच्या घरापाशी थांबलो. म्हाताऱ्यास 'जातो' म्हणून सांगितले. गाडीत एकदोन गावातली माणसे फाट्यावर सोडा म्हणून बसली, फेटेवाल्याने रामराम ठोकला. जीप निघाली.

गावातल्या त्या माणसाला विचारले, 'ह्या फेटेवाल्या पाटलांची किती जमीन आहे?'

तो म्हणाला, 'आहे मस दोनसं एकर. त्याला आता सरपंच हुयाचं आहे.' मी म्हटले, 'दुष्काळात कशी काय परिस्थिती आहे त्याची?' तो म्हणाला,' चांगला पैसेवाला आहे तो. दुष्काळ पडला तसा त्याची दीड खंडी जनावरं त्यानं वऱ्हाडात लावुन दिलीया. घरी दाणंही बरंच आहेत.'

'मग, ती बाई मरायला आली तेव्हा त्यानं का नाही दाणे दिले?'

'अहो, फार चिकट मारवाडी हाय तो. कशाला दील? त्याला माहित होतं. बाईचा पोरगा उसनं दाणं मागायला गेला हुता त्याच्याकडं. पण दिलं नाहीत.'

तेवढ्यात लांबून गाडीचे दोन दिवे दिसले. या आड–रस्त्यावर ही कोणाची गाडी म्हणून पाहू लागतो. गाडी जवळ येऊन थांबली. आमच्या पत्रकाराने ओळखले की, ही तहसीलदाराची जीप आहे.

उतरलो. दिवे विझले. अंधारात कुणाचे तोंड कुणाला दिसत नव्हते. आम्ही तहशीलदारांच्या कानावर हकीगत घातली. ते म्हणाले, 'पगार झाला नाही हे शक्यच नाही. आमच्याकडची बिले सगळी पास झाली आहेत. लबाड बोलत असतील ते लोक.'

मला बाईचे रिकामे घर, कोरे रेशनकार्ड आणि खोल गेलेले चेहरे आठवले.

आम्ही सांगितले 'खरंच नाही त्यांना पगार मिळाला.'

'बरं, बरं; चौकशी करतो.'

त्यांच्याबरोबर डेप्युटी कलेक्टर होते. त्यांनाही प्रकरणात लक्ष घालायची विनंती केली.

जीप धुरळा उठवीत निघून गेली.

गाडीत बसताच मी गावच्या माणसाला म्हटले, 'इतक्यात रात्रीचे या बाजूला कुठे चाललेत तहसीलदारसाहेब?'

तो म्हणाला. 'अहो, आमच्या सरपंचाकडंच चाललेत पार्टीला. सरपंचाची काळी बिरयाणी करण्यात फार पेशालिटी आहे. त्याचाच बेत आहे.'

तेवढ्यात फाटा आला, आणि ते उतरले.

त्यांना उतरवून जीप बार्शीच्या दिशेनं धावू लागली. पोटात कडकडून भूक लागली होती. तिथलं सुग्रास जेवण आमची वाट पहात होतं

---

# दंगल

# १६ मे

# पुणे

पुण्यात सोळा मे ते तेवीस मे हिंदुमुसलमान दंगल झाली. अजून दंगलीची आठवण झाली की आश्चर्य वाटते. या पुण्यात विचारवंतांची कमतरता नाही. प्रबोधनाची या शहरात परंपरा आहे. मुस्लिम सत्यशोधक मंडळासारखी पुरोगामी चळवळ येथेच सुरू झाली आणि रुजली. एसेम जोशींसारखी हिंसकतेला विरोध करून, शांततामय आंदोलने करणारी मोठमोठी माणसेही येथे आहेत. हिंदुमुसलमान प्रश्नापेक्षा तीव्र स्वरूपाचे आणि सर्व सामान्य लोकांचे जीवन भणंग करणारे अनेक

प्रश्न आज समाजजीवन ग्रासून टाकीत आहेत. पुण्यात नसला तरी महाराष्ट्रात सर्वत्र दुष्काळ पडलेला आहे.

हे सर्व असून, ह्या सगळ्या गोष्टी, सर्व नेतृत्व, त्यांचे विचार यांना बाजूला सारून पुण्यासारख्या एखाद्या शहरात एक दंगल उसळते काय आणि, नेहमीसारखी एखाददोन दिवसात आटोपण्याऐवजी चारसहा दिवस पुन्हा पुन्हा कढ येऊन रेंगाळते काय, ही गोष्ट विलक्षण वाटते.

दंगलीच्या आधी पेपरमध्ये कोपऱ्यात कुठेतरी येऊन गेलेल्या अर्धा एक इंची बातम्यांच्या कॉलमाआड एवढी प्रचंड खळबळ दडली असेल असे वाटले नव्हते. एका बौद्ध वरातीवर दुसऱ्या जमातीने सोडावॉटरच्या बाटल्या फेकल्या, वरात उधळली गेली, ही अशीच एक छोटीशी बातमी. किंवा पैगंबर जयंती मिरवणुकी-वर दोघा तरुणांनी अॅसिड बाटल्या फेकल्या, दोन दिवसांनी त्या हिंदू तरुणांना अटक, अशी एक बातमी. तसेच, छाया टॉकीजसमोर दोन गटात मारामारी, एक जखमी, हल्लेखोर फरारी, अशीही एक बातमी.

किंवा ऐकलेल्या अशा गोष्टी होत्या की ज्यांचे महत्त्व त्यावेळी जाणवले नव्हते खेड शिवापूरला काही मुस्लिम नेत्यांची गुप्त बैठक झाली. स्वसरक्षणार्थ प्रत्येकाने घरात, मशिदीत शस्त्रसाठा करावा असे ठरले. ह्या मिटींगची बातमी आणि हकीगत समजताच पुण्याच्या पोलीस कमिशनरने मुस्लिम नेत्यांना बोलावून, इथे कायदा आणि सुव्यवस्थेची जबाबदारी आमची आहे, तुम्ही साठे केलेत तर परिणाम चांगले होणार नाहीत, अशी त्यांना समज दिली.

याचा विपर्यास करून, तुम्ही शस्त्रे साठवलीत तर मी पुण्याची भिवंडी करून टाकीन असा दम कमिशनरांनी आम्हाला दिला, अशी तक्रार मुस्लिम मंडळींनी इथल्या दिल्लीधिष्ठित काँग्रेसनेत्यांकडे केली. त्यावर त्यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले. मुख्यमंत्र्यांनी याबाबतीत जपून वागण्याचा इशारा पोलिसखात्याला दिला. त्यामुळे कमिशनरांच्या कृतीवर बरीचशी बंधने पडल्यासारखे झाले.

प्रत्यक्ष दंगलीच्या काळात नामदेव पवारचे नाव सर्वांच्या तोंडी होते. ह्याने शिवजयंतीच्या मिरवणुकीतल्या फ्लोटमध्ये शिवाजीचे काम केले होते. मुसलमानांनी डूख धरून नंतर त्याचा अंगठा तोडला, असे प्रत्येकजण बोलत होता. त्यावरून दंगल उसळली असा एकंदर सूर असे.

दंगलीच्यामागे हिंदु-मुसलमान प्रश्नाचे राजकीय कारण तर मोठ्या प्रमाणात आहेच. यात दुमत नाहीच. पण सामान्य लोकांच्या पातळीवर हा प्रश्न येताना केवळ प्रचलित राजकीय स्वरूपातच येत नसावा. त्याला आणखीही बऱ्याच बाजू असाव्यात, असे वाटले. म्हणून दंगल शमल्यावर त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला तो असा.

या सगळ्या प्रकरणाच्या कारणांची नजिकच्या काळातील सुरुवात बौद्ध लग्न वरातीपासून होते. म्हणून त्याची चौकशी केली. पंधरा एप्रिलची ती रात्र. दुसऱ्या दिवशी पैगंबर जयंती. चौकात मौलाना वसीउद्दीन यांचे वाज (प्रवचन) चालले होते. तिकडून ही वरात आली. वाज पाहून बँडवाल्यांनी बँड थांबवला. यावर रागावून वरातीतल्या एका मातंग तरुणाने बँडवाल्याच्या तोंडात ठेवून दिली. बँड पुन्हा चालू. काही वेळाने वाज ऐकणारे लोक जमून बाचाबाची सुरू झाली. उभयपक्षी दगडफेक, हॉटेलात घुसून बाटल्या लुटून त्यांचीही फेक, असे प्रकार झाले. सर्वत्र पळापळ झाली. पोलीस आले. त्यांनी नवरानवरीला पुढे काढून दिले. पुढच्या चौकातून वरात पूर्ववत चालू लागली.

त्याच्या दुसऱ्या दिवशी पैगंबर जयंतीची मिरवणूक निघाली. तिच्यावर लक्ष्मीरोडवरच्या सतरंजीवाला चौकात दोन ॲसिड बाटल्या फेकल्या गेल्या.

चार दिवसांनी शिवसेनेची सवाद्य मिरवणूक निघाली. दोन दिवसांनी बाळ ठाकरे पुण्यात येणार होते हे निमित्त. मक्का, मदिना, जुम्मा, तांबोळी या मशिदी-वरून सगळे वाजत गाजत गेले. कागदात गुलाल बांधून बोळे मशिदीवर फेकण्यात आले. मक्का मशिदीवरचे घड्याळ फोडण्यात आले. ट्यूबलाईट फोडली. दगड आणि चपला आत फेकण्यात आल्या. मिरवणुकीत एक मुसलमान पात्र असे. इतर भोवती फेर धरून ' बोल, वंदेमातरम् म्हणतोस की नाही ?' तो नाही म्हणताच मागचा माणूस त्याच्या ढुंगणात तलवार खुपसल्यासारखी करे. यावर मुसलमान पात्र ' या अल्ला, या अल्ला ' असे ओरडे. त्यावर बाजूची मंडळी ' तेरे मुँहमे बुल्ला ' असे म्हणत.

त्यानंतर पंधरा दिवस मधे जाऊन चार मेला शिवजयंती आली. पुन्हा सवाद्य मिरवणूक. घोषणाबाजी, गुलाल उधळणे या पलिकडे फारसे झाले नाही. कारण ती सर्वपक्षीय होती. मिरवणुकीचे आपापल्या भागात मुस्लिम पुढाऱ्यांनी स्वागतही केले होते.

नंतर चारच दिवसांनी, आठ मेला, नामदेव पवाराचा प्रसंग घडला. हा प्रसंग जरा तपशीलातून पहायचा ठरवले.

शहर आणि कँपच्या सीमेवर छाया टॉकीज. सर्वत्र दाट बकाल वस्ती. समोर पत्र्याची चाळ नावाची झोपडपट्टी. बाजूला दिलखुश हॉटेल. ह्या हॉटेलात सर्व ग्रुप्स बसत असतात.

नामदेव पवार हा वीज बोर्डाच्या पॉवर हाऊस मधला लाईनमन. तिशी–पस्तीशीचे वय. पहिलवानी रग. बाकदार नाक. रंग काळा. जातीने मातंग. नामदेव

हा आळीतल्या एका गटाचा दादा. व्याजाने पैसे देण्याचा याचा धंदा. रुपयाला चार आणे व्याज. म्हणजे दरसाल दर शेकडा तीनशे रुपये. पैशाच्या व्यवहारावरून इतरांशी सतत भांडणे.

यासिनखान हा बॉडी बिल्डर. बॉडी बिल्डिंगमधला ' महाराष्ट्र श्री. ' दोन-चार महिन्यापूर्वी पतियाळातल्या अखिल भारतीय स्पर्धेत दुसरा. वडील पी. एम्. टी. त. आईचा व्याजाचा धंदा. यासिन स्वतः फार दादागिरीत नसे. पण त्याच्या-भोवतीची माणसे परंपरागत गुन्हेगार. त्याचा मामा बादशहा. हा जुना मोठा दादा. भोकरवाडीत कुणाचा खून केला म्हणून पंधरा वर्षे शिक्षा भोगून नुकताच बाहेर आलाय. रेहमान, सरदार हे दुसरे मामा. त्यांची ख्याती असलीच. ह्या सर्वांचे एकत्रच उठणे-बसणे असते.

मातंग ग्रुपच्या दादाची हकीगत अशी— तो जातीने मातंगच. पण बाप सैयद नावाचा जुना दादा. आता हा मातंग ही दादाच. (त्या भागात अशी उदाहरणे बरीच.) अशा त्या माणसाने एका मुसलमान दारुड्या जुगारी माणसाला पैसे उसने दिले आणि त्या बदल्यात त्याची मुलगी वापरू लागला. त्याच्या मित्रांसह त्याने एकदा तिला लोणावळ्यालाही नेली होती. त्या मुलीबरोबर स्वतःचे नग्न फोटो काढून तो यासिन आणि इतर मुसलमानांना ते दाखवून खिजवू लागला. ही मुलगी यासिनची दूरची नातेवाईक.

अंगठा तुटला ती आठ मे ची गोष्ट.

त्या दिवशी रात्री त्या हॉटेलात एक दुसऱ्याला धेडग्या म्हणाला आणि दुसरा त्याला लांडा म्हणाला, यावरून मारामारी झाली हॉटेल मालकाने दोघांनाहि चौकीवर पोहोचवले. नामदेव पवारला त्याचे दोस्त कामावरून रात्री बारा वाजता रिक्षा करून घरी घेऊन आले. तो उतरताच यासिनने मागून तलवारीचा घाव मानेवर घातला. घाव बसतो आहे हे नामदेवच्या लक्षात येताच त्यांने मान-भोवती हात धरला. आंगठा पूर्णपणे तुटला. मानेवर आठ-दहा इंच लांबीची जखम झाली. तसाच तो चालत जाऊन ससूनला ॲडमिट झाला.

तेवढ्यात पोलीस आले. पण जोरदार दगडफेक करून यासिनच्या मित्रांनी यासिनला पळून जायची संधी दिली. आजतागायत तो फरारीच आहे. त्याची आई म्हणते, यासिन आठ तारखेला तिथे नव्हताच. भावाशी भांडण झाले म्हणून सहा तारखेलाच रागावून घर सोडून निघून गेला. यावर पोलिसांचे म्हणणे असे की यासिनला त्या रात्री तलवार घेऊन जाताना बऱ्याच जणांनी पाहिले आहे.

यासिनच्या मित्राला विचारले, साध्या मारामारीत तलवार कशी आणली? तो म्हणाला, नामदेव त्या रात्री मारामारीत होताच. आम्ही भारी पडू लागलो, तेव्हा पलिकडच्या चौकात एक शिवसेनेचा ग्रूप आहे, त्यांना तो बोलवायला गेला. तयारी पाहिजे म्हणून आम्ही तलवार आणली. पण तो ग्रुप यांच्या मदतीला आलाच नाही.

नामदेव पवाराचे घर पाहिले. पत्र्याच्या चाळीतल्या एका छोट्या खोलीत दोन प्रचंड गोदरेज स्टीलची कपाटे. मांडण्यांवर भांड्यांचे दुकान वाटावे इतकी भांडी, नामदेवने हात सोडून दाखविला. आंगठ्याच्या जागी काहीच नव्हते.

प्रत्यक्ष दंगलीचा दिवस १६ मे.

आदल्या दिवशी मुंबई बंद कार्यक्रम होता. पुण्यात तसेच होणार असा अंदाज होता. बंदमध्ये शिवसेना नव्हती. बंदवाल्यांचा सकाळी मोर्चा निघून कलेक्टर कचेरीवर जाणार होता. कॉंग्रेसचा बंदला अर्थातच विरोध. पदाधिकाऱ्यांनी आपापली दुकाने उघडी ठेवावीत असा पक्षाचा आदेश होता. त्याप्रमाणे बबन किराड, बबन पडवळ, शिवाजीराव ढेरे, मिर्झा हिरौली या पुढारी लोकांनी दुकाने उघडीही ठेवली होती. इतरांना ते सांगायला गेले, पण त्यांचे कोणी ऐकले नाही.

सकाळी मंडई बंद करण्यासाठी गेलेल्या जनसंघवाल्यांची मंडईवाल्यांशी थोडी चकमक झाली पण लगेच निवळली. नाना पेठेत बबन पडवळच्या दुकानापुढे लोक जाताच त्यांनीही दुकान बंद केले.

मोर्चा मोठा होता. लक्ष्मी रोडने सकाळी अकरा वाजता अल्पना टॉकीज-वरून गेला. मोर्चाचे शेवटचे टोक अल्पनाच्या पुढच्या चौकात असेल तो इकडे पंधरा ते बावीसच्या दरम्यान वयाच्या मुलांचा एक छोटा मोर्चा अल्पनासमोरच्या टकार गल्लीत शिरला. मशिदीवर दगडफेक केली. आणि पुण्याची दंगल सुरू झाली.

टकार गल्लीत अंड्याची बरीच दुकाने आहेत. ही मुले एक दुकान बंद करावे म्हणून तिथे गेली आणि दगडफेक सुरू झाली. जाताना मशिदीवरही दगड-फेक झाली. आतूनही दगडफेकीने उत्तर आले. मुलांना नंतर तिन्ही बाजूंनी कुमक मिळाली. दगडफेकीने मशिदीच्या आवारातल्या रिक्षाची मोडतोड झाली. जमावाने मशिदीबाहेरचे हॉटेल आणि तीन-चार दुकानेही जाळली.

ही प्रचलित हकीगत.

समोरचा अंडेवाला म्हणाला, माझे दुकान उघडे नव्हते. त्या पोरांनी वरच्या गजातून दगड मारले. त्यामुळे तसबिरी वगैरे फुटल्या. दुकान उघडे असते तर अंडी जाग्यावर राहिलीच नसती.

मशिदीच्या मुतवल्ली सावने (ट्रस्टीने) सांगितले, दगडफेक अचानक सुरू झाली. आम्ही बाहेर जाऊन त्यांना परतवले. एवढ्यात पोलीस आले आणि त्यांनी आम्हाला मशिदीत जायला सांगितले. आम्ही आत जाताच बाहेर जमावाने दुकाने जाळली. पोलिसांचे ऐकले आणि असे झाले.

मशिदीसमोर नागझरी हा सांडपाण्याचा ओढा वाहतो. त्याच्या काठावर, मशिदीच्या समोर चांभार लोकांची वस्ती आहे. तिथल्या ग्रुपचे मशिदीबाहेरच्या मलबारी मुसलमानाच्या हॉटेलात नेहमी उठणे बसणे असते.

सात मेला काही चांभार तरुणांनी बिल न देता त्या हॉटेलात खाल्ले. त्यावरून मलबाऱ्याला– त्याने पैसे विचारल्याच्या निमित्ताने–ठोकून काढले.

चौदा मेच्या रात्री एक हिंदू वरात त्या मशिदीवरून जात असता त्यांनी बँड बंद केला. ही कट्ट्यावरची कंपनी पुढे आली आणि बँडवाल्यांना 'बँड बंद का केला? चालू करा' असे म्हणू लागली. वरातीच्या मालकाने पुढे येऊन या पोरांना विचारले, 'वरात कोणाची, तुमची का आमची? आम्हाला वाजवायचे नसेल तर तुम्ही हटकणारे कोण?' त्यावरून तिथे बरीच तक्रार झाली.

आणि नंतर सोळा मेचा हा प्रकार.

टकार गल्लीत निदान दोन भिन्न धर्मीय गट आहेत. त्यांच्यात तेढही आहे. गुरुवार पेठेत एका भागात तेवढी तेढ असायला संख्याही नाही. एरवीच्या दंगलीत तिथे फारसे काही झालेलेही नाही. असे असता कोपऱ्यावरच्या एका पानवाल्या बाईचे दुकान का लुटले याचे कुतूहल वाटले.

तिचे नाव हसमतबाई.

कोपऱ्यावर हिचे पानाचे दुकान. रहायला जवळच. तिने सांगितले. त्या दिवशी दुकान बंद करुन घरी बसले असता एकदम गडबड झाली. आमच्या वाड्यात लोक शिरायला लागले. त्यांना आमच्या वाड्यातल्याच मराठ्यांनी अडवले. इथे मुसलमान रहात असले तरी आम्ही पण रहात आहोत, असे सांगून पिटाळले.

ते पुढे गेले तोच दुकान फोडल्याचा आवाज. मी दारात येऊन पाहते तो माझ्याच दुकानातले लोटे रस्त्यावर फेकलेले. माझ्यासमोर एकजण माझा स्टीलचा काटा घेऊन चालला होता पण त्याला अडवणार कोण?

तिथे हसमतबाई जवळच बसलेल्या एका हिंदूने पुढे सांगितले, मी धावत गेलो. तेव्हा एकाने माझ्या दिशेने काचेची बरणी भिरकावली. मी मागे झालो. सबंध चौकात आरशाच्या, बरणीच्या काचा, सुपाऱ्या, जर्दा पुड्या, पैसे, सुटी नाणी पडली होती. जमेल तेवढा माल पैसे लोक उचलीत होते.

हसमतबाई म्हणाली, त्यांनी माझे जुन्या काळचे कुलूप दगड घालून फोडले. एकेक पितळी लोटा बावीस रुपयाचा होता. खालची पितळी चक्कर चार रुपयाची. काशाचा मोठा ट्रे गेला. आरसे तर तसे आता मिळायचेही नाहीत. बरण्या एक्कावन रुपये डझन झाल्यात.

मी विचारले, हे लुटणारे आळीतले लोक होते का ?

बाई म्हणाली, नाही. मी सगळ्यांना ओळखते. ते लोक मागच्या आळीचे होते.

याच्या पुढचा भाग तिच्या आवाक्याबाहेरचा होता. म्हणून त्या भागात एक पहिलवान राहतो, त्याला भेटलो. त्याला त्याच्या आळीत यावेळी दंगल नको होती. सेक्युलर विचारापोटी नाही, तर त्याच्या बऱ्याचशा भूमिगत व्यवसायांना दंगलीत त्रास होतो म्हणून. गेल्या पासष्टच्या दंगलीत त्याला पुण्याहून काही काळ तडीपार केले होते. यावेळी त्याने गडबड केली असती तर पोलिसांनी त्याला उचललेच असते.

या पहिलवानाच्या मागच्या आळीत दुसरे एक दादा राहतात. त्यांचे मंडईत आणि काँग्रेस राजकारणात फार वजन आहे. यांच्यात आणि पहिलवानात नेहमी मोठेपणासाठी स्पर्धा असल्यानें पहिलवान यावेळी शांत आहे असे पाहून त्याचे नाक कापण्यासाठी मागच्या आळीतली पोरे दुपारी तीनला या पहिलवानाच्या भागात आली आणि काम उरकून तीन-वीसला गेलीही होती. पुढे पहिलवानाच्या लोकांनी अधिक काही होऊ नये म्हणून दक्षता घेतली. तरी ‘ प्रतिष्ठा ’ जायची ती गेलीच.

पहिलवान म्हणाला, आम्हाला काय मुसलमानांचा राग येत नाही का ? पण हे करुन काय मिळणार ? तो काय शिवाजी महाराजासारखा किल्ला सर करायचाय का बुरुज पाडायचाय ?

या दंगलीत बलवार आळी, धनगर आळी, भोई आळी, काची गल्ली, तांबटाची वस्ती अशी नावे ऐकू यायची. एरव्हीच्या दंगलीत मंडई भागातील मराठा मंडळींचे नाव प्रमुख्याने ऐकू यायचे ते यावेळेस गायब होते, आणि ही लहान सहान जातवाली मंडळीच जोरात होती. ही घटनाही नवीन वाटली.

बलवार हे घोड्याच्या टांग्याचा धंदा करणारे लोक. गुरुवार पेठेत त्यांची आळीच आहे. ते परदेशी जातींपैकी असून स्वतःस क्षत्रिय राजपूत समजतात. यांच्यापैकी एका पहिलवानाचे कोपऱ्यावर हॉटेल आहे.

आळीतल्या बलवार मुलांनी आळीतल्याच मशिदीच्या बाहेरच्या बाजूचे सलून फोडले होते. त्या सलूनमध्ये गेलो. मुसलमान न्हावी उभा होता. पोरसवदा होता. कधी मान वर करून न पाहील असा. त्याचे दुकान म्हणजे वर पत्रा एक असलेली छोटी खोली. फोटोग्राफरच्या डार्करूमसारखी आतील सर्व बाजूंनी काळी. न्हावी म्हणाला कुठे टेकू नका, काळे लागेल. एका अर्धवट वाचलेल्या डेस्कातून त्याने आगीतून वाचलेल्या वस्तू दाखवल्या. काळे ठिक्कर पडलेले वस्तऱ्याचे पाते, त्याची प्लॅस्टिकची अर्धवट

जळालेली गुठळ्या गुठळ्याची मूठ. एक काळी कातरी. फवारा मारायच्या काळ्या पडलेल्या दोन नळ्या. आरशांचा चक्काचूर. खुर्च्या, टेबले, वायरिंग, कपाटे यांचा सर्वच्या सर्व कोळसा.

न्हावी म्हणाला, या वरच्या पत्र्यांचाही आता उपयोग नाही. कारण एकदा तापून लाल झालेल्या पत्र्याने पाऊस खाल्ला की त्याला गंजून भोके पडतात.

न्हाव्याला विचारले, तुमचे कोणाबरोबर भांडण होते का ? तो म्हणाला, अजिबात नाही. ही सर्व मुले माझी गिऱ्हाइके होती. ती मशिद जाळायला आली. पण मशिद आहे दगडाविटांची. ती जळेना. तेव्हा त्यांना जाळायला सापडले माझे दुकान.

गवरे गल्लीत धनगर समाज राहतो. स्वतःला क्षत्रिय धनगर समाज म्हणवतो. हे लोक म्हणजे हिंदू खाटिक. मुसलमानांशी धंद्यात स्पर्धा ओघानेच.

यांच्या गल्लीत एक तीन मजली घर. प्रत्येक मजल्यावर प्रत्येक खोलीत रॉकेल टाकून घर पेटवले गेले. एक मोटारच्या बॅटरीचे दुकानही जाळले आणि लुटले. एक्साईड बॅटऱ्यांच्या जळालेल्या खोक्यांचा खच अजून त्या चौकात पडलेला होता.

नंतर कोमटी लोकांची वस्ती. त्यांनीही हात धुवून घेतला.

कसबा पेठेत भोई आणि तांबट या दोन मोठ्या जाती. यांची एकमेकात सतत भांडणे आणि वैर. भोई हे मच्छिमारीचा परंपरेने व्यवसाय करणारे. नदीकाठी वस्ती. हातभट्टीच्या व्यवसायात यांच्यातले काही लोक फार प्रसिद्ध. सध्या देशीदारूमुळे एकंदर हातभट्टीचे प्रस्थ कमी, म्हणून यांचाही भाव कमी.

या उलट तांबट. हे जानवी घालतात. दैवज्ञ ब्राह्मणांच्या दर्जाचे समजतात. लग्नातले विधी ब्राह्मणांसारखे. फक्त मांसाहारी.

तांबट-भोई वादात मुसलमानांबरोबर मधल्यामध्ये काही इतर हिंदूचेही नुकसान झाले. भोयांनी दंगलीच्या गडबडीत एका गुजराथी पंखेवाल्याचे दुकान फोडले. कारण त्याचा पुतण्या हा तांबट मंडळींचा दोस्त.

चांडक नावाच्या व्यापाऱ्याचेही दुकान फुटले.

कसब्यात नागझरी काठी एका मुसलमानाचा हातभट्टीचा प्रसिद्ध अड्डा आहे. रोज संध्याकाळी तिथे यात्रेसारखी गर्दी जमते. त्याचा भागीदार एक भोई जातीचा शेट आहे. त्या दोघांनी प्रत्येकी एक अँबॅसडर आणि सहा मजली घर बांधले आहे. मुस्लीम दंगलग्रस्तांना मदत म्हणून मुसलमान शेटने सहा पोती गहू पाठवला. त्याचे निमित्त झाले आणि काही भोई मंडळी त्याचे घर जाळायला निघाली. तेव्हा त्याचे चुकले, माफ करा असे म्हणत त्याचा तो भोई भागीदार मध्ये पडला. त्याला लोक

म्हणाले, शेट, तुम्हाला पाहिजे कशाला हा लांडा ? तुम्ही स्वतः धंदा चालवा. मग तीन अँबॅसडर ठेवल्या तरी हरकत नाही.

दंगलीत इतर छोटया जातींबरोबर दलित समाजही मोठया संस्थेने उतरला होता. टकार गल्लीतला चांभार समाज आपण आधी पाहिलाच. इस्लामपुरा ते छाया टॉकीज या भागातला मातंग समाजही मोठया प्रमाणावर होता. अपवाद फक्त कँपातल्या भीमपुऱ्यातल्या नवबौद्ध समाजाचा. इस्लामपुऱ्यात गेलो.

इस्लामपुरा ते छाया टॉकीज या भागात मातंग समाज फार जोरात होता. एकतर आंगठा तुटलेला नामदेव पवार हा जातीने मातंग आणि वरातीवर हल्ला झाला त्यातही बरेच मातंग. एरव्ही सुधारकी परंपरेत बसणारे वृद्ध मातंग नेते मुसलमानांना म्हणत होते, तुम्ही आमचा आंगठा तोडलात, आम्ही तुमची मान छाटून टाकू. त्या भागात मुसलमान हे मालक आणि मातंग-बौद्ध हे मजूर हेही नाते आहेच. त्याचीही भर पडली. ह्या आधीच्या घटना घडत असताना तिकडे नव्याने स्थापन झालेली शिवसेना त्याला योग्य ते वळण देत होतीच.

एरवी मातंग समाज समाजवादी पक्षाच्या प्रभावाखाली असतो. पण यावेळी समाजवाद्यांचे कोणी ऐकेना.

या दंगलीत मुसलमान सहसा दुसरीकडे कुठे चालून गेले नाहीत. त्यांना तशी संधी मिळाली नाही. एका मुसलमानाने सांगितले, शिवजयंतीलाच काहीतरी होईल असे वाटले होते. पण तेव्हा झाले नाही. बंदची हूल त्यांनी आम्हाला दिली आणि दंगल झाली. एरवी आम्ही एवढा बेसावध मार खाल्ला नसता.

तरी मोमिनपुरा या मुस्लिमांच्या वस्तीत आणि कँपातल्या गायकसाई मशिदीनजिक मुसलमानांनी स्वतःला सावरून प्रतिकार आणि आक्रमण दोन्ही दाखवलेले आढळले. म्हणून त्या दोन्ही भागात नेमके काय घडलें ते पहायला गेलो.

मोमिनपुरा ही मुसलमानांची दाट वस्ती. मक्का आणि पिंजारी या मशिदी याच रस्त्यावर.

इथली दोन्ही मुसलमान आणि हिंदू माणसे मूळ आंध्रातल्या नारायणपेठ गावची विणकर. तिकडे कामधंदा चालेना म्हणून काही वर्षांपूर्वी इकडे येऊन स्थानिक झालेले. हिंदूत साळी, त्यात सकुलसाळी, पद्मशाली इ. पोटजाती. दोन्ही जमातीत गेल्या पिढीत संबंध चांगले. भाषा एक, धंदा एक म्हणून. आता ती पिढी म्हातारी झाली. तरुणांचे विचार बदलले. सदतीसच्या दंग्यात इथे काहीच झाले नव्हते. पासष्टमध्ये विशेष नव्हते. यावेळी मात्र खूपच.

पलिकडे चाँदतारा चौक. पण हिंदू तरुणांनी तिथे लाल बहादूर शास्त्री मंडळ काढले आणि चौकालाही आग्रहाने लाल बदादूर शास्त्री चौक म्हणू लागले. प्रतिक्रिया म्हणून मुसलमान तरुणांनी झाकिर हुसेन मंडळ काढून मेयरांना दुष्काळ-निधी स्वीकारायला बोलावून त्या नावावर मान्यतेचे शिक्का मोर्तबही केले.

एका हिंदूने मुस्लिम मुलीला पळवून नेले आणि एका मुसलमानाने हिंदू मुलगी ठेवली त्यावरून परस्परात तेढ आहे.

दंगलीला सुरुवात दुपारी बारानंतर झाली

दुकान बंद करायला गेलेल्या मारुती मानकर या तरुणास मुस्लिमांनी भोसकले. त्यावरून बाहेरून हिंदूंची दगडफेक आणि इकडून मुस्लिमांचा सशस्त्र जमाव अशी लढाई सुरू झाली. मुस्लिमांच्या हातात जंबिये, सुरे, गुप्त्या, गज, ट्रकच्या स्प्रिंगचे पाटे, तलवारी, खाटकांचे कोयते असली शस्त्रे होती. ते जमावाने फिरून दहशत घालीत. त्यांच्या प्रतिकारामुळे हिंदू दंगलखोर त्यांच्या वस्तीत येऊ शकले नाहीत. ते बाजूबाजूने दगडफेक करीत. मुसलमानांनी चाँदतारा चौकातली तीनचार हिंदूंची दुकाने–एक धोब्याचे. एक किराणा, एक आणखी कसलेतरी–जाळली. (पण धोब्याच्या दुकानातले कपडे मात्र मुस्लिमांचेच जास्त होते.) कोपऱ्यावरचे एक उडुपी हॉटेलही जाळले गेले त्या भागातल्या पोलीस गोळीबारात शिवदास नावाचा रिक्षा ड्रायव्हर ठार झाला.

ज्याला भोकसले त्या मारुती मानकराची चौकशी केली. हा वखारीतला गाडीवान. तब्येतीने चांगला. ढोल उत्तम वाजवी. लहान मुलांच्यात जास्त रमे. त्यांना लेझिम शिकवून त्याने जयबजरंग बाल मडळ काढून त्यातर्फे ताफा तयार केला. सर्व प्रकारच्या मिरवणुकीत सुपाऱ्या त्यांना यायच्या. शिवसेनेच्या मिरवणुकीत हे होतेच. मशिदीसमोर बराच वेळ वाजवणे ही यजमानांची ऑर्डरच असल्याने बजरंगवाली मंडळी तसे करीत. म्हणून मुसलमानांचा यांच्यावर पहिल्यापासून राग. बंदच्या दिवशी एका मुसलमानाचे दुकान बंद करायला गेला. त्या भरात त्याने दारावर लाथ मारली लागलीच बाजूने आलेल्या दोघांनी त्याला चाकू मारलाच.

कँप भागात कधीच दंगल होत नाही. पासष्टच्या वेळीही इकडे शांत होते. वातावरण कॉस्मापॉलिटन. पंचवीस टक्के मुस्लिम. पंचवीस टक्के बौद्ध. लष्कराच्या सेवेसाठी तिकडे जाऊन राहिलेल्या शिंपी, धोबी, न्हावी इ. जाती दहा–बारा टक्के. तेवढेच ख्रिश्चन. पारशी, सिंधी, मारवाडी ह्या व्यापारी जातीही थोड्या प्रमाणात. त्यामुळे जातीय तणाव फारसे नसायचेच.

पण अलीकडे सेंटरस्ट्रीटवरच्या (विशेषत: मारवाडी) व्यापाऱ्यांनी जन-संघाला उचलून धरले होते. एरवीच्या संघटना–काँग्रेसच्या भोगिलाल शेटने

निवडणुकीत काँग्रेसच्या धारियांविरुद्ध जनसंघाच्या म्हाळगींना मदत केली होती. भोगीशेटची खेमचंद दयाळजी ही फर्म. यांच्याकडे सर्व पुण्याची डालडाची एजन्सी आहे. एकाने सांगितले, धारियांनी त्यांच्या विजयाच्या सभेत भोगिलालना जाहीर दम दिला होता की, आता यापुढे दिवाळीच्या वेळी डालडा कसा गडप होतो ते मी पाहतो. नंतर दोन-तीन दिवाळया गेल्या तरी धारियांनी त्यांच्याकडे पाहिले नाही.

या सर्व व्यापाऱ्यांमध्ये हिरोली हा एकमेव मुसलमान व्यापारी. त्याचा धंदा खूपच जोरात. शहर काँग्रेसचा सेक्रेटरी. अशा खूप कारणांनी इतरांबरोबर त्याचे जमत नव्हते.

कँपात सोडा नारळेच्या मंदाराकाळापर्यंत काही नव्हते. संध्याकाळी तिथल्या एका मुसलमान पहिलवानाचा भाऊ नाना पेटून जखमी होऊन आला. त्याबरोबर याने मीटिंग घेऊन गायकसाई मशिदीपासून मुस्लिमांचा सशस्त्र मोर्चा काढला. दीन, दीन या घोषणा. हातात जंबिये, सुरे, चाकू, तुरळक तलवारी. एक फेरी मारून तो परत गेला.

वातावरण बदलले. तेवढ्यात दुर्गा मंदीर फोडल्याची, देवीची विटंबना केल्याची अफवा पसरली (प्रत्यक्षात साधा दगडसुद्धा देवळावर आला नव्हता) सेंटर स्ट्रीटवरचे हिरोलीचे दुकान हे सोयीचे ठिकाण लक्ष्य बनले. जमावात शिंपी, धोबी इ. अशा जाती पुढे यात बौद्ध असते तर जास्तच प्रकार झाला असता.

हिरोलीच्या दुकानावर मामुली दगडफेक झाली. त्यावर हिरोलीने गच्चीवरून इतक्या दगड-बाटल्या फेकल्या, की त्यामुळे प्रकरण चिघळले, असा एक प्रवाद. काहींचे म्हणणे असे की खाली चाललेल्या पेटवापेटवीने त्याला प्रतिकार करावा लागला नंतर पोलीसांनी हिरोलीच्या घराची झडती घेतली तर फारशी, विटांचे व्यवस्थित साईझमधले तुकडे, रॉकेल, ॲसिड आणि इतर शस्त्रे इतकी सापडली की सामान दोन बैलगाड्या भरून झाले. हिरोलीला अटक झाली. त्याच्यावर खुनाचा आरोपही ठेवण्यात आला आहे.

हिरोलीने वरून ओतलेल्या ॲसिडमुळे कुलदीप पाठक नावाचा तरुण भाजून मेला, अशी आजतागायत पेपरांची बातमी आहे पण तसा डॉक्टरी रिपोर्ट नाही. पोलिसाच्या चार्जशीटमधेही नाही. तो रॉकेलने पेटून भाजल्याने मरण पावला. पण आमच्या वर्तमानपत्रांनी हे ॲसिड कुठून आणले ते समजत नाही.

दुसरी एक गोष्ट. कुलदीपबरोबरच तिथे परदेशी नावाचा तरुणही मेला. पण त्याचा उल्लेख कोणी करीत नव्हते कारण तो खेमचंद दयाळजी फर्मच्या भोगिलाल शेटचा ड्रायव्हर होता.

पोलिसांचे म्हणणे असे की, हिरोलीने वरून रॉकेल आणि पेटता बोळा टाकला. विरुद्ध बाजूचे म्हणणे असे की कुलदीप दुकान पेटवत असता स्वतः रॉकेल ओतत होता. ते उलटे अंगावर उडून त्यात तो पेटला व भाजून मेला.

या दोन्हीतले खरेखोटे आता कोर्टच ठरणार.

(टीप : या मृत्यूनंतर हिरोली व इतरांवर कोर्टकेसेस झाल्या. त्यात ते निर्दोष सुटले.)

पुढे संबंधित जनसंघ कार्यकर्त्यांनी कुलदीपचे फोटो पोस्टरवर खाली धर्मवीर कुलदीप असे छापून तिकडे पोस्टर्स लावली. त्या चौकालाही ते लोक कुलदीप चौक असे म्हणू लागले आहेत. कुलदीपला आधी ओळखणाऱ्या लोकांना या प्रकाराची फारच गंमत वाटत आहे. कारण कुलदीपची वाडिया कॉलेजातला मवाली विद्यार्थी म्हणून प्रसिद्धी होती.

दंगलीत सामान्य मुसलमान किती असुरक्षित असतो आणि त्याचे जीवन हे मरणाच्या काठावर सदैव कसे उभे असते याचे उदाहरण म्हणजे सलाउद्दीन. हा पूना कॉलेजचा शिपाई. दंगलीत घर सुरक्षित नाही म्हणून पूना कॉलेजात आश्रयाला निघाला. बायका, मुले आणि एक मित्र बरोबर घेऊन नाना चावडी चौकातून चालला असता तिकडून जमाव आला. याच्या हातातली ट्रंक पाहून त्यातल्या लोकांनी याला हटकले. ट्रंक उघडून दाखवीपर्यंत एकाने हातातल्या चाकूने त्याला भोकसले. मित्राने वाट काढून बायका-मुलांना सुरक्षित नेले.

पुण्यातल्या मोलेदिना हायस्कूल आणि अँग्लो उर्दू हायस्कूल इथे मुस्लिम निर्वासित येऊन उतरले होते. तिथे मुस्लिम लीगचे कार्यकर्ते काम करताना दिसत होते. इतर कोणी मदत आणली तर ते स्वतः वाटीत. युक्रांदच्या डॉ. अरुण लिमयांनी बरीच औषधे जमवून ते तिथे मदत करायला गेले तर एक लीगचा कार्यकर्ता डॉक्टरांना म्हणाला, तुम्ही औषधे आमच्याकडे द्या. आम्ही वाटतो. आम्हाला अमुक अमुक औषधे पाहिजे आहेत. त्याची ही लिस्ट घ्या. आणि आणून द्या. लिमयांनी आग्रह धरला की औषधे आम्ही आणली आम्हीच वाटणार. ती मंडळी खळखळ करू लागली. त्यांना न जुमानता लिमये आणि इतर मडळींनी औषधोपचार केले त्या लोकांचे पत्तेही आणले. त्यापैकी कित्येक स्त्रियांचा दंगलीच्या धक्क्याने मानसिक ब्रेकडाऊन झालेला त्यांना आढळला.

दंगलीत मुसलमानांच्या घरावर जमाव आला की आतून दगडफेक जोरात झाली तर जमाव थोपला जाई. कित्येक मुसलमानांनी घरातल्या फरशा उखडून त्यांचे तुकडे करून मारले. काहींनी तर मधली पार्टीशनची भिंत पाडून त्याच्या विटांच्या तुकड्यांची फेक केली. जमावातले लोक एकदा घरात शिरले की संपलेच, म्हणून खाली दारातच त्यांना थोपवावे लागे.

एका मुसलमानाने सांगितले, मी दंगलीच्या दिवशी भीतीने आसऱ्याला दुसरीकडे पळालो. इकडे घर लुटले गेले. सर्व सामान धुवून नेले. परत आलो तो मालकाने खोलीला स्वतःचे कुलूप लावलेले. त्याला आयता ताबा मिळाला. मला तर कळलें, लुटालुटीला प्रोत्साहन त्यानेच दिले. आता फैसला करायला आळीतल्या कार्पोरेटरकडे चाललो आहे. कोर्टकचेऱ्या करायची आपली काही ताकद नाही.

मी विचारले, तुम्ही पेठेतल्या शांतता कमिटीला का भेटत नाही? तो म्हणाला, शांतता कमिटी आहेच कोठे? पासष्टच्या वेळी लगेच शांतता कमिटी स्थापन होऊन बरेचसे प्रश्नही सुटले. यावेळेस सगळेच थंड. दंगल लवकर विझावी असे यांना वाटतच नाही की काय?

त्याचे घर पाहून आलो. मालक घरी नव्हता.

हे जसे हिंदू-मुसलमानांमध्ये झाले, तसे एक मुसलमान-मुसलमानातलेही उदाहरण मिळाले. छाया टॉकीजसमोर दाऊद नावाच्या माणसाने आपले पानपट्टीचे दुकान शेख महमंद नावाच्या माणसाला चार रुपये रोजाने चालवायला दिले. दंगलीत ते लुटले गेले. शेख महंदमचा तीनशे रुपयाचा माल गेला. दुकान जागीच राहिले. पण दीडशे रुपयाची सरकारी मदत मात्र दाऊदने मिळविली. शेखमहंमद हात चोळीत बसला.

दंगल उफाळल्यावर राजकीय, सामाजिक नेत्यांनी ती थांबवण्याचा आपापल्या परीने, आपापल्या हेतूसाठी प्रयत्न केला. महापौर निळूभाऊ, एस. एम. जोशी, मोहन धारिया यांची नावे नेहमी यायची. बाबा आढाव, भाई वैद्य, अरूण लिमये, वसंत थोरात आदी तरुण मंडळींची नावे त्यांच्याबरोबर असायची. शरद पवार हे गृहखात्याचे राज्यमंत्री. त्यांनीही पुण्यातच आपला मुक्काम ठोकला होता.

एक म्हणजे कॉर्पोरेशनच्या निवडणुका तोंडावर आलेल्या. तशात ही दंगल. त्यामुळ इच्छुक उमेदवार मंडळींची फारच पंचाईत. विशेषतः काँग्रेसवाल्यांची. हिंदू म्हणायचे, यांनीच मुसलमानांना लाडावून ठेवले म्हणून हे शेफारलेत. मुसलमान म्हणायचे, हे काँग्रेसवाले बदमाश आहेत. वरकरणी प्रेम दाखवतात, पण मनातून ह्यांना आम्हाला ठोकायचेच आहे.

कसब्यात दोन मुले काही गडबड करून पळून गेली. एस्. आर. पी. वाले यांच्या मागे लागले. त्या मुलांनी एका वाड्यात शिरून आतून दरवाजा बंद करून घेतला. एस. आर. पी वाले घरापुढच्या टॅक्सीच्या टपावर चढून गॅलरीतून घरात घुसले. त्या घरात लग्नाचे वऱ्हाड होते. त्यांनी दिसेल त्याला, बायका–मुले, वृद्ध कोणी न सोडता भरपूर मारले. त्यामुळे तिथले वातावरण तंग झाले. काँग्रेस नेते व खासदार मोहन धारिया त्या भागात येताच लोकांनी त्यांना धक्का बुक्की केली.

समाजवादी कॉर्पोरेटर रामभाऊ वडके यांनी लोकांना आवरले. धारिया धोक्यात म्हणून इन्स्पेक्टरने हवेत गोळीबार केला.

गंज पेठेत एस. आर. पी. वाल्यांनी झोपडपट्टीत शिरून स्त्रियांना मारहाण केली. म्हणून कॉर्पोरेटर चिल्लाळ यांच्या पत्नीच्या नेतृत्वाखाली स्त्रियांनी पोलिस-चौकीला घेराव घातला. इन्स्पेक्टर काळचांची बदली करा अशी मागणी होती. महापौर निळुभाऊ लिमये यांना फोन आला. त्यावेळी निळुभाऊ, शरद पवार (यावेळी शरद पवार निळुभाऊंकडे उतरले होते), रामभाऊ वडके, धारिया ही मंडळी शहरातून नुकतीच राऊंड घेऊन दुपारी तीन वाजता जेवत होती. निळुभाऊ निघाले. शरद पवारांना अन्य काम होते. धारिया येतो म्हणाले म्हणून त्यांनाही बरोबर घेतले. गंजपेठत एव्हाना मोठा जमाव जमला होता. हे गाडीतून उतरताच लोकानी तक्रारी सुरू केल्या. आ. शिवाजीराव ढेरे आणि इतर काँग्रेस कॉर्पोरेटर्स तिथे आले. जमावाने काँग्रेसवाल्यांना एवढी धक्काबुक्की केली की ढेरे मागच्यामागे (अक्षरशः) पळाले. लोक त्यांच्या मागे जाऊ लागले तो वडके, निळुभाऊंनी त्यांना अडवले. ढेरे एका दुकानात जाऊन दार लावून बसले.

इकडे जमाव आवरेना तेव्हा निळुभाऊंनी स्वतःला जाळून घेईन अशी धमकी दिली. तेव्हा जमाव शांत झाला. निळुभाऊंचे भाषण झाल्यावर धारिया म्हणाले, मी बोलतो. इतरांनी सांगितले, जमावाची मनःस्थिती ठीक नाही. बोलू नका. पण धारिया बोलले. लोकांनी आरडाओरडा चालू केला. इन्स्पे. काळेला काढा असा घोषा लावला. धारियांनी जवळच्या पोलिस अधिकाऱ्याला कन्सल्ट करून सुहास्य वदनाने काळचांची बदली करण्यात आली आहे, अशी घोषणा केली. लोकांनी जल्लोष केला.

नंतर पोलीस कमिशनर कदमबांडेंचांनी काळचांची बदली तर राहोच, पण उत्कृष्ट सेवेबद्दल त्यांना पदक देऊन धारियाचा मान राखला.

धारियाच्याबाबत अशी धक्काबुक्की आणखीही काही ठिकाणी झाली. पण धारियाचे हे वैशिष्ठ्य, धक्काबुक्की माहीत असूनही ते प्रत्येकी ठिकाणी जात.

आगामी नगरपित्यांच्या दंगलीतल्या हालचाली गमतीशीर होत्या. गंज पेठेतील एका पेहेलवानास यावेळी उभे राहायचे आहे. पहिले एकदोन दिवस बाहेर पडायची छाती नव्हती. त्यावेळी इतरांनीच शांतता प्रस्थापित केली. पुढे शांतता कमिटी स्थापन झाल्यावर हा पुढे आला. शांतता समितीने काढलेल्या मोर्चात ह्याला बघताच लोक चिडले आणि तिथल्या लोकप्रिय समाजवादी नगरपित्याला म्हणाले, की ह्याला का तुम्ही घेतलेत? जीव धोक्यात घातलाय तुम्ही आणि मिरवायला हा, हे कसे चालू देता?

रविवारात एका नगरपित्याच्या घरासमोर एका मुस्लिम मटकेवाल्याचा अड्डा आहे. हा नगरपिता या अड्डेवाल्याशी चांगले संबंध ठेवून असतो. तिथे मुस्लिम

मतेही जास्त आहेत. पण या दोघात वितुष्ट यावे म्हणून मुद्दाम त्याच्या घरावरून जमाव न्यायचा आणि त्या मुस्लिम दादाच्या घरावर दगडफेक करायची, असे गनिमीकावा तंत्र यावेळी त्या नगरपित्याच्या विरोधकांनी वापरले.

दंगल शांत करण्यात एसेम जोशी यांचे प्रयत्न विशेष. त्यातला एक प्रसंग. रास्ता पेठेत मनुषा मशिदीसमोर एक मोठा जमाव जमून मशिदीची झडती घेण्याची भाषा करीत होता. एसेम जोशी, बाबा आढाव यांनी जमावाला समजावले. मी पोलिसांना मशिदीची झडती घ्यायला लावतो आहे असे सांगितले. त्यांनी कमिशनरांना फोन केला. त्यांनी शरद पवारांना विचारून झडतीची तयारी दाखवली. मग एसेमने प्रत्येक बाजूचे दोन प्रतिनिधी, पोलीस बरोबर घेऊन झडती घेतली. काही सापडेना. एक बाई अशा रात्री बराच वेळ धुणे धूते यावरून संशय येऊन पाहतात, तो तिच्या बादलीच्या पिळचाखाली ॲसिडच्या बाटल्या. पंचनामा झाला. बाहेर सभा झाली. आढावांचे भाषण झाले. एसेमचे सुरू झाले. मघाचा मुसलमानांचा एक प्रतिनिधी स्टेजजवळ होता. तो मशिदीकडे परत जात होता. कोणी सरदारजीने त्याला नुसते हटकले. त्यावर घाबरून लगेच तो 'बचाओ, बचाओ' म्हणून ओरडला. थोडासा गोंधळ झाला. पोलिस मशिदीसमोर लायनीत उभे होते. त्यांना वाटले दंगल म्हणून त्यांनी अश्रुधुराची नळकांडी फेकली. लोकांना वाटले: मशिदीतूनच काही येतेय. मग इकडूनही दगडफेक. तिकडून पोलिसांचा गोळीबार. एसेम पोलिसांच्या दिशेने 'थांबा, थांबा. गोळीबार करू नका' म्हणत धावले, पोलिसांच्या फ्लॅशलाईटमध्ये एसेम दिसले म्हणून खाडीलकर इन्स्पेक्टरांनी गोळीबार थांबवला.

अश्रूधूर सोडला तेव्हा डोळ्यांची चुरचुर थांबावी म्हणुन एका मुलाने एसेमना बाजूच्या घरातून पाणी आणून दिले. एसेम डोळ्यांना पाणी लावत आहेत तोच समोरच्या दोन फुटावरच्या मुलाला पायाला गोळी लागली. एसेमना त्यावेळी ते समजलेसुद्धा नाही.

अश्रुधुराचा त्रास होऊ नये म्हणून युक्रांदच्या डॉ. अरुण लिमयानी एसेमना आपल्या अँबेसडर गाडीत बसायचे सुचवले. तेवढ्यात एसेम दुसरीकडे धावले. इकडे गाडीच्या मागच्या काचेतून एक गोळी जाऊन पुढच्या काचेतून बाहेरही पडली होती.

पुण्यातल्या पेपर्सनीही या दंगलीत उत्कृष्ट कामगिरी बजावली. लोकांना आश्चर्याचे धक्के देण्याचे त्यांचे तंत्र विलक्षण होते. वर्तमानपत्रात वाचावे आणि

या स्थळी जावे तो हकीगत दुसरीच निघे. आमची बरीचशी बातमीदार मंडळी तर इतकी जीव ओतून काम करीत की बातमी तयार करताना स्वतःची मते त्यात इतकी सहजतेने मिसळून टाकीत की बस्स. अशी एकतानता अन्यत्र सापडणे कठीणच. इकडे मशीद न म्हणता प्रार्थनामंदीर म्हणायचे. कारण सरकारी सूचना. दंगलीला उत्तेजन नको म्हणून. पण तेवढे सोडले तर इतर सर्व बातमी देणे, अफवांचा बेमालूम उपयोग करणे हे सर्रास चालले होते. घरात धुणी वाळत घालायच्या दोन काठ्या आणि घरातली कांदा कापायची सुरी सापडली तरी ' शस्त्रास्त्रांचा प्रचंड साठा जप्त ' अशी शीर्षके पेपरमध्ये यायची. अशी विनोदबुद्धी.

ही दंगल होती त्यापेक्षा अधिक गाजली. पन्नासएक कुटुंबे बेघर झाली. पन्नासएक लहान दुकाने फुटली. भोसकाभोसकीचे प्रकार दहावीस घडले, एरवीच्या अहमदाबाद, रांची, जबलपूरपुढे हे काहीच नव्हे. पण तरीही एका राजकीय योगायोगामुळे ही जास्त गाजली असावी

केंद्रीय गृहमंत्री उमाशंकर दीक्षित मुंबईला एका लग्नासाठी आले होते. त्याचवेळी पुण्यात दंगल सुरू झाली. उद्या कोणी लोकसभेत विचारले, की दंगलीच्या पासून शंभर मैलावर तुम्ही होता आणि तिथे गेला का नाहीत, तर पंचाईत होईल म्हणून त्यांनी पुण्याला यायचे ठरवले. मुख्यमंत्री वसंतराव नाईकांना फोन केला. प्लेनची व्यवस्था करून ते स्वतः बरोबर निघाले. कँपात आणि एकदोन ठिकाणी जाऊन आले. सर्किट हाऊसवर राष्ट्रीय एकात्मतेबरोबर प्रेस कॉन्फरन्स् घेतली. एसेम्, निळुभाऊंबरोबर चर्चा केली आणि दोनतीन तासात मुंबईला परतही गेले.

झाले, ही एकदम अखिल भारतीय बातमी झाली. लोकांनी तर उमाशंकर भेटीतून कित्येक राजकीय अर्थही काढले. दंगल भारतभर गाजताच सगळ्या राजकीय पक्षाचे नेतेही धावले. इथे एवढी दंगल झाली तरी तुम्ही कोठे होता, असे उद्या कोणी आपल्याला विचारायला नको. नानाजी देशमुख आले. जॉर्ज फर्नांडीस आले. स्वतंत्र पक्षाचे मधू मेहता आले. बनातवाला आले. शिवसेनेचे मुंबईचे महापौर सुधीर जोशी आले. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे दोन निरीक्षकही आले. धारिया, खाडिलकर तर घरचेच. या पाहुण्यामंडळींचा कार्यक्रमही ठरलेला असायचा. यायचे. आपल्या पक्षाचे दोनचार नगरपिते किंवा कार्यकर्ते बरोबर घ्यायचे. पाहणी करायची. जाताना एक प्रेस कॉन्फरन्स घेऊन गायब व्हायचे. त्यातल्या कित्येकांची खऱ्या दंगलग्रस्त भागात जायची तयारी नसे. मग अशी मंडळी एकदा दंगल होऊन लगेच विझलेल्या कँपातल्या सेंटर स्ट्रीटला भेट देऊन नाहीशी होत. पोलीस तर या अश्रू पुसणाऱ्या पुढाऱ्यांपायी जितके हैराण झाले होते तितके दंगलीपायी सुद्धा झाले नसतील.

दंगलीत पोलिसांची फारच धावपळ झाली. दोन्ही गटाचे लोक आरोप करीत की पोलीस पक्षपाती आहेत. काही तडकाफडकी निर्णय घ्यावेत, तर हा पडला राजकारणी मामला.

एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याला भेटलो. त्यांनी सांगितले, गेले चार महिने या कम्युनल भानगडीपायी आमचे डोके पिकून गेले आहे. दोन कम्युनिटीतल्या माणसांचे नळावरून भांडण झाले तरी डायरेक्ट वर रिपोर्ट करा, अशा आम्ही आमच्या माणसांना इन्स्ट्रक्शन्स दिल्या आहेत. जानेवारीत तर पतंगाच्या काटा-काटीवरून भांडणे व्हायची. एक हिंदू आणि दुसरा मुसलमान निघाला की पंचाईत व्हायची. हातातली कामे सोडून त्यांचे भांडण दाबून टाकायला पळावे लागे. परवा पुण्याच्या हद्दीतल्या सांगवी गावात दोन मुसलमान, दोन हिंदू आणि एक शीख अशी पाच मुले लपंडाव खेळत होती. महादेवाच्या देवळात ते लपायला गेले. ते तसे तेथे नेहमीच लपतात. पण यावेळी ते गाभाऱ्यात लपले. बराच वेळ तिथे थांबल्याने त्या सगळ्यांनीच लघवी केली.

झाले. ही घटना आमचेकडे रिपोर्ट होताच मी स्वतः गेलो. बातमी पसरणार नाही अशी व्यवस्था केली. पालकांच्या संमतीने त्या पोराची टेंपररली रिमांड होममध्ये व्यवस्था केली. नाहीतर बातमी पसरायची की मुसलमान पोरांनी महादेवावर लघवी केली म्हणून !

दंगल संपली.

दंगलीनंतर मुस्लीम नेत्यांच्यात काही बदल झाला आहे का, ह्याची उत्सुकता होती. दोन बाबतीत. एक म्हणजे दंगलीबाबत, दुसरे सामाजिक, राजकीय विचारांबाबत.

मारुफखानांकडे गेलो.

मारुफखानांच्या बोलण्याचा गोषवारा असा : आम्हा मुसलमानांचा मतदानाचा हक्क तुम्ही काढून घेतला म्हणजे हे सर्व संपेल. पासष्टच्या दंगलीच्या वेळेस आम्ही काँग्रेस विरोधक होतो. म्हणून काँग्रेसने आम्हाला चोपले. मारुफखानाकडे ट्रान्स-मिटर आहे म्हणून अफवा उठवली. त्याला इतकी वर्षे झाली. जर ट्रान्समिटर असता तर एव्हाना खटला व्हायला पाहिजे होता. मला शिक्षा व्हायला पाहिजे होती. अजून का झाली नाही ? यावेळेस आम्ही काँग्रेसच्या बाजूने आहोत, तर हे शिवसेना, जनसंघवाले आम्हाला चोपत आहेत. एकूण काय आमचेकडे मते आहेत म्हणूनच ना हा वाद ? मग हा हक्क काढूनच घ्या, म्हणजे तरी आम्हाला सुख लागेल.

दंगलीवर बोलताना : जिथे जिथे आम्ही प्रतिकार केला तिथे तिथे आमची घरे वाचली. जिथे डिफेन्स नव्हता, तिथे जाळपोळ आणि लुटालुट.

पोलिससुद्धा सगळे त्या बाजूचेच. आमचे लोक प्रतिकाराला जमले की पोलिस सांगायचे, तुम्ही घराघरात जा. आम्ही त्यांना बघतो. आम्ही घरात गेलो की दंगेखोर विना प्रतिकार जाळपोळ करून जायचे. पण रविवार पेठेत मुसलमानांनी आत जायला नकार दिला. ते पोलिसांना म्हणाले, आधी त्यांना आत जाऊ द्या. मग आम्ही जाऊ त्यामुळे तिथे सर्वांत जास्त मुसलमान वस्ती असूनसुद्धा नुकसान काही झाले नाही.

तुम्ही जर घरे जाळू लागलात, आमच्या बायकापोरांना मारू लागलात, तर डिफेन्स करायचा आम्हाला हक्क आहे की नाही ? तुम्ही आम्हाला जसे धड वागवत नाही तसे बौद्धांना पण धड वागवत नाही. त्यांच्यावर उद्या आमच्यासारखीच पाळी येणार आहे हे विसरू नका.

आमच्यापुढे सध्यातरी सेल्फ डिफेन्सशिवाय दुसरा मार्गच नाही.

दंगल संपून पुणं पूर्वीसारखं चालू झालं.

कार्पोरेशन निवडणुका सहा महिने पुढे ढकलल्याची बातमी आली. नगरपित्यांना वाटले, उगाचच आपण इतके घाबरलो.

हिंदुमहासभावाले नामदेव पवारकडे जाऊन, आम्हाला तुमचा शनवारवाड्यावर सत्कार करायचाय असे म्हणू लागले. नामदेव म्हणाला, मी राजकारणातला माणूस नाही. माझ्यामुळे एवढी दंगल झाली. हे मला बरे वाटले नाही.

मातंग, चांभार, भावसार, बलवार तांबट, भोई इत्यादी जाती परत आपापल्या व्यवसायाला लागल्या. एरवीच्या राजकारणात त्यांना भाव नसतो. तेव्हा अशाच वेळी त्यांना काही कार्य.

वर्तमानपत्रांनी आपला मोर्चा खुजगाव धरण व्हावे की नांदोली व्हावे ऊर्फ बापू दादा वादावर केंद्रित केला आहे.

हसमतबाईने नवे लोटे आणून, वाचवलेल्या एका फुटक्या बरणीत सुपाऱ्या भरून धंदा पुन्हा सुरू केला आहे.

दंगलीनंतर उत्तर प्रदेशाच्या निवडणुकांची धामधूम सुरू झाली. प्रत्येक पक्ष मुसलमानांची गठ्ठा मते मिळवायच्या विवंचनेत पडला आहे. देशाच्या निरनिराळ्या कोपऱ्यातून अस्वस्थ करणाऱ्या बातम्या येत आहेत.

केरळमध्ये...

# डॉक्टर्स :

# जगवतात की

# नागवतात ?

माझा एक मित्र सांगत होता, ' मी काही होत होतं म्हणून डॉक्टरांकडे गेलो. त्याने माझ्याकडे न पाहताच एक चिठ्ठी लिहून दिली आणि ते औषध घ्यायला सांगितलं. मला फार वाईट वाटलं. त्यांनी निदान दोन शब्दतरी माझ्याशी बोलायला हवे होते. माणूस काही फक्त औषध आणायला डॉक्टरकडे जात नाही–'

मी त्याला म्हणालो, ' मित्रा, शहाणा हो. या दिवसात भलत्या सलत्या अपेक्षा धरू नकोस. आता जग फार बदललं आहे. तू सांगतोस हे काहीच नव्हे. इतक्या चित्रविचित्र हकीगती मी ऐकल्या आहेत. पाहिलेल्या आहेत.'

प्रत्येक डॉक्टरची एकेक रीत असते. एकाची अशी : कुणी त्यांच्याकडे साधे पोट दुखते म्हणून गेला की, डॉक्टर त्याला तपासतात. सांगतात, अपेंडिक्सला सूज-

आहे. बरे झाले तू आता आलास. उद्या आला असतास तर मेलाच असतास. कुणी गाढवाने तुला आधी ट्रीटमेंट दिली ? त्याने तुझ्या केसचा सत्यानाश करून ठेवलाय. आता ऑपरेशनशिवाय इलाज नाही. तुला मी सर्जनकडे पाठवतो. दीड दोन हजार किमान खर्च होईल.

या सर्व प्रकाराने पेशंट घाबरून गेला की, शेवटी त्याला हे डॉक्टर सांगतात, ठीक आहे. ऑपरेशन जरी आवश्यक असले तरी मी हा रोग इंजेक्शनाने बरा करतो. पण भारी औषधे घ्यावी लागतील. तसेच महिनाभर इंजेक्शननेसुद्धा घ्यायला हवीत.

पेशंट म्हणतो, काही करा, पण ऑपरेशन चुकवा. मग डॉक्टर त्याला रोज दहा रुपयांप्रमाणे महिनाभर पिळतात. खरे पाहता तो पाचच रुपयांत बरा व्हायचा. एवढा खर्च झाला तरी पेशंट डॉक्टरवर खूषच असतो.

एकाची रीत दुसरीच. पुण्याजवळ तो प्रॅक्टीस करतो. स्वत:च्या टेबलावर तो बरीच रंगबेरंगी इंजेक्शन्स मांडून ठेवतो. बी. कॉम्प्लेक्सचा रंग पिवळा. बी. ट्वेल्व्हचा रंग तांबडा, तर कॅल्शियमचा रंग पांढरा अशा रंगाचे एकमेकांत मिश्रण करून बरेच बल्ब तो तयार करतो आणि पेशंटला विचारतो, बोल, तुला कुठली सुई पाहिजे ? ही पांच रुपयांची, ही सातची आणि ही हवी असेल तर अकरा पडतील.

स्ट्रेप्टो-पेनिसिलिन हे एकत्र असलेले इंजेक्शन देण्याऐवजी अशी कर्तबगार डॉक्टर मंडळी स्ट्रेप्टोमायसिन एका दंडावर आणि पेनिसिलीन दुसऱ्या दंडावर अशी दोन इंजेक्शने देऊन दुप्पट पैसे काढतात. काही तर पेनिसिलिन द्यायचे झाले तर दोनच्या ऐवजी चार सी. सी. पाण्यात मिसळतात आणि ते दोन ठिकाणी टोचतात. हे प्रकार अगदी सर्रास आहेत. फार थोडी डॉक्टर मंडळी हे करीत नसतील.

एकजण जो येईल त्याला टेरॅमायसिनचे इंजेक्शन देत असतात. त्यांना विचारले तर ते म्हणतात, माणसाच्या शरीरात कुठेतरी जंतू असतातच. ते तर मरतील. दुसरे एक डॉक्टर प्रत्येक रोग्याला एक झोपेचे इंजेक्शन देतात. त्यांची थिअरी अशी की, माणसाला सातआठ तास झोपवले म्हणजे बरे असते.

या झोपवणाऱ्या डॉक्टरांकडे मी गेलो. तेव्हा त्यांच्याकडे खूप गर्दी होती. त्यांच्याकडे अशी गर्दी रात्री दीन अडीचपर्यंत असते. जागा दहा फूट लांबीरुंदीची. एक टेबल. मागे बाटल्या. सर्वांवर भरपूर धूळ.

समोरच्या गर्दीत एका बाईच्या मांडीवर एक मूल. आधीच बेशुद्ध, त्यात डॉक्टरांचे झोपेचे इंजेक्शन. त्यामुळे मूल मांडीवरच मेले. डॉक्टरांनी बोट वर दाखवून म्हटले, ' दवा मेरी— दया तेरी.'

त्या बाईचेही समाधान झालेसे दिसले. त्यांची इंजेक्शन देण्याची पद्धतही भयंकर आणि हिंस्र होती.

असे ऐकतो की हे डॉक्टर महाशय स्वकष्टाने वर चढतचढत आले आहेत. पूर्वी ते एका डॉक्टरकडे फडकं मारायला होते. नंतर कंपाउंडर झाले आणि आता सर्टिफिकेट मिळवून डॉक्टर.

काही जनरल प्रॅक्टिशनर्स (जो. पी.) कडे एक्सरे मशिनही असते. त्यामुळे त्यांच्याकडे जाणाऱ्या बऱ्याचशा पेशंटना क्ष किरणांना वारंवार सामोरे जावे लागते. एक डॉक्टर आहेत, त्यांचा खाक्याच हा. डोके दुखले– काढ डोक्याचा एक्सरे. पोट दुखले काढ पोटाचा. जो अवयव दुखेल त्याचा फोटो. आणि फोटो तर इतके भारी असतात की, ते संशोधनाला परदेशीच पाठवावेत. एकाचे मॅस्टॉइड (कानामागचे हाड) दुखत होते म्हणून यांनी फोटो काढला तर डोक्याच्या गरगरीत गोळ्या-पलीकडे काही दिसतच नव्हते.

कित्येकदा ते पेशंटना एक्सरे टेबलावर झोपवतात. पण खाली एक्सरेची काचच ठेवत नाहीत. त्यांनी एका हॉस्पिटलमधून बरेचसे एक्सरे ढापून ठेवले आहेत. त्यातलाच एखादा दाखवतात आणि पुन्हा स्वत:जवळ ठेवतात.

काही टी. बी. कॅव्हिटी असलेले एक्सरे फोटो त्यांनी जमवले आहेत. त्यातला एखादा समोरच्या पेशंटला दाखवून, 'बघ, तुझ्या फुफ्फुसाला केवढे भोक पडले आहे. तुला वर्षभर भारी इंजेक्शने देतो. पाहा विचार करून. नाहीतर मर' असे सांगतात.

टी. बी. चा पेशंट आला तरी सहसा त्याला टी. बी. झाल्याचे सांगितले जात नाही. कारण ते कळताच तो जनरल हॉस्पिटलकडे पळतो आणि तिथून इंजेक्शने घेतो. म्हणून टी. बी. ऐवजी दुसरेच काही तरी सांगून, तुला सकाळी एक संध्याकाळी एक अशी दहादहा रुपयांची दोन इंजेक्शने मारतो आणि बरा करतो, असे डॉक्टरकडून सांगितले जाते. महिन्याकाठी चारपाचशे रुपये खर्चून झाल्यावर पेशंटची शक्ती अर्थातच संपते. आणि तोवर तात्पुरते बरे वाटल्यामळे पेशंटही येईनासा होतो. पुन्हा महिना दोन महिन्यांनी परत त्रास व्हायला लागल्यावर परत डॉक्टरकडे पेशंट येतो. तू का पळून गेलास, आता माझी जबाबदारी नाही असे म्हणून हा डॉक्टर त्याला झापतो आणि नंतर दुसऱ्या फेरीत (अधिक भारी इंजेक्शने देऊन) जास्त पैसे उकळतो. शेवटी पेशंट जेव्हा नाइलाजाने जनरल हॉस्पिटलमध्ये येतो तेव्हा तिथल्या एक्सरेवरून त्याची दोन्ही फुफ्फुसे निकामी व्हायला आलेली दिसतात. आधीच्या डॉक्टरने स्ट्रेप्टोमायसिन अनियमित दिल्याने त्याचाही परिणाम होईनासा होतो. मग रक्ताच्या उलट्या. त्याला रक्त भरण्यासाठी रक्तदाता आणा. मग त्याच्याच दरिद्री कुटुंबातल्या आधीच्याच अशक्त शरीरांमधून रक्त घेतले जाते. शेवटी एकच मोठी ओकारी आणि पेशंटच्या डोक्यापर्यंत चादर.

काही दादा जी. पी. मंडळी स्वतःचे हॉस्पिटलही घालतात. अगदी छोटया खोलीत चारचार, पाचपाच खाटा टाकतात. त्यात मधे पडदे घातले की, त्यांच्या स्पेशल खोल्या होतात. रोग्यांचे पाय एकमेकांना लागत असल्याने त्यांचे आणि एकमेकांच्या नातेवाईकांचे भावनात्मक ऐक्यही होत असते !

पण हा मुख्य भाग नसतो. मुख्य असते ते ऑपरेशन थिएटर. साहेबांनी घालून दिलेल्या स्पेशलायझेशनच्या नियमांशी या डॉक्टरांचा जणू पूर्ण विरोध असतो. हत्यारांतही काटकसर. क्यूरेटींगची (गर्भपातासाठी) हत्यारे मात्र न चुकता दिसतात. सुरवातीला ऑपरेशन करायला बाहेरून तज्ज्ञ सर्जनला बोलावतात. या जी. पी. डॉक्टरांची आकलनशक्ती इतकी तीव्र असते की, एकदोन ऑपरेशन्स बघितली की तिसऱ्या वेळी सर्जनला त्यांची दारे बंद. सगळे स्वतःच करून टाकतात. सर्जनला सर्जरी शिकायला सहासहा वर्षे खर्चावी लागतात. पण इथे सगळे झटपट काम !

या जी. पी. मंडळींमध्ये काही 'सिंडीकेट्'स स्थापन झाली आहेत. ते एकमेकांना एकएक स्पेशालिटी देऊन टाकतात. त्यांच्यातला एकजण ई. एन. टी. (नाक, कान, घसा) स्पेशालिस्ट होतो. तो आपल्या पाटीवर 'हाऊसमन इन ई. एन. टी.' असे लिहितो. ही मंडळी एकमेकांना पेशंटस् पाठवतात, ऑपरेशन्स करतात.

एक सिंडिकेट तर फार गमतीदार आहे. त्यातली मंडळी ऑपरेशन्स वगैरे करण्याची तसदी घेत नाहीत. ते आठवड्यातून एकदा शहरातल्या एखाद्या प्रसिद्ध हॉटेलात जमतात. त्यांच्यात नव्याने प्रॅक्टिस सुरू केलेला एखादा एम. डी; एम. एस. झालेला कन्सल्टंट डॉक्टर बावरलेल्या बसलेला असतो. त्याला सिंडिकेटवाले सांगतात, 'आम्ही आमच्या केसेस अमुकअमुक डॉक्टरकडे पाठवतो. तो आम्हाला वीस टक्के कमिशन देतो. तू किती टक्के देतोस ?' कन्सल्टंटला काहीच गिऱ्हाईक नसते. तेव्हा 'घ्या कमिशन, पण केसेस पाठवा' असे निरुपायाने म्हणून तोही त्या सिंडिकेटचा सदस्य बनून जातो. या कमिशन प्रकाराला 'कट् प्रॅक्टीस' असे रूढ नाव आहे. बहुतेक नवीन डॉक्टरांना 'कट् प्रॅक्टीस' शिवाय तरणोपायच नसतो. पण एकापरीने ते परवडते.

गेल्या काही वर्षांत कामगार विमा योजना नावाचा एक विनोदी प्रकार सुरू केल्याने जी. पी. मंडळींची फारच चंगळ झाली आहे. पाचसहाशे रुपये महिना हुकमी चालू. शिवाय त्या योजनेचे इतर मार्गांनीही बरेच फायदे असतात. कामगाराला फायदा एकच. तो म्हणजे पाहिजे तेव्हा डॉक्टरकडून सर्टिफिकेटे मिळतात. बाकी पेशंटला खरीखुरी गरज जेव्हा असेल तेव्हा डॉक्टर सांगणार की योजनेत तुला

पाहिजे असलेली औषधे नाहीत. माझी प्रायव्हेट ट्रीटमेन्टच घेतली पाहिजे. (वास्तविक आहेत त्या औषधांमध्येच काम भागू शकेल अशी स्थिती आहे.)

दुसरे असे की. औषधे बरीच लिहून द्यायची. पेशंट सगळी घेत बसत नाही. तेव्हा उरलेली ठेवून घ्यायची. एकाचे उदाहरण तर फारच गमतीचे आहे. तो डॉक्टर एका सामाजिक ' विचारवंत ' आमदाराचा भाऊ आहे. तो आणि त्याची बायको दोघेही प्रॅक्टिस करतात. पण विमा योजना बायकोच्या नावावर. विमा योजनेची पद्धत अशी की डॉक्टरांनी त्या छापील कागदावर लिहून द्यायचे, सही करायची. पेशंटनेही सही केली की औषध-विक्रेत्याकडून औषध मिळते. या पठ्ठ्याने बऱ्याचशा अडाणी कामगारांकडून कोऱ्या फॉर्मवर सह्या घेऊन ठेवल्या आणि त्यायोगे वाटेल ती आणि वाटेल तेवढी औषधे तो आणीत असे किंवा त्याच केमिस्टला परस्पर विकून पैसा कमवीत असे. एकदा या योजनेवरचा इन्स्पेक्टर तपासणीला आला असता त्याला पेशंटच्या सह्या असलेल्या कोऱ्या फॉर्मस्चा गठ्ठाच सापडला. त्याने वर तक्रार केली. कारवाई एवढीच झाली की, त्या इन्स्पेक्टरची एकदम अति दूर उत्तर प्रदेशात बदली झाली ! हे आमदारसाहेब बंधू फुले, आंबेडकर, कर्मवीर शिंदे यांच्या नावांशिवाय एक वाक्यही बोलत नाहीत !

गरजवंताला सर्टिफिकेट देणे हा तर या व्यवसायाचा पुरातन हक्क. मी प्रॅक्टिस सुरू केली तेव्हा या क्षेत्रातल्या तज्ज्ञ माणसाने मला त्यातल्या त्याच्या काही ट्रिक्स सांगितल्या. हे डॉक्टर स्वतः पक्के धंदेवाईक. एखादी स्वस्तात जागा मिळवायची. थोडे दिवस बसून आपली फार ' गुडविल ' आहे असे भासवून दवाखाना, भरमसाठ पैसे घेवून विकायचा, हाच यांचा धंदा. जी काही प्रॅक्टिस असेल ती सर्टिफिकिटांचीच. ते सर्टिफिकेट देताना कायद्यातून पळवाट मिळेल अशी वाक्यरचना करायचे. म्हणजे पुढे कोर्टात गेल्यावर तो कधी शब्दात सापडत नसे. कारण कुठेही अमक्या अमक्याला ' मी तपासले ' असे शब्द नसत !

एकदा तर त्याच्याकडे एक माणूस येऊन ' मला पंधरा दिवसांचे अमुकअमुक सर्टिफिकेट द्या. मी पन्नास रुपये देतो. ' असे सांगू लागला. त्यावरून हे प्रकरण भानगडीचे आहे हे त्या डॉक्टरांना समजले. म्हणून त्यांनी तीनशे रुपये मागितले. तो माणूस तयार झाला. पुढे पंधरा वीस दिवसांनी त्या डॉक्टरच्या दवाखान्यापुढे पोलिसांची गाडी उभी राहिली. त्या मागच्याच माणसाला बेड्या घालून याच्या समोर आणले. फौजदाराने सर्टिफिकेट दाखवून त्याला विचारले. ' ही सही तुमची ना ? या माणसावर त्याच्या गावी खून केल्याचा आरोप आहे. त्याच वेळी हा पुण्यात तुमची ट्रीटमेन्ट कशी घेत होता ?' डॉक्टर म्हणाले, ' ही सही माझीच

आहे. पण पेशंट हा नाही.' पुढे कोर्टात फौजदाराने, वकिलाने सगळ्यांनी याला परतपरत विचारले तरी यांचे उत्तर तेच. सही माझी. पण तो माणूस हा नाही. सगळे हात चोळीत बसले,

हा वरील डॉक्टर मोटारी विकत घेणे, विकणे हा व्यवसायही जोरात करतो. बरेचसे डॉक्टर सावकारीचा धंदाही करतात. कोकण हा किती दरिद्री भाग. त्याच कोकणातल्या एका डॉक्टरने इतका पैसा मिळवला आहे की त्यावर तो सावकारी करतो. शिवाय बरीच स्थावर जंगम मिळकत. आणि शेकडो ट्रक्ससुद्धा.

कन्सल्टंटची बात जरा वेगळी असते. जी. पी. वाल्यांचे बरे असते. एम्. बी. बी. एस्. किंवा आयुर्वेदीक डॉक्टर झाले की, लगेच पैसा मिळवायला लागता येते. पुन्हा दोनचार हजार (जास्तीत जास्त आठ-दहा हजार) सुरुवातीला असले तरी पुरतात. कन्सल्टंट म्हणजे आधी परीक्षा पास होता होता मारामार. मग धंदा. त्यात सुरुवातीची निदान पाचसहा वर्षे भाकड जातात. त्यात सुरुवातीला पैसाही खूप गुंतवावा लागतो. फोमच्या खुर्च्या, रिसेप्शनिस्ट अशी वातावरण निर्मितीही करावी लागतेच.

ज्यांना हे जमत नाही ते सर्जन तर सुरुवातीला (वर्दीप्रमाणे ?) दुसरीकडे जावून अल्प दरात ऑपरेशन्स करू लागतात. एक सर्जन मित्र मला त्याची गंमत सांगत होता. तो असाच जी. पीं. च्या बोलण्यावरून ऑपरेशन्स करायला जात असे. ज्याचे ऑपरेशन करावयाचे तो पेशंट त्याने पूर्वी पाहिलेलासुद्धा नसे. मागच्या दाराने ऑपरेशन थिएटरमध्ये जायचे. ऑपरेशन केले की मागच्या दारानेच परत. जी. पी. ने मात्र पेशंटच्या नातेवाईकांपुढेच गाऊन ग्लोव्हजमध्ये जाऊन आपणच ऑपरेशन केल्याचे भासवायचे !

या सर्जनने एका जी. पी. कडे अशा गुपचुप पद्धतीने एका बाईचे क्युरेटिंग केले, पुढे हाच सर्जन दुसऱ्या जी. पी. कडे गेला. तेव्हा नेमकी तीच बाई ऑपरेशन-साठी त्याच्या समोर. तिचे पूर्वीचे क्युरेटिंग बरोबर झाले नव्हते म्हणून ती डॉक्टर बदलून या डॉक्टरकडे आली होती. जी. पी. तिला जोरजोरात सांगत होता, 'आधीच्या डॉक्टरने तुमचे खराब ऑपरेशन केले, तो डॉक्टर होता की कोण होता ?' आमचा हा सर्जन मित्र समोर बसून हे सर्व एकतोय. पण तो कसे सांग-णार, बाबारे, तेही ऑपरेशन मीच केले होते. आणि इथेही मीच करणार आहे. पुढे जी. पी. त्या पेशंटबाईला सांगत होता, 'पण आमच्याकडे तसं नाही. इथं अगदी व्यवस्थित केले जाईल.' इकडे या सर्जनने चेहरा पार टाकला होता !

नव्या सर्जनला फेडायचे हप्ते दिसत असल्याने तो मिळेल तेथे आणि मिळेल त्याच्यावर सर्जरी करायला जणू उत्सुक असतो. पेशंटने पोटाकडे बोट दाखवले की

याचे अपेंडिक्स उडालेच म्हणून समजा. डॉक्टरसमोर घसा खाकरला की त्याच्या टॉन्सिलसची धडगतच नाही. एका सर्जनने साधी हगवण झालेल्या पेशंटला फसवून अल्सरसाठी करतात ते गॅस्ट्रोजुजुनोस्टोमी नावाचे मोठे ऑपरेशन केले आणि त्याला कायमचे पंगू करून ठेवले. एका विशेष प्रॅक्टिस न चालणाऱ्या सर्जनने पेशंटला 'तुझे हार्टचे ऑपरेशन करतो' असे सांगून त्याला भूल देऊन छातीवरच्या कातडीवर साधा कट घेऊन परत शिवून टाकले आणि त्या साध्या कटबद्दल हृदयावरील शस्त्रक्रियेचा भरमसाट पैसा घेतला.

माझ्या माहितीचे असेच एक डॉक्टर आहेत. त्यांचा एक सिद्धांत आहे—भारतातल्या प्रत्येकाला अमिबिआसिस असतोच. येथपर्यंत ठीक आहे. पण जवळजवळ प्रत्येक रोगच अमिबामुळे होतो असा त्यांचा दावा आहे. अल्सर झाला तरी अमिबिक अल्सर, डोळे आले तरी अमिबिक कंजंटिव्हायटीस. त्यांना जळी, स्थळी, पाषाणी अमिबाच दिसतो. त्यांचे म्हणणे असे, अपेंडिक्स हे अमिबांचे बंदर आहे. तेथून ते सर्व शरीरात पसरतात. म्हणून अपेंडिक्स उडवा.

ही विचारसरणी अर्थात सर्जन्सना फारच फायद्याची असल्याने ते ती उचलून धरीत आहेत. या फिजिशियनचा एका सर्जनबरोबर करार आहे. एकानं दुसऱ्याला अपेंडिक्सच्या केसिस पुरवायच्या. ऑपरेशनच्या तिथे उभे राहण्याबद्दल फिजिशियनला पैसे मिळतात. (हे आता इतके वाढलेय की बाईला मूल झाले तरी त्यालासुद्धा हे अमिबालाच जबाबदार धरतील.)

शहरातली कापाकापी पुरे पडत नाही म्हणून सर्जनमंडळी आठवड्यातून एकदोन दिवस खेड्यापाड्यांत मुलुखगिरी करायला बाहेर पडतात. तालुक्याच्या ठिकाणी किंवा त्याहूनही लहान गावी यांच्या गाड्या जातात. मागे हत्यारांचे ड्रम्स असतात. तिथल्या जी. पी. ने केसेस जमवून ठेवलेल्या असतात. यांनी जाऊन कापाकापी सुरू करायची. पेशंटच्या टॉन्सिल्स कधी काढायच्या याचे शास्त्र असते. तसेच ऑपरेशनपूर्वी पेशंट ऑपरेशनच्या परिस्थितीत आहे की नाही हे बघण्याचेही शास्त्र असते. पण ते सोयीस्करपणे बाजूला ठेवले जाते. जी. पी. ने सांगायचे आणि यांनी तो अवयव कापून काढायचा.

त्यांना निर्जंतुकपणाविषयी विचाराल तर ते युक्तिवाद असा तुमच्या तोंडावर फेकतील की, संततीनियमनाची शस्त्रक्रिया शिबिरे जर मांडव घालून चालतात तर आमची ऑपरेशन्स का चालू नयेत?

प्रत्येक शाखेच्या गमती वेगळ्या. तत्त्व तेच. सर्जन्सचे टॉन्सिल आणि अपेंडिक्स तर गायनॅक-ऑब्स्ट्रेटिक्सवाल्यांचे डी. अँड सी (क्युरेटिंग) आणि सिझेरिअन.

अबॉर्शन्सना डी. अँड सी. करतात त्यात सुद्धा श्रेणी असतात. लग्न झालेल्या चार-पाच मुले असलेल्या बाईची डी. अँड सी म्हणजे एकदम थंड डी. अँड सी. अविवाहित बाईला एखाद दुसरा महिना गेला आहे ही गरमागरम डी. अँड सी. आणि अविवाहितेला पाच एक महिने गेलेत आणि ती बाई अब्रूदार आहे, की ती हॉटेस्ट डी. अँड सी. पेशंटच्या अगतिकपणाच्या प्रमाणाप्रमाणे डॉक्टरांचे शस्त्रक्रियांचे भाव ठरतात !

सुलभ प्रसूतीचे सगळे उपाय संपल्यावर सिझेरियन सेक्शन करायचे हा अगदी पुस्तकी नियम झाला. पण या डॉक्टरांचा नियम असा की पैसे देणारा पेशंट असला की सिझेरियन करायचे. सिझेरियन गळी उतरवायची युक्ती अशी की, प्रसूतीच्या आधी सांगायचं, मुलाचे ठोके जलद पडत आहेत, मुलाला धोका आहे. ताबडतोब ऑपरेशन व्हायला पाहिजे. असे म्हटले की, पेशंट झटदिशी कबूल झालाच पाहिजे.

लहान मुलांच्या डॉक्टरचा खाक्या असा की, दिसले मूल की लाव ग्लुकोजची बाटली. हे इतके रूढ झाले की एक पेडिअॅट्रिशिअन सांगत होते की, मूल अॅडमिट झाल्यावर काही वेळाने पेशंटचा बापच येऊन म्हणतो, काय डॉक्टर, चार तास झाले अॅडमिट होऊन. अजून सुई नाही की काही नाही. चढवा की एक बाटली.

पेशंट कन्सल्टंटकडे गेला की, त्याचा रोग त्या डॉक्टरच्या आवाक्यातला असो किंवा नसो, डॉक्टर पेशंटला कधी विन्मुख पाठवीत नाही. सर्जन असला तरी तो त्या क्षणी गायनॅकॉलॉजिस्ट होतो. कधीतर सायकियास्ट्रिस्टही होतो. एका डॉक्टरची तर फारच गंमत आहे. तो एका शहरातील एक प्रसिद्ध सर्जन. स्वतःचे मोठे हॉस्पिटल आहे. एकाच्या कुत्र्याच्या नाकाला पॉलीप झाले. सर्जन म्हणाला, ‘आण, मी करतो ऑपरेशन.’ त्याच्या ऑपरेशनचा दिवसही नक्की झाला. अॅनेस्थॅटिस्टची अपॉईंटमेंटही घेतली. पेशंट फार भुंकेल म्हणून त्याला स्पेशल रूमही देण्यात आली. आदल्या दिवशी कुत्र्याच्या मालकाला वाटले, नाकाचे ऑपरेशन आहे. नाकाच्या डॉक्टरला विचारावे, म्हणून तो एका ई. एन. टी. सर्जनकडे आला. तेव्हा हे प्रकरण बाहेर आले. इ. एन. टी. वाल्याने कुत्र्याच्या मालकाला सांगितले, बाबारे, हे काम गुरांच्या डॉक्टरचे आहे. त्याच्याकडे जा ! कुत्र्याच्या ऑपरेशनचा पैका हातचा सुटल्यामुळे डॉक्टर भलतेच खट्टू झाले.

एकमेकांचे पेशंट पळवणे हा तर या क्षेत्रात वैद्यकीय ज्ञानापेक्षा अधिक कौशल्याचा भाग झाला आहे. एका पेशंटला त्याच्या मित्राने फक्त दुसरा सल्ला घ्यायला म्हणून दुसऱ्या सर्जनकडे नेले. त्याने त्या डॉक्टरला सांगितले की, मला सल्ला द्या. पण ऑपरेशन मात्र मी माझ्या अमुक डॉक्टरकडे करणार. त्यावर ते सर्जन म्हणाले, ‘ हात्तिच्या तिथं गेलात तरी तिथेसुद्धा मीच ऑपरेशन करतो. मग इथेच का करीत नाहीस ?’ तो पेशंट परत आपल्या मूळ डॉक्टरकडे जाऊन विचारू लागला

तेव्हा त्याला कळले की हे बंडल आहे. या उलट एका जी. पी. ने मी अमुक प्रसिद्ध गायनॅक स्पेशालिस्ट बाईंना ऑपरेशनला बोलावतो असे सांगून स्वतःच ऑपरेशन केले. पेशंट पुढे त्या डॉक्टरबाईकडे डायरेक्ट गेली तेव्हा कळले त्या डॉक्टरबाईंना काही माहीतच नव्हते !

प्रत्येक स्पेशालिस्टपुढे जनरल हॉस्पिटलमध्ये ऑनररीशिप मिळवणे हा मोठाच प्रश्न असतो. गावातले दहावीस बडे डॉक्टर ऑनररींच्या जागा अडवून बसलेले असतात. तीच मंडळी चारचार सहासहा हॉस्पिटलांमध्ये ऑनररी असतात. ऑनररी असण्याचे फायदे खूप. एक म्हणजे आपले खासगी पेशंट सरकारी खर्चाने ट्रीट करता येतात. म्हणजे असे : पेशंटला सरकारी इस्पितळात ॲडमिट व्हायचे असेल तर ऑनररी डॉक्टरच्या प्रायव्हेट क्लिनिकमध्ये जावून तपासून घ्यायचे आणि कन्सल्टिंग फी द्यायची. त्यांची चिठ्ठी घेवून सरकारी हॉस्पिटलमध्ये जायचे. बॉसची चिठ्ठी पाहिल्यावर तातडीने ॲडमिशन आणि लगेच तपासणी. मग तो पेशंट इतरही पेशंटना ऑनररीच्या प्रायव्हेट दवाखान्यात आणतो.

सर्जनच्या बाबतीत तर हे फार. प्रायव्हेट दवाखान्यातल्या पेशंटला सर्जन सांगतो, खासगी दवाखान्यात एक हजार रुपये खर्च होईल. पण परवडत नसेल तर सरकारीमध्ये जा. तिथे ऑपरेशन मी करावे असे वाटत असेल तर तीनशे रुपये. हे तीनशे म्हणजे डॉक्टरला अगदी शंभर टक्के फायदा. फिजिशियनला ऑनररी होण्याचे फायदे दोन. एक म्हणजे प्रचार. दुसरे म्हणजे फुकट तपासणी.

इन्व्हेस्टिगेशन्स (तपासणी) हे या प्रांतातले अत्यावश्यक फॅड. पेशंटला डॉक्टरने स्वतः तपासून निदान करण्याचे कसब आता इतिहासजमाच झाले आहे. रिपोर्टांचा गठ्ठा टेबलावर आल्याशिवाय पानही हलत नाही. इतर लोकांना यातले कळत नाही म्हणून गैरप्रकारही जास्त. अेक उदाहरण सांगतो. माझ्या माहितीचे एक पॅथॉलॉजिस्ट मुंबईत प्रॅक्टिस करीत होते. त्यांना एका मोठ्या कन्सल्टंटचा फोन आला. ते म्हणाले, 'मी एक टॉन्सिलायटीस झालेला मुलगा पाठवीत आहे. त्याचा 'डिप्थेरिया' असा रिपोर्ट लिहून द्या.' पॅथॉलाजिस्टनी विचारले, 'का ?' तर त्यावर उत्तर मिळाले– 'त्याचा बाप बागाईतदार आहे. त्या मुलाला मला माझ्या नर्सिंग होममध्ये पंधरा दिवस ठेवायचे आहे.' पॅथॉलॉजिस्टने तसा रिपोर्ट द्यायला नकार दिल्यावर त्या कन्सल्टंटने त्यांची इतकी बदनामी केली की, प्रॅक्टिसवर परिणाम होऊन त्यांना शेवटी सरकारी नोकरीत शिरावे लागले !

काही खाजगी किंवा ट्रस्टवर चालणाऱ्या हॉस्पिटलना सरकारी मान्यता असते. म्हणजे इथे सरकारी नोकराने कितीही बिल केले तरी ते सरकार भरते.

हॉस्पिटलचा चार्ज हॉस्पिटल घेते आणि ऑनररीज त्यांची फी घेतात. फी सरकारच भरत असल्याने ही डॉक्टरमंडळी इतकी बिले करतात की विचारायची सोय नाही. ज्या ऑपरेशनला बाहेर खाजगी हॉस्पिटलमध्ये जो डॉक्टर दोनशे रुपये घेत असेल, त्याच ऑपरेशनचे, तोच डॉक्टर अशा हॉस्पिटल्समध्ये दोन अडीच हजार रुपये बिल सहज करतो यात पेशंटचे काही जात नसल्याने सरकारला लुटण्याच्या या प्रकाराला ऊतच आला आहे. नाकाचा साधा घोळणा फुटला, त्याचे रक्त थांबवण्या साठी एका इ. एन्. टी. सर्जनने तीन हजार रुपये बिल केल्याचे उदाहरण अशा हॉस्पिटलातून घडले आहे !

मला डॉक्टरांचा राग येण्याऐवजी दया येते. बिचारे अितके काबाडकष्ट करतात की बाहेरच्यांना कल्पनाही यायचा नाही. आधी धंदा चालविण्यासाठी वाटेल ते प्रकार करून ढोर मेहनत करावीच लागते. नंतर पैसा येऊ लागला की त्याची चटक लागल्याने तो जास्तच ढोर मेहेनत करू लागतो. हे डॉक्टर्स वर्तमानपत्रे वाचण्यात वेळ घालवीत नाहीत. कारण विचारता ते म्हणतात, ‘ आम्हाला राजकारणात रस नाही.’ त्यांना साहित्यात रस नसतो. त्यांना भोवतालच्या समाजात रस नसतो. त्यांना रस फक्त पैसे मिळविण्यात असतो. अेक डॉक्टर म्हणत होते, ‘दुष्काळ वगैरे फक्त पेपरात आहे खरा दुष्काळ काही नाही.’ मी विचारले, ‘ कशा-वरून हे म्हणता ?’ ते म्हणाले, ‘ माझे नव्वद टक्के पेशंट हे खेडेगावचे असतात. आणि अजूनही ते मला चांगले पैसे देत असतात. दरवर्षी अेखादा सीझन तरी स्लॅक जातो. यावर्षी अुलट सर्व सीझन ‘ फुल् ’ आहेत.’ मला त्यांना हात जोडावेसे वाटले.

या मंडळींना वैद्यकीय ज्ञानातही फारसे गम्य नसते. अद्ययावत् ज्ञानाची फार थोडी माणसे त्यात असतील. नवीन संशोधन तर बाजूलाच. प्रॅक्टिस सुरू करायची. सेकंड हँड मोटार–सायकल घ्यायची मग नवी जावा. नंतर कार. मुले कॉन्व्हेंटला. या यांच्या प्रगतीच्या कल्पना. खासगी जीवनाचा तर बहुतेकांनी बळीच दिलेला असतो. सगळे आयुष्य त्यांनी कमर्शियल करून टाकलेले असते.

प्रत्येक व्यवसायाचे अेकअेक नीतिशास्त्र असते. न्यायाधिशांनी निःपक्षपाती-पणे न्यायदान करायचे. इतर समाज लाच खातो, मग मी खाल्ली तर काय बिघडले असे त्यांनी म्हणून चालत नाही. तसे डॉक्टरकीचा पायाच सेवेवर आधारलेला आहे. त्याला पोटाला पैसे मिळावेत. पण किती ? माझ्या एका केमिस्ट्रीच्या प्राध्यापक मित्राच्या हाताला साधे प्लॅस्टर केले. त्याचे शंभर रुपये बिल झाले. त्याने घरी जाऊन प्लॅस्टरला किती खर्च आला असेल हे काढले. जास्तीत जास्त

तीन रुपये. त्यावर डॉक्टरच्या कौशल्यासाठी दहा रुपये घ्या. वीस घ्या. पण शंभर कुठे आणि वीसपंचवीस कुठे ? असा ‘ सेवे ’चा आजकाल ‘ धंदा ’ झाला आहे.

या धंदेवाईकपणापायी वैद्यकीय प्रामाणिकपणाचाही बळी दिला जात आहे. एका शहरातल्या एका बड्या आर्थोपेडिशियनने संपूर्ण तुटलेला हात जोडण्याचे ऑपरेशन इतर डॉक्टरांच्या मदतीने केले. त्याचे फोटो काढवून घेऊन दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात छापवून आणले. लोकांना आनंद व अभिमान वाटला. पण दुसऱ्याच दिवशी ती शस्त्रक्रिया अयशस्वी झाल्याचे दिसून आले. जोडलेला हात परत तोडावा लागला. पण त्याची साधी बातमीसुद्धा नाही. या अप्रामाणिकपणा-विषयी काय म्हणावे ?

एखाद्या वस्तीत प्रॅक्टिस करणारा डॉक्टर हा वास्तविक वैद्यकीय ज्ञानाचा समाजातला एक प्रकाशझोत असायला हवा. पण तसे होत नाही. झोपडपट्टी आहे किंवा दाट वस्ती आहे तिथे गलिच्छपणामुळेच बरेच रोग तयार होत राहातात. पण आमचा डॉक्टर कधी तिथे जाऊन स्वच्छता शिकवण्याचे किंवा इतर काम करीत नाही. कारण झोपडपट्टीत सुधारणा झाली तर याच्या प्रॅक्टिसवर परिणाम नाही का होणार ?

मी प्रॅक्टिस सुरू केली तेव्हा माझ्या दवाखान्याच्या शेजारून नागझरी नामक पुणे शहरातला घाण पाण्याचा नाला वहात होता. माझा डॉक्टर मित्र म्हणाला, ‘ तुझी मजा आहे बाबा. तुला बाराही महिने मस्त सीझन मिळेल. आम्हाला एकदोन सीझन्स तरी मंदीचे जातात, तुला भीतीच नाही. ’ आता ही नागझरी काही ठिकाणी स्लॅब टाकून बुजवली आहे त्यामुळे आसपासच्या डॉक्टरांच्या प्रॅक्टिसवर ‘ वाईट ’ परिणाम झाला आहे !

आपल्यालाच चार पैसे कमी मिळतील या भीतीने समाजाच्या आरोग्याची देखभाल करायचे यांचे कर्तव्य यांनी कधीच सोडून दिले आहे वास्तविक भारता-सारख्या मागास देशात रोगप्रतिबंधक औषधयोजनेवर अधिक भर असला पाहिजे. रोग निर्माण करणारे कारखाने पहिले बंद पाडायला पाहिजेत. हे काम अगदीच दरिद्रीपणे चालले आहे. खासगी डॉक्टरांकडून तर आशाच करायला नको. कारण त्यांचे सामाजिक आरोग्याबरोबर नेमके उलटे हितसंबंध गुंतलेले आहेत !

समाजाचे आरोग्य बाजूला ठेवू या. टेरॅमायसिन किंवा क्लोरोमायसिटीनच्या अतिरेकी वापराने ही डॉक्टरमंडळी काय अनर्थ निर्माण करणार आहेत याकडे कुणाचे लक्ष आहे का ? सुरुवातीला सल्फा, नंतर पेनिसिलिन आणि शेवटी टेरॅमायसिन एरिथ्रोसिन इत्यादी देणे ही शास्त्रीय शिस्त सहसा कोणी पाळत नाही. पेनिसिलि-नची टेस्ट घ्या, दहा मिनिटे बसवा, रिॲक्शन आली तर धावपळ करा, हे कोण करणार ? मग मारा टेरॅमायसिन ! त्यामुळे आता जंतू इतके ‘ बलवान ’ झालेत की, पंधरा वर्षापूर्वी टेरॅमायसिनचा चांगला परिणाम होत होता. आता त्याच्या

निम्माही परिणाम होत नाही. टी. बी. पेशंटला व्यवस्थित मार्गदर्शन न केल्याने तो स्ट्रेप्टोमायसिन अनियमित घेतो. त्यामुळे टी. बी. चे जंतू नुसते रेझिस्टंट बनत नाहीत, तर ते स्ट्रेप्टोमायसिन हे अन्न म्हणून वापरायला शिकतात. काही वर्षात स्ट्रेप्टोमायसिनचा काहीही उपयोग राहणार नाही.

म्हणजे संशोधकांनी औषध शोधायचे आणि आम्ही ते निकामी करून टाकायचे ही आमची विज्ञानात मौलिक भर ! आता या कुठल्याच औषधांना दाद न देणाऱ्या जंतूंच्या जाती तयार होत आहेत, त्यांतून साथी उद्‌भवल्या आणि लाखो माणसे मेली तर त्या हत्यांचे पातक सर्व डॉक्टरमंडळींवर आहे, असेच म्हणावे लागेल.

वैद्यकीय व्यवसायातील सर्व फायदे विज्ञानामुळे मिळतात, आपण त्या विज्ञानाचे देणे लागतो हे डॉक्टर लोक सोयीस्करपणे विसरतात. डॉक्टर रोग्याला बरे करतो यात डॉक्टरचे स्वतःचे श्रेय खरोखर किती ? पदार्थविज्ञान शास्त्रज्ञांनी क्ष–किरणांचे शोध लावले. विद्युत संशोधकांच्या शोधांवर डॉक्टरांचे इ. सी. जी; इ. ई. जी. उभे आहेत. बायोकेमिकल ज्ञानावर सगळी इन्व्हेस्टिगेशन्स, औषधे अवलंबून आहेत. या सगळ्याचा उपयोग करून डॉक्टर सगळे श्रेय मात्र स्वतः घेतो. मी रोग्याला बरे केले असे सांगतो. वेगवेगळ्या लोकांच्या संशोधनाचा जास्तीत जास्त फायदा (आणि तोही आर्थिक स्वरूपात) केवळ तो रोग्याजवळची शेवटची लिंक असल्याने उमटतो. हे कितपत योग्य ठरेल ?

आपण या ज्ञानाचे वाहक आहोत. लोकांना नुसते गोळ्या देवून बरे करणे एवढेच आपले काम नाही. तर लोकांना वैद्यकीयदृष्टया जागरूक बनविणे हे आपले काम आहे हे सर्वजण विसरलेलेच दिसतात. एखाद्याच्या मनात असले तरी प्रिस्क्रिप्शने खरडण्यातून त्याला वेळ होत नसावा.

आरोग्यासारख्या गंभीर प्रश्नाकडे एकंदर समाजाचे फारसे लक्षही दिसत नाही. सर्वात खालचा गरीब माणूस औषधपाण्यापायी सर्वात जास्त नागवला जातो. आणि ज्यांची भरपूर ऐपत आहे अशा सेन्ट्रल गव्हर्मेंट, स्टेट गव्हर्मेंट च्या नोकरांना सवलती मिळतात. फॅक्टरीतल्या ऑफिसर्सना फुकट औषधे, हॉस्पिटल सोयी आणि वर आरोग्य भत्ते मिळतात.

पेशंट पैसे बुडवतात, पेशंटनाच इंजेक्शने पाहिजे असतात, अशा डॉक्टर-लोकांच्या तक्रारी आहेत. त्या खऱ्याही आहेत. एकंदर वैद्यकीय क्षेत्रात चुकीची पद्धत सुरुवातीपासून पडली गेली आणि दिवसेंदिवस ती बिघडत जात आहे. याला फक्त डॉक्टरच जबाबदार आहेत असे नाही. भ्रष्ट, कुजलेल्या समाजातल्या निरनिराळ्या शक्ती यात काम करतात. औषधाच्या कंपन्या, सरकारी रुग्णालये, इ. एस. आय्. डॉक्टर्स, कन्सल्टंट्स् आणि पेशंट्स हे सर्वच कमीअधिक प्रमाणात दोषी असतात. पण डॉक्टर हा सर्वांचा मध्यबिंदू आहे. बराचसा दोषी तो आहे.

म्हणूनच ही व्यवस्था सुधारण्याची जबाबदारी त्याच्यावर आहे आणि बहुधा शक्तीही त्याच्यातच आहे !

आतापर्यंत दिलेली उदाहरणे ही अपवादाने घडलेली उदाहरणे आहेत असे कोणी डॉक्टर म्हणू शकेल. अशी उदाहरणे रोज घडत नाहीत हे खरेच आहे. पण अशी घडू शकतात हेही खरेच आहे. यातली बरीचशी उदाहरणे तर फौजदारी स्वरुपाच्या गुन्ह्यांमध्येच मोडतील. (केवळ पेशंटना कळत नाही म्हणून ते कोर्टात जात नाहीत.) आणि गुन्हे केल्याशिवाय ह्या धंद्यात यशस्वी होता येत नाही इतकी ही व्यवस्था भीषण होत आहे हे या उदाहरणावरून जाणवते.

ही व्यवस्था सर्व समाजातच आपला प्रभाव गाजवून आहे. पेशंटला घाबरवून सोडून पैसे काढणारे डॉक्टर तर त्यात येतातच. पण सर्वसामान्य माणसातही ती मुरलेली आहे. घरात कुणाचे डोके दुखत असले की दुसरा, मी तुझे डोके चेपून देतो असे म्हणण्याऐवजी प्लॅस्टिक स्ट्रीपमधली एखादी गोळी काढून देतो. रक्त, लघवीच्या तपासण्या सुरू झाल्यावर आता डॉक्टर रोग्याच्या शरीराला हातही लावेनासा झाला आहे. पूर्वी डॉक्टर हा पेशंटच्या घरातला एक घटक असे. घरातली भांडणे सोडवायलाही डॉक्टरकडे जात. आता कुणाचे सुखदु:ख कुणाला नाही. पेशंट आला की पैसे टाकतो आणि औषध वाजवून घेतो आणि डॉक्टरही सुचेल त्या उपायाने त्याच्याकडून जास्तीत जास्त पैसे काढण्याचा प्रयत्न करतो. त्यांच्यात याशिवाय दुसरा दुवाच राहिला नाही. त्यामुळे पेशंटच्या रोगाची डॉक्टरला काळजी वाटत नाही, उलट पर्वणीच वाटते.

आणि जे पेशंटच्या बाबतीत तेच समाजाच्या बाबतीत. अपुऱ्या अन्नामुळे रातांधळा झालेला एखादा मुलगा डॉक्टरकडे आला तर डॉक्टरने व्यथित अंतःकरणाने त्याला औषध दिले पाहिजे. पण आमची संवेदनाशक्ती इतकी हरपली आहे की उलट आम्ही त्याला बरे करता करता त्याला कर्जबाजारी मात्र करून ठेवतो.

हे का होते ? इतर सर्व पैसे उकळतात, मग आम्हीच काय पाप केले असे काही डॉक्टर म्हणतात. ते चालणार नाही. काही व्यवसाय हे उदात्त म्हणून गणले जातात. जसे जज्जने पैसे खाऊन चालणार नाही किंवा शिक्षकाने उत्तम ज्ञान देण्यात कसूर करता कामा नये, तसेच हे आहे. डॉक्टरी व्यवसायाचा पाया सेवावृत्तीशिवाय दुसरा काही असूच शकत नाही. आज या व्यवसायात पैसा भरपूर नसता तर मेडिकल प्रवेशासाठी एवढी गर्दी (तीही हजारो रुपये कॅपिटेशन फी देऊन) का झाली असती ? सर्वच तरुणांना एकदम सेवावृत्तीचा उमाळा आला आहे का काय ?

(आठदहा वर्षांपूर्वी हुषार तरुणांना इंजिनियरिंगचा उमाळा आला होता.) या व्यवसायात पैसा आहे की नाही याचे सोपे गमक म्हणजे डॉक्टरांना लग्नाच्या बाजारात काय भाव आहे पाहावा. आज ही मंडळी वीसपंचवीस हजाराखाली उतरतच नाहीत. परदेशवारीचा खर्च, हॉस्पिटलची जागा, एवढेच काय, माझ्या एका मित्राने लग्नात पन्नास हजारांचे एक्स-रे मशिनही मिळवले आहे !

डॉक्टरांना पैसा मर्यादेपेक्षा जास्तच मिळतो. त्याचबरोबर समाजात प्रतिष्ठाही भरपूर असते. ही प्रतिष्ठा सेवेच्या व्यवसायापोटी असते. काळाबाजारवाल्याकडे पैसा कितीही असला, त्याने कितीही देणग्या दिल्या असल्या तरी त्याला अशी प्रतिष्ठा जनमानसात कधी मिळत नाही. पण आमचे डॉक्टर त्या प्रतिष्ठेचा दुरुपयोग करीत आहेत. आहे या दर्जाची वैद्यकीय मदतही त्यांनी आणखीच महाग करून ठेवली आहे. एक प्रसिद्ध कन्सल्टंट पूर्वी वीस रुपये तपासणीची फी घेत असत. पुढे प्रॅक्टिस वाढली. पेशंटची गर्दी फार वाढली. ती कमी करावी म्हणून त्यांनी फी चाळीस रुपये केली. पण गर्दी कमी होण्याऐवजी डॉक्टर भारी म्हणून जास्तच वाढली. पुढे डॉक्टरना डायबेटिस झाला. म्हणून त्यांनी फी साठ केली. त्याने तर गर्दीला सुमारच राहिला नाही.

भारतातल्या गरीब समाजाचे आरोग्याचे प्रश्न तर अगदी वेगळे आहेत. त्यामध्ये इथे असलेल्या रोगांवर इथे उपलब्ध असलेल्या उपाययोजनांचा विचार व्हायला हवा. रोग होऊ नये अशी भोवतालची किमान परिस्थिती निर्माण करण्याचे काम डॉक्टरमंडळींचे आहे. ते त्यांनी अंगाबाहेर टाकून चालणार नाही.

---

# परिशिष्ट

## या लेखावर झालेल्या खटल्याची हकीगत

हा वरील लेख किर्लोस्करमध्ये प्रसिद्ध झाल्यावर पहिल्या पंधरा दिवसात वाचकांची शंभर पत्रे आली. नंतरच्या महिन्यात मिळून एकूण सुमारे अडीचशे पत्रे आली. त्यातली काही डॉक्टरांची व बरीचशी डॉक्टरांविषयी कटु अनुभव असलेल्या पेशंट्सची होती. त्यांनी त्यांचे कटु अनुभव सविस्तर वा त्रोटक स्वरूपात लिहिलेले होते. डॉक्टरांच्या पत्रात मात्र ‘ हे इतके काही चालले नाही ’ असा सूर होता.

या विषयावर आतापर्यंत जे काही तुरळक प्रसिद्ध झाले होते त्या पेशंटच्या तक्रारी होत्या. डॉक्टर त्याकडे 'त्यांना डॉक्टरीतले काय कळते?' असे म्हणून उपेक्षेनें पाहात. मी स्वतः डॉक्टर असल्याने माझ्या बाबतीत 'यांना काय कळते' असे ते म्हणू शकत नव्हते. मी लिहिलेल्या घटना या व्यवसायात सर्वश्रुत असल्याने त्या कोणी नाकारूही शकत नव्हते.

लेख डॉक्टरी क्षेत्रात बराच वाचला गेला. कित्येक पेशंट्सनी त्याच्या-त्यांच्या डॉक्टरांना तो लेख वाचायला दिल्याचे त्या डॉक्टरांनी मला सांगितले. डॉक्टरांविषयी आतून उखडून असलेले मेडिकल रिप्रेझेंटिटिव्हस् आपल्या धोपटीत हा अंक बाळगीत आणि जमेल तिथे विषय उकरून काढीत. या लेखावर गरम झालेल्या कित्येक डॉक्टरांचे किर्लोस्करच्या संपादकांना फोन येत. फोनवर ते अर्धाअर्धा तास बोलून 'हे सर्व खोटं आहे' असे पटवून द्यायचा जोरजोरात प्रयत्न करीत. यावर काही लिहून द्या असे म्हणताच पळ काढीत.

काही थोडे डॉक्टर असे होते की ज्यांनी माझी बाजू घेऊन इतर डॉक्टरांना सांगितले की, 'ही परिस्थिती नाकारण्यात काय अर्थ आहे? याने नावे घेऊन उदाहरणे लिहिली नाहीत. पण ती वाचताना आपल्या डोळ्यांपुढे ती नावे येतातच.' इत्यादी.

या काळात मी कुठल्या दुकानात गेलो आणि माझे नाव त्या दुकानदाराला माहीत झाले की तो थांबवून त्याला आलेला कटु अनुभव, त्याची डॉक्टरकडून झालेली नाडवणूक सांगत असे. पुण्यातल्या 'सार्वजनिक सभे'ने ठराव करून या लेखातल्या मतांना पाठिंबा दिला.

या सगळ्या चर्चेमुळे डॉक्टरांच्या 'इंडियन मेडिकल असोसिएशन' या संघटनेच्या पुणे शाखेने कार्यकारिणीची २६ एप्रिल, ७३ ला खास सभा घेऊन एक ठराव पास केला. त्यात, या डॉक्टरने निश्चित उदाहरणे न देता निराधार आरोप करून डॉक्टरी व्यवसायाची सदर लेखात बदनामी केली आहे, असे म्हटलेले होते आणि सदर लेख लिहिणाऱ्या डॉक्टरविरुद्ध कृती व्हावी यासाठी 'महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल' कडे तो ठराव आणि मूळ लेख पाठविण्याचे ठरले.

या ठरावानंतर त्याची दखल घेऊन तीन महिन्यांनी २० ऑगस्ट, ७३ रोजी महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलने मला नोटीस पाठविली. त्यात इंडियन मेडिकल असोसिएशनच्या तक्रारीवरून पाहता सत्कृतदर्शनी सबळ पुरावा असल्याचे लिहून माझ्यावर दोन आरोप ठेवलेले होते. ते असे—

१. 'किर्लोस्कर, एप्रिल '७३ च्या अंकात 'डॉक्टर्स जगवतात की नागवतात' या लेखात तुम्ही डॉक्टरांच्या व्यावसायिक गैरवर्तणुकीची बरीचशी उदाहरणे लिहून वैद्यकीय व्यवसायाची अतिशय मोठी बदनामी केली आहे. असे लिखाण प्रसिद्ध करण्यापूर्वी आपण मेडिकल कौन्सिलची अनुमती न घेतल्यामुळे आपले वर्तन

(आठदहा वर्षांपूर्वी हुषार तरुणांना इंजिनियरिंगचा उमाळा आला होता.) या व्यवसायात पैसा आहे की नाही याचे सोपे गमक म्हणजे डॉक्टरांना लग्नाच्या बाजारात काय भाव आहे पाहावा. आज ही मंडळी वीसपंचवीस हजाराखाली उतरतच नाहीत. परदेशवारीचा खर्च, हॉस्पिटलची जागा, एवढेच काय, माझ्या एका मित्राने लग्नात पन्नास हजारांचे एक्स-रे मशिनही मिळवले आहे !

डॉक्टरांना पैसा मर्यादेपेक्षा जास्तच मिळतो. त्याचबरोबर समाजात प्रतिष्ठाही भरपूर असते. ही प्रतिष्ठा सेवेच्या व्यवसायापोटी असते. काळाबाजारवाल्याकडे पैसा कितीही असला, त्याने कितीही देणग्या दिल्या असल्या तरी त्याला अशी प्रतिष्ठा जनमानसात कधी मिळत नाही. पण आमचे डॉक्टर त्या प्रतिष्ठेचा दुरुपयोग करीत आहेत. आहे या दर्जाची वैद्यकीय मदतही त्यांनी आणखीच महाग करून ठेवली आहे. एक प्रसिद्ध कन्सल्टंट पूर्वी वीस रुपये तपासणीची फी घेत असत. पुढे प्रॅक्टिस वाढली. पेशंटची गर्दी फार वाढली. ती कमी करावी म्हणून त्यांनी फी चाळीस रुपये केली. पण गर्दी कमी होण्याऐवजी डॉक्टर भारी म्हणून जास्तच वाढली. पुढे डॉक्टरना डायबेटिस झाला. म्हणून त्यांनी फी साठ केली. त्याने तर गर्दीला सुमारच राहिला नाही.

भारतातल्या गरीब समाजाचे आरोग्याचे प्रश्न तर अगदी वेगळे आहेत. त्यामध्ये इथे असलेल्या रोगांवर इथे उपलब्ध असलेल्या उपाययोजनांचा विचार व्हायला हवा. रोग होऊ नये अशी भोवतालची किमान परिस्थिती निर्माण करण्याचे काम डॉक्टरमंडळींचे आहे. ते त्यांनी अंगाबाहेर टाकून चालणार नाही.

---

# परिशिष्ट

## या लेखावर झालेल्या खटल्याची हकीगत

हा वरील लेख किर्लोस्करमध्ये प्रसिद्ध झाल्यावर पहिल्या पंधरा दिवसात वाचकांची शंभर पत्रे आली. नंतरच्या महिन्यात मिळून एकूण सुमारे अडीचशे पत्रे आली. त्यातली काही डॉक्टरांची व बरीचशी डॉक्टरांविषयी कटु अनुभव असलेल्या पेशंट्सची होती. त्यांनी त्यांचे कटु अनुभव सविस्तर वा त्रोटक स्वरूपात लिहिलेले होते. डॉक्टरांच्या पत्रात मात्र ‘ हे इतके काही चालले नाही ’ असा सूर होता.

या विषयावर आतापर्यंत जे काही तुरळक प्रसिद्ध झाले होते त्या पेशंटच्या तक्रारी होत्या. डॉक्टर त्याकडे 'त्यांना डॉक्टरीतले काय कळते ?' असे म्हणून उपेक्षेने पाहात. मी स्वतः डॉक्टर असल्याने माझ्या बाबतीत 'यांना काय कळते' असे ते म्हणू शकत नव्हते. मी लिहिलेल्या घटना या व्यवसायात सर्वश्रुत असल्याने त्या कोणी नाकारूही शकत नव्हते.

लेख डॉक्टरी क्षेत्रात बराच वाचला गेला. कित्येक पेशंट्सनी त्याच्या-त्यांच्या डॉक्टरांना तो लेख वाचायला दिल्याचे त्या डॉक्टरांनी मला सांगितले. डॉक्टरांविषयी आतून उखडून असलेले मेडिकल रिप्रेझेंटिटिव्हस् आपल्या धोपटीत हा अंक बाळगीत आणि जमेल तिथे विषय उकरून काढीत. या लेखावर गरम झालेल्या कित्येक डॉक्टरांचे किर्लोस्करच्या संपादकांना फोन येत. फोनवर ते अर्धाअर्धा तास बोलून 'हे सर्व खोटं आहे' असे पटवून द्यायचा जोरजोरात प्रयत्न करीत. यावर काही लिहून द्या असे म्हणताच पळ काढीत.

काही थोडे डॉक्टर असे होते की ज्यांनी माझी बाजू घेऊन इतर डॉक्टरांना सांगितले की, 'ही परिस्थिती नाकारण्यात काय अर्थ आहे? याने नावे घेऊन उदाहरणे लिहिली नाहीत. पण ती वाचताना आपल्या डोळ्यांपुढे ती नावे येतातच.' इत्यादी.

या काळात मी कुठल्या दुकानात गेलो आणि माझे नाव त्या दुकानदाराला माहीत झाले की तो थांबवून त्याला आलेला कटु अनुभव, त्याची डॉक्टरकडून झालेली नाडवणूक सांगत असे. पुण्यातल्या 'सार्वजनिक सभे'ने ठराव करून या लेखातल्या मतांना पाठिंबा दिला.

या सगळ्या चर्चेमुळे डॉक्टरांच्या 'इंडियन मेडिकल असोसिएशन' या संघटनेच्या पुणे शाखेने कार्यकारिणीची २६ एप्रिल, ७३ ला खास सभा घेऊन एक ठराव पास केला. त्यात, या डॉक्टरने निश्चित उदाहरणे न देता निराधार आरोप करून डॉक्टरी व्यवसायाची सदर लेखात बदनामी केली आहे, असे म्हटलेले होते आणि सदर लेख लिहिणाऱ्या डॉक्टरविरुद्ध कृती व्हावी यासाठी 'महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल' कडे तो ठराव आणि मूळ लेख पाठविण्याचे ठरले.

या ठरावानंतर त्याची दखल घेऊन तीन महिन्यांनी २० ऑगस्ट, ७३ रोजी महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलने मला नोटीस पाठविली. त्यात इंडियन मेडिकल असोसिएशनच्या तक्रारीवरून पाहता सत्कृतदर्शनी सबळ पुरावा असल्याचे लिहून माझ्यावर दोन आरोप ठेवलेले होते. ते असे—

१. 'किर्लोस्कर, एप्रिल '७३ च्या अंकात 'डॉक्टर्स जगवतात की नागवतात' या लेखात तुम्ही डॉक्टरांच्या व्यावसायिक गैरवर्तणुकीची बरीचशी उदाहरणे लिहून वैद्यकीय व्यवसायाची अतिशय मोठी बदनामी केली आहे. असे लिखाण प्रसिद्ध करण्यापूर्वी आपण मेडिकल कौन्सिलची अनुमती न घेतल्यामुळे आपले वर्तन

नीतीबाह्य आणि रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टीशनरला काळीमा आणणारे ठरलेले आहे.

२. सदर लेख लिहून सर्व व्यवसायावर चिखलफेक करून स्वतःची प्रसिद्धी करून घेतली.

म्हणून वरील आरोप पाहता तुम्ही मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाच्या एथिक्सच्या १४ व १७ व्या कलमांचा भंग केला असून व्यावसायिक गैरवर्तणूक केल्याबद्दल दोषी आहात.

तुम्ही आजपासून २१ दिवसांच्या आत या आरोपांविषयी तुमची बाजू मांडणारे लेखी निवेदन सादर करावे.

निवेदनात आपण आपल्या वर्तनाबद्दल आपली वैद्यकीय प्रॅक्टीस करण्याची सनद, ठरविण्यात येईल त्या काळापुरती का काढून घेण्यात येऊ नये याचीही कारणे द्यावीत.

रविवार, ३० सप्टेंबर, ७३ रोजी दु. १२ वाजता भरणाऱ्या महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या मिटिंगमध्ये सदर चौकशीचे कामकाज चालणार असून तिथे आपण उपस्थित राहावे अशी आज्ञा देण्यात येत आहे.'

खाली एम. व्ही. बागूल, रजिस्ट्रार, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल यांची सही होती.

सोबत आरोपपत्र जोडले होते. त्यात आधीचेच दोन आरोप अधिक सविस्तर मांडले होते. मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया, आणि महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे कोड्स् ऑफ एथिक्सच्या प्रती सोबत जोडल्या होत्या. मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाच्या कोड ऑफ एथिक्सच्या पाचव्या पानावरच्या १४ आणि १७ या सेक्शन्स वर लाल पेन्सिलने खुणा केलेल्या होत्या. ह्याच कलमांचा भंग केल्याचा माझ्यावर आरोप होता. १४ वे कलम असे होते. 'प्रत्येक डॉक्टरने व्यवसायाची प्रतिष्ठा आणि मान सांभाळला पाहिजे.' १७ वे कलम असे होते–

**Exposure of Unethical Conduct**

A physician should expose, without fear or favour, incompetent or currupt, dishonest or unethical conduct on the part of members of the profession. Questions of such conduct should be considered first before proper medical tribunals in executive sessions or by special or duly appointed commitees on ethical relations, provided such corse is possible and provided, also, that the law is not hampered thereby. If doubt should arise as to the legality of the physician's conduct, the situation under investigation

may be placed before officers of Law, and the physician investigators may take necessary steps to enlist the interest of the proper authority.

मुंबईला जाऊन हायकोर्टामधील एक निष्णात वकील श्री. सी. आर. दळवी यांना भेटलो. त्यांनी माझी केस चालविण्यास घेण्यास मान्यता दिली. त्यांनी अॅड. विजय टिपणीस या दुसऱ्या हायकोर्ट वकिलांना सहाय्यक म्हणून घेतले. त्यांनी ताबडतोब पत्र ड्राफ्ट करून लेखी निवेदन सादर करण्यास ५ नोव्हेंबर ७३ पर्यंत मुदतवाढीसाठी अर्ज केला. सोबत कोड ऑफ मेडिकल एथिक्स, अॅक्ट आदींच्या प्रतीही देण्याची विनंती केली. कौन्सिलने मुदत दिली.

अॅड. दळवींनी देशोदेशीच्या मित्रांना पत्रे लिहून तिथली कोड्स् ऑफ मेडिकल एथिक्स मागवली. लेखानंतर आलेली उत्स्फूर्त पत्रे समोर ठेवून त्यातल्या काहींना साक्षीला येण्याची विनंती करण्याचे ठरले. कोणाही मान्यवर व्यक्तीला साक्षीला बोलावण्याऐवजी पत्रद्वारे उत्स्फूर्त प्रतिक्रिया व्यक्त केलेल्या सर्वसामान्य वाचकांच्या साक्षीला महत्त्व द्यायचे असा दृष्टिकोन स्वीकारण्यात आला. जवळजवळ सर्वांनी आम्ही तुमच्या बाजूने पुरावा द्यायला तयार आहोत असे कळवले व सर्वतोपरी सहाय्य करण्याचे आश्वासन दिले.

माझ्या लेखी निवेदनात, ठेवलेल्या सर्व आरोपांचा इन्कार केला. सेक्शन १७ प्रमाणे मी माझे लिखाण प्रसिद्ध करण्यापूर्वी कौन्सिलची अनुमती घेण्याची काही जरूरी नसल्याचे निवेदनात सांगितले. महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या कोड ऑफ एथिक्समधले १२ वे कलम उद्धृत करण्यात आले. त्यात 'डॉक्टरने, गैर-वर्तणूक करणाऱ्या डॉक्टरपासून समाजाचे संरक्षण करण्यासाठी अशा डॉक्टरांची गैरकृत्ये मागेपुढे न पाहता लोकांसमोर आणखी पाहिजेत.' असे म्हटले होते. आणि म्हणून हे कलम आणि मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाच्या कोडमधले १७ वे कलम याचा एकत्रितरीत्या व परस्परांशी सुसंगत अशा रीतीने अर्थ लावला गेला पाहिजे, असे नमुद केले. त्याहीपुढे जाऊन हे १७ वे कलम भारतीय राज्य घटनेच्या १९ (१) (ग) कलमाशी (ज्यात प्रत्येक नागरिकाला विचार-अविष्कार स्वातंत्र्य दिलेले आहे) सुसंगतरीत्या वाचले गेले पाहिजे, असे प्रतिपादन केले गेले. तसे शक्य नसेल तर कौन्सिलचे १७ वे कलम घटनाबाह्य आहे व त्या कलमानुसार कारवाई करता येणार नाही असे स्पष्ट केले.

लेख का आणि कशासाठी लिहिला, याचा थोडक्यात इतिहास सांगितला. याविषयीचे विचार मेडिकल शिक्षण घेतानाच आकार घेत होते. पुढे किर्लोस्करच्या संपादकांनी ह्या विषयावर लेख लिहिण्याची विनंती करताच ती संधी मानून मी समाजातल्या सर्व थरातल्या लोकांना भेटून माहिती जमविली आणि किर्लोस्करच्या वाचकांना सार्वजनिक आरोग्य आणि वैद्यकीय व्यावसायिकांची त्यातली कर्तव्ये

याविषयी जागरूक करावे, व वैद्यकीय व्यवसायाचा ऱ्हास थांबवावा, या उद्देशाने लेख लिहिला.

मी लेख लिहिण्यापूर्वी कौन्सिलकडे आलो नाही, कारण एक म्हणजे बऱ्याच लोकांना कौन्सिल काय असते तेही माहीत नाही. ज्यांना कौन्सिल माहीत आहे ते निरनिराळ्या कारणास्तव कौन्सिलकडे येत नाहीत. डॉक्टरच्या गैरवर्तणुकीच्या ज्या केसेस कोर्टात सिद्ध झालेल्या आहेत त्यातल्या काहींविरुद्ध कौन्सिलने कृती केलेली नाही मला कौन्सिलकडे आधी येणे शक्य व व्यवहार्य वाटले नाही, म्हणून आलो नाही. भारतीय नागरिक म्हणून मला आविष्कारस्वातंत्र्य आहे. त्यानुसार डॉक्टरी व्यवसायावर लिहिण्याचा माझा जो हक्क आहे तो मी बजावला. इत्यादी.

५ नोव्हेंबर ७३ ला मी लेखी निवेदन सादर केल्यावर सुमारे अकरा महिन्यांनी ११ ऑक्टोबर ७४ ला मला कौन्सिलचे पत्र आले की, 'तुमच्या केस-संबंधी कौन्सिलचा विचार चालू आहे. आणि आपल्या निवेदनावर प्रश्न विचारून स्पष्टीकरण करून घेण्यासाठी फेब्रुवारी ७५ मध्ये होणाऱ्या कौन्सिलच्या मिटींगमध्ये आपल्याला बोलावण्यात येईल.

आतापर्यंत आम्ही मागणी करूनही इंडियन मेडिकल असोसिएशन, पुणे शाखा यांनी केलेल्या तक्रारीची प्रत मिळाली नव्हती. तिची मागणी करणारे परत एक पत्र लिहिले. १ फेब्रुवारीला ती प्रत आली. ४ फेब्रुवारीला दुसरे पत्र येऊन शनिवार दि. २२ फेब्रुवारीला कौन्सिलच्या मिटिंगला दुपारी दोन वाजता उपस्थित रहाण्याचा आदेशही मिळाला.

रविवारी संध्याकाळी मला आत बोलावले. मी व दळवी आत गेलो. मधल्या खुर्चीत डॉ. मेंढा व बाजूला कौन्सिल मेंबर्स बसले होते. त्या सर्वांनी मला दीड दोन तास प्रश्न विचारले. प्रश्न नेहमीचेच होते. 'तुम्ही व्यवसायाविषयी बाहेरच्यांचे मत कलुषित केलेत, पूर्वी पेशंटला ऑपरेशन करायचे सांगितल्यावर तो पटकन तयार होत असे, आता तो तुमच्या लेखामुळे ऑपरेशन करायलाच पाहिजे का असे उलटे प्रश्न विचारतो' या प्रकारच्या प्रश्नांना मी उत्तरे दिली की, ज्याची प्रॅक्टीस संशयास्पद, त्या डॉक्टरविषयी लोकांच्या मनात संशय निर्माण होतो. चांगल्या डॉक्टरला लेखाचा त्रास झालेला नाही. किंवा पेशंटला ऑपरेशनची माहिती सांगणे व आवश्यकता पटवणे हे डॉक्टरचे कामच आहे. 'किती टक्के डॉक्टर मालप्रॅक्टीस करतात ?' या प्रश्नाला उत्तर दिले की 'टक्केवारीचा हा प्रश्न नाही. चांगल्या माणसाला सेटल होण्यासाठी गैरमार्गाचा वापर नाईलाजाने करावा लागतो अशी सिस्टीम यातून तयार होत आहे, ती खरी चिंतेची बाब आहे.' 'तुम्ही लेख मेडिकल जर्नलमधे का लिहिला नाहीत, सर्वसामान्य लोकांपुढे का गेलात, कुटुंबातले भांडण बाहेर का नेलेत' या प्रश्नांवर सांगितले की 'मी पेशंट आणि डॉक्टर मिळून

कुटुंब मानतो. सर्व समाजाचा हा जिव्हाळ्याचा विषय असल्याने सर्वांमध्ये चर्चा व्हावी हाच उद्देश होता.'

चर्चेनंतर मला बाहेर बसवले व नंतर माझ्याविरुद्धची केस काढून घेतली असल्याचे सांगितले. कौन्सिल मेंबर्सनी हस्तांदोलन करून अभिनंदन केले.

या लेखावर झालेली अशा तऱ्हेची केस आपल्या देशातली पहिलीच आहे. डॉक्टर त्याच्या व्यवसायबंधूंच्या गैरवर्तनाविरुद्ध लिहितो, आणि त्याबद्दल मेडिकल कौन्सिल त्या डॉक्टरवर केस करते, अशा घटना जगात कुठेकुठे झाल्यात याचा शोध आम्ही घेतला असता फक्त क्रोनिन या डॉक्टर लेखकाने 'सिटॅडेल' ही व्यावसायिक गैरवर्तनावर आधारलेली कादंबरी लिहिली, त्याच्याविरुद्ध इंग्लंडमध्ये खटला झाला, एवढे एकच उदाहरण मिळाले.

केसनंतर या गैरवर्तनाला आळा घालण्यासाठी दूरवर विचार करता काही गोष्टी मांडणे आवश्यक वाटते.

गैरवर्तनाला आळा घालण्यासाठी मेडिकल कौन्सिल अस्तित्वात आहे, त्याची रचना आमुलाग्र बदलली पाहिजे. आज त्यात २३ सदस्य असतात. त्यातले १७ डॉक्टरी व्यावसायिकातून निवडून आलेले आणि उरलेले सरकारनियुक्त असतात. हे २३ जण सहा महिन्यांतून एकदा मुंबईत दीड-दोन दिवस बसतात. आणि केसेस संपवतात. हा सगळाच प्रकार अतिशय गैरसोयीचा आहे. त्याऐवजी या कौन्सिलमार्फत छोट्या विभागीय कमिट्या करून हे काम केले पाहिजे. लातूरचा सर्वसामान्य पेशंट मुंबईला कसा काय येणार ? त्याऐवजी जिल्हावार कमिट्या करून त्यात एक कौन्सिल सदस्य आणि स्थानिक, चारित्र्यवान, व्यवसायात प्रतिष्ठा असलेले दोन डॉक्टर्स एखादा त्रयस्थ नियुक्त करावेत आणि त्यांनी महिन्यातून एकदा जमून केसेस पाहिल्या पाहिजेत.

दुसरं म्हणजे कौन्सिलच्या कायद्यात आपल्या समाजाला डोळ्यांसमोर ठेवून सुधारणा केल्या पाहिजेत. उदाहरणार्थ माझ्यावर ज्या १७ व्या कलमाचा भंग केल्याचा आरोप होता, ते १७ वे कलम अमेरिकन कोड ऑफ मेडिकल एथिक्समधल्या कलमाचे शब्दशः कॉपी आहे. त्या कलमात म्हटलेले इनव्हेस्टिगेटर्स, कमिट्या अमेरिकेत आहेत. इथे त्या नाहीत. तरीही कॉपी करताना ती आंधळेपणाने केलेली असल्याने तो उल्लेख तसाच राहून गेला. 'मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया' ला महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल संलग्न असूनही त्यांच्या दोघांच्या कोड्स्‌मध्ये एकमेकांना विसंगत असलेली काही कलमे आहेत. एवढेच काय, भारतीय राज्यघटनेशी विसंगत असेही कलम आहेच. हे सर्व आंधळेपणाने नक्कल केल्याचे परिणाम आहेत. म्हणून या सर्व कौन्सिलची, त्याच्या कायद्याची नव्यानेच रचना झाली पाहिजे.

कौन्सिलचे आजचे स्वरूप कोर्टासारखे आहे. ते तसेच ठेवून चालणार नाही. डॉक्टरच्या गैरवर्तनासंबंधी पेशंटने तक्रार केली तरच कौन्सिल लक्ष घालणार. त्याऐवजी जिल्हा किंवा तालुका पातळीपर्यंत पोचेल अशी तपासयंत्रणा अस्तित्वात आली पाहिजे. या तपास अधिकाऱ्यांकडे कोणी तक्रार केल्यास त्याबाबतचा पुरावा त्यांनी मिळवून तो कौन्सिलपुढे आणला पाहिजे.

ह्या सर्व गोष्टीसाठी लोकमताचा दबाव सरकारवर आणला पाहिजे. पण हे व्हायला वेळ लागेल. मध्यंतरीच्या काळात काही गोष्टी लोकांच्या हातात आहेत, त्या जरी अमलात आणल्या तरी या गैरवर्तनास बराच आळा बसेल.

आज आहे या कॉन्सिल किंवा कोर्टव्यवस्थेला आरोप सिद्ध होण्यासाठी लेखी पुराव्याची फार जरुरी असते. डॉक्टर पेशंटला साधी पैसे घेतल्याची पावतीही देत नाही. बहुतेक बडे कन्सल्टंटही कोणी चेक देऊ लागला तर त्याला थांबवून कॅश पैसे घेतात. तेव्हा पेशंटजवळ त्याने या डॉक्टरचे औषध घेतले, एवढे म्हणायलाही पुरावा नसतो. म्हणून प्रत्येकाने प्रत्येक वेळी डॉक्टरला पैसे देताना बिलाचा आग्रह धरला पाहिजे.

दुसरं म्हणजे डॉक्टरने पेशंटला काय ट्रीटमेंट दिली, त्याचे काय निदान केले, त्याच्या कुठल्या तपासण्या केल्या वगैरे गोष्टी पेशंटला तपशीलवार माहीत नसतात. हॉस्पिटलमधून किंवा दवाखान्यातून पेशंटवर उपचार झाल्यावर त्याचे केसपेपर्स किंवा केसपेपरच्या सर्टिफाईड कॉपीज पेशंटने डॉक्टरकडे मागितल्या पाहिजेत. तो पेशंटचा कायदेशीर हक्क आहे. तो न बजावल्यामुळे एखाद्या डॉक्टरवर पेशंटने केस केल्यास तो डॉक्टर संपूर्णपणे नवीन, त्याला सोईचे असेल तसे रेकॉर्ड बनवू शकतो. वेळच्या वेळी असे रेकॉर्ड पेशंट मागत गेल्यास त्याच्याकडे बराच कागदोपत्री पुरावा असू शकेल. आणि त्या जोरावर तो मेडिकल कौन्सिल किंवा कोर्ट या यंत्रणांचा फायदा मिळवू शकेल.

या लेखाचा उद्देश डॉक्टर-पेशंटमध्ये वैमनस्य उत्पन्न करण्याचा नाही. पण गैरवर्तन करणाऱ्या डॉक्टरविरुद्ध वैमनस्य उत्पन्न करण्याचा मात्र जरूर आहे. ज्यांनी या उदात्त व्यवसायाला स्वतःच्या स्वार्थापोटी काळीमा फासला, त्यांना इतर डॉक्टरांनी तरी का क्षमा करावी ? डॉक्टरांनी स्वतःची डॉक्टर म्हणून वेगळी जात निर्माण न करता गैरवर्तनास आळा घालण्याच्या चळवळीत आपण होवून सामील झाले पाहिजे. नाहीतर असेच चालू राहिल्यास लोकांचा राग एकंदर डॉक्टरवर्गावर केंद्रित होईल आणि मग त्या असंतोषास विकृत वळण लागल्यास ते कोणीच थोपवू शकणार नाही.

---

२८८२
२२८७६
निबंध

REFBK-0022796